CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १२४ । पाने १२+४ । किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com







## थोडक्यात...



### भगवान महावीर यांना मनपात अभिवादन

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पुज्य भगवान श्री महावीर यांच्या जयंतीनिमित्त रंगभवन चौक येथील भगवान महावीर स्तंभास व सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात भगवान श्री महावीर यांच्या प्रतिमेस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेविका अर्चना वडनाल, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, महेश देवकर, भारतीय जैन संघटना व जैन सोशल ग्रुपचे केतन शहा, श्याम पाटील, अभिनंदन विभूते, सुवर्ण कटारे, संतोष बंब, सुरज होनसाळे, अतुल गांधी, कोमल पाचोरे, संजय शहा, प्रशांत वर्धमाने,महावीर नळे,गौतम संचेती, अशोक शेजाळ, वैशाली पूरवतं, शर्वरी कोठारी, महेश आहेरकर, भावना शहा, मनोज चवरकर, मंजुनाथ खोबरे गौरव आथने, ओम पाटील, श्रद्धा पाटील, प्रिया पाटील प्रांजल कटारे उपस्थित होते.

### पोलिसांच्या आरोग्य शिबिरास सुरवात; पहिल्या दिवशी शंभर पोलिसांनी घेतला लाभ

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी एक विशेष आरोग्य शिबीर पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथील संवाद हॉलमध्ये सुरु झाले. ३ एप्रिल २०२६पर्यंत होईल. या आरोग्य शिबिरास पोलीस दलाकडून



उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, एका दिवसात सुमारे १०० पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी शिबिराचा लाभ घेतला. सोलापूर ग्रामीण पोलीस दलामार्फत दुसऱ्यांदा या शिबिराचे आयोजन केले आहे. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत सातत्याने घेतला जाणारा हा पुढाकार विशेष उल्लेखनीय आहे. या आरोग्य शिबिरामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, विविध आजारांबाबत मार्गदर्शन तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात येत आहे. पोलीस दलातील कर्मचारी सतत कर्तव्यावर कार्यरत असल्यामुळे त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असून, या अनुषंगाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून पुणे येथील जयदीप मोघे हे उपस्थित राहून त्यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना निरोगी जीवनशैली अवलंबण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यावेळी जयदीप मोघे यांचे स्वागत राखीव पोलीस निरीक्षक, तिलकचंद कांबळे यांनी केले.

# जि.प., पंचायत समित्यांना १७१ कोटींची 'विकास निधी लॉटरी'

**✔ चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर निधीचा वर्षाव** | **✔ पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**





मार्च अखेर सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सदस्यांसाठी विकास निधीचा अक्षरशः वर्षाव झाला असून, पंधराव्या वित्त आयोगातून तब्बल १७१ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर झाला आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना प्रत्येकी ८५ कोटी ७० लाखांचा निधी प्राप्त झाला आहे.

निधीच्या पारदर्शक व परिणामकारक वापराबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष भर दिला असून, नियोजनबद्ध पद्धतीने विकासकामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. गेल्या चार वर्षांपासून जिल्हा परिषदेत प्रशासकराज असल्याने आणि लोकप्रतिनिधींचा अभाव असल्यामुळे पंधराव्या वित्त आयोगाचा निधी मिळू शकला नव्हता. मात्र अलीकडेच झालेल्या निवडणुकांनंतर नव्याने सदस्यांची नियुक्ती झाल्याने थकीत निधी एकाच वेळी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकासकामांना मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. प्राप्त निधीचा उपयोग पिण्याचे पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, तसेच इतर मूलभूत व पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी करण्यात येणार आहे. ग्रामीण नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडविण्यासाठी निधी निर्णायक ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.



**ग्रामीण मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा**

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सांगितले की, पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीमुळे ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होईल. आगामी काळात विकासकामांना वेग देत सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण केले जातील.

**जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात १०२४ कामांना मंजुरी**

पंधराव्या वित्त आयोगाव्यतिरिक्त सध्या अन्य कोणताही मोठा निधी प्राप्त झालेला नाही. जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात १०२४ कामांना मंजुरी मिळाली असून, त्यापैकी सुमारे साडेतीनशे कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे यंदा टँकरची संख्या घटल्याचे चित्र आहे. मात्र जलजीवन योजनेसाठी अपेक्षित ७० ते ८० कोटींच्या तुलनेत केंद्राकडून राज्याला केवळ १२ कोटींचीच मदत मिळाल्याने निधीवाटपाबाबत अनिश्चितता कायम आहे. चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मिळालेल्या या निधीमुळे सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकासाला नवी गती मिळणार असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा आहे.

**-कुलदीप जंगम, सीईओ**

**तालुकानिहाय पंचायत समित्यांना निधी वाटप याप्रमाणे**

| | |
|---|---|
| अक्कलकोट | ७.५८ कोटी |
| बार्शी | ७.२४ कोटी |
| करमाळा | ७.३४ कोटी |
| माळशिरस | ११.३३ कोटी |
| माढा | ८.८७ कोटी |
| मोहोळ | ७.३० कोटी |
| मंगळवेढा | ७.३० कोटी |
| उत्तर सोलापूर | ३.५९ कोटी |
| पंढरपूर | १०.०१ कोटी |
| सांगोला | ८.७६ कोटी |
| दक्षिण सोलापूर | ७.८८ कोटी |

एकूण पंचायत समिती स्तरावर ८५ कोटी ७० लाखांचा निधी वितरित करण्यात आला आहे.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या नामफलकाचा उद्घाटन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल**

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थान लगतच्या जागेवर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या नामफलकाचा उदघाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विकासाचा चढता आलेख हा स्वामीभक्त केंद्रस्थानी ठेऊन वाढत चालला असून, याचाच एक भाग ह्या उदघाटन सोहळ्याचा आहे. मान्यवरांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे व जागेचे पूजन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने नुकतीच श्री मल्लिकार्जुन देवस्थानच्या लगत जागेची खरेदी केली असून, श्री मल्लिकार्जुन यात्रेचे औचित्य साधून, बुधवारी श्री मल्लिकार्जुन देवस्थान समिती, नंदिकोल मानकरी परिवार, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी वर्ग, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे पदाधिकारी व



सदस्य व सदभक्तांच्या उपस्थितीत मंडळाच्या नामफलकाचा उदघाटन सोहळा संपन्न झाला. स्वामी भक्त व स्वामी कार्यासाठी मंडळाने सदरची जागा घेतलेली आहे.

या सोहळ्यास विरक्त मठ अक्कलकोटचे म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, अतुल बऱ्हाणपूरे, श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, प्रथमेश इंगळे, विश्वस्त प्रकाश उण्णद, स्वामिनाथ हिप्परगी, बसलिंगप्पा खेडगी, महेश हिंडोळे, राजशेखर नागुरे, प्रा. विजयकुमार लिंबीतोटे, शिवकुमार कापसे, प्रशांत लोकापुरे, यांच्यासह नंदिध्वजाचे मानकरी पाटील, लिंबीतोटे परिवार, श्री स्वामी समर्थ समाधी मठ बुधवार पेठ चोळप्पा महाराजांचे वंशज धनंजय पुजारी, अप्पू महाराज पुजारी, अन्नछत्र मंडळाचे पुरोहित अप्पू पुजारी, सुधाकर पुजारी, संदेश पुजारी, अनुप पुजारी, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, अक्कलकोट कृषीउत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अप्पासाहेब पाटील, नगरसेवक अविनाश मडीखांबे यांच्यासह भक्त गण व अन्नछत्र मंडळाचे पदाधिकारी, सेवेकरी, कर्मचारी वृंद, अमोलराजे भोसले मित्र परिवार उपस्थित होते.

# माढा मतदारसंघातील रखडलेले प्रश्न सोडवा

**आमदार अभिजीत पाटील यांची उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी**



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १ एप्रिल-**

आमदार अभिजीत पाटील यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांची मुंबईत भेट घेऊन माढा मतदारसंघातील रखडलेल्या प्रश्नांबाबत निवेदन देऊन निधीची मागणी केली. या सर्व मागण्यांवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लवकरच सकारात्मक निर्णय घेऊन माढा मतदारसंघाला भरघोस निधी देण्याचे सांगितले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

**माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी मांडलेले प्रश्न**

- माढा शहरातील वाढती पाणीटंचाईमुळे प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना तात्काळ मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्या.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माढा शहरात भव्य शिवस्मारक उभारण्यासाठी १० कोटी निधी मंजूर करा.
- श्रीपुर-महाळुंग नगरपंचायतीसाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत उभारण्यासाठी जागा खरेदी व बांधकामासाठी ५ कोटी निधी द्या
- माढ्यातील मनकर्णा नदी परिसराचे सुशोभीकरण व घाट बांधणीसाठी १० कोटी निधी द्या. माढा नगरपंचायतीसाठी नवीन प्रशासकीय इमारत आणि सांस्कृतिक सभागृह उभारण्यासाठी १० कोटी निधी द्या.



### पंढरपूर पंचायत समितीची पाहणी; 'क्लीन-ग्रीन' उपक्रमाचे कौतुक

**जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवारांकडून आषाढी यात्रेचा आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी आज सकाळी पंढरपूर पंचायत समितीस अचानक भेट देत कामकाजाचा आढावा घेतला. ३१ मार्चच्या कामकाजाच्या धावपळीनंतरही सर्व कर्मचारी वेळेत उपस्थित असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

या भेटीदरम्यान उपाध्यक्ष पवार यांनी आगामी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या तयारीचा तसेच पंचायत समितीअंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी त्यांचे स्वागत करून विभागातील उपक्रमांची माहिती दिली. पंचायत समिती परिसरात राबविण्यात आलेल्या 'क्लीन अँड ग्रीन' उपक्रमाची पाहणी करताना परिसरातील स्वच्छता, हरितीकरण आणि वृक्षारोपण उपक्रमाचे उपाध्यक्ष पवार यांनी विशेष कौतुक केले. प्रशासनाने घेतलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे परिसर सुशोभित झाल्याचे त्यांनी नमूद केले.

**विठ्ठल-रुक्मिणीचे घेतले दर्शन**

पंढरपूर दौऱ्यादरम्यान उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जाऊन भगवान विठ्ठल व माता रुक्मिणीचे दर्शन घेतले. मंदिर समितीच्या वतीने विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार यांनी त्यांचे महावस्त्र देऊन स्वागत केले.यावेळी गटविकास अधिकारी अमोल जाधव, पंचायत समितीचे अधीक्षक शहाजहान तांबोळी, भाजप ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष संभाजी दडे यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.या भेटीमुळे पंचायत समितीच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार असून, आषाढी यात्रेच्या नियोजनालाही गती मिळणार असल्याचे चित्र आहे.



सोलापूर : सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य ॲड. मल्लिनाथ शहाबादे यांची सोलापूर जनता सह.को. ऑप बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल ॲड. समीरखान बरिया यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दत्ताजी पुकळे, योगेश जैस्वाल, अब्दुल गफुर अरब उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी समाजासाठी उपयुक्त नागरिक बनावे : एपीआय कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १ एप्रिल-**

विद्यार्थी जीवन ही प्रत्येकाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची पायरी असते. आज तुम्ही ग्रॅज्युएशनचा टप्पा पार करत आहात, हा तुमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. मात्र हा शेवट नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे. आयुष्यात मोठी स्वप्ने पाहा, त्या स्वप्नांसाठी प्रामाणिकपणे मेहनत करा आणि आपल्या आई-वडिलांचे, शिक्षकांचे व समाजाचे नाव उज्वल करुन समाजासाठी उपयुक्त नागरिक बना, असे प्रतिपादन एपीआय आशिष कांबळे यांनी केले.

वेळापूर येथील सेंट जॉन्स इंग्लिश मीडियम स्कूल येथे ग्रॅज्युएशन सेरेमनी उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. शाळेचे संस्थापक सर सोमी जॉन



व मुख्याध्यापिका मिस शिजी जॉर्ज यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक मुख्याध्यापिका मिस शिजी जॉर्ज यांनी केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूल, बार्शीचे मुख्याध्यापक फादर वर्गीस ऑगस्टी तसेच वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे उपस्थित होते. यावेळी शाळेचे संस्थापक सोमी जॉन यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील इयत्ता यू.के.जी. व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना ग्रॅज्युएशन रॉब परिधान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात इयत्ता नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी नृत्य व नाटकाचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन जिया माने व साक्षी पिंजारी यांनी केले, तर आभार संस्थापक सोमी जॉन यांनी मानले.

# अक्कलकोटमधील अधिकाऱ्यांना सोमवारच्या बाजार दिवशी मुख्यालयात राहणे अनिवार्य करा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि १ एप्रिल-**

अक्कलकोटचा आठवड्याचा बाजार सोमवारी भरत असतो, या दिवशी तालुक्यातील गांव, गाड्या, वस्त्या, तांड्यातील ग्रामस्थ हे येत असतात, या दिवशी शासकीय-निमशासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्यालयात असावे व नागरिकांना भेटण्यासाठी प्राधान्य द्यावे अशी मागणी विविध गावचे सरपंच, सहकारी संस्थांच्या अध्यक्षांतून होत आहे.

अक्कलकोटचा आठवडा बाजार दर सोमवारी भरत असतो, या दिवशी तालुक्यातील गांव, वाड्या, वस्त्या, तांड्यातील नागरिक हे बाजारा करिता व शासकीय- निमशासकीय कामाकरिता श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये येत असतात. सोमवारी शेतकरी, शेतमजूर, कामगाराची ठरलेली सुट्टी म्हणून दर सोमवार हा आठवडा सुट्टी असते. मात्र या दिवशी शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचा आठवडा सुरु होत, अनेक कार्यालयात अधिकारी व कर्मचारी नसतात, आणि सोमवारच्या दिवशी सुनावण्या, आठवडा, मासिक बैठका घेतल्या जात असल्याने कामासाठी आलेल्या भेटीकरिता तास न तास वाट पहावी लागत तर आहेत. अधिकारी व कर्मचारी वेळेवर न भेट झाल्याने गावकडे जाण्याकरिता बस चुकल्याने सदर नागरिकांना बस स्थानकावर मुक्काम करण्याची वेळ आल्याचे अनेक वेळचे उदाहरण आहेत. याबाबत वरिष्ठ अधिकारी यांनी वेळीच लक्ष घालून दर सोमवारी अधिकारी व कर्मचाऱ्यानी मुख्यालय सोडू नये. व आलेल्या लोकांच्या अडचणी सोडविण्या करिता प्राधान्य क्रम व वेळ द्यावे अशी मागणी होत आहे. अक्कलकोटात असलेल्या शासकीय-निमशासकीय कार्यालयात दर सोमवारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहिलेच पाहिजेत या दिवशी शासकीय जनता दरबारच असावा, अन्य कोणतेही सुनावणी, बैठका, जिल्हा मिटींग वगैरे घेऊ नये अशी आधीसूचना जिल्हाधिकारी यांनी काढावी अशी मागणी विविध गावचे सरपंच सहकारी संस्थेचे अध्यक्षांतून होत आहे.

दर सोमवारच्या आठवडा बाजारच्या दिवशी भूमीअभिलेख या कार्यालयात जत्रेचे स्वरूप पाहायला मिळते. शेत जमिनींच्या कामासाठी सदर कार्यालयात व परिसरात कामासाठी झुंबड असते. मात्र उपअधिक्षक गैरहजर असल्याने शेतकऱ्याना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या बाबत जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालण्याची मागणी पुढे येत आहे.

# गुळपोळी येथे श्री भैरवनाथ यात्रा उत्सवाचे आयोजन

**आजपासून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील गुळपोळी येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यात्रा उत्सव गुरुवार, दिनांक २ एप्रिलपासून मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. श्री भैरवनाथ (जोगेश्वरी) यात्रेला गुरुवारपासून प्रारंभ होणार आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून आणि महाराष्ट्रात तीर्थक्षत्र म्हणून गुळपोळी या गावाला ओळखले जाते. श्री भैरवनाथाचा आवतार महादेवाचा आहे.



५ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या चार दिवसीय उत्सवात धार्मिक विधींसोबतच करमणुकीच्या आणि खेळांच्या भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चैत्र पोर्णिमेला दिवशी मध्य रात्रीपासून श्री भैरवनाथ देवाला पुरण पोळीचा नैवद्य देऊन त्यावेळेपासून यात्रेला प्रांरभ होतो. सकाळी ९ वाजता गुळाच्या शेरणी देवास निहिण्यास सुरुवात होते. ते दिवसभर चालू असतात. गाजत भैरवनाथची काठी घेऊन शेरण्या निहिल्या जातात. सायंकाळी आरती भैरवनाथाची केली जाते. त्यावेळी गावातील भाविक ग्रामस्थ बाहेर गांवाहुन आलेले लोक आरतीसाठी उपस्थित मोठया संख्येने भैरवनाथ मंदिरात असतात. अनेक दिवसांपासून दररोज आरती श्री भैरवनाथ मंदिरात केली जाते. सध्या दररोज मंदिरात महाप्रसाद वाटप केला जातो. प्रसाद घेण्यासाठी मंदिरात भाविक भक्तांची मोठी गर्दी असते.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी मानाची काठी मानकरी मालवंडीहुन घेऊन भाविक गुळपोळी येतात. आणि कोरफळे गावातील भाविकाना आबीलचा गाडा किवा माठ दिला जातो. ते शुध्दा भक्ति भावाने गुळपोळीच्या भैरवनाथ (जोगेश्वरी) देवाच्या दर्शनाला लोक येतात. माझं गांव... माझी यात्रा... या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ आणि यात्रा कमिटीच्यावतीने करण्यात आले आहे.

**कार्यक्रमांची रुपरेषा**

२ एप्रिल सकाळी ६ वाजता 'हनुमान जन्मोत्सव' सोहळा पार पडेल. त्यानंतर सकाळी १० वाजता 'शेरणी'चा कार्यक्रम होईल. सायंकाळी ७ वाजता भाविकांच्या मनोरंजनासाठी 'धुमधडाका' ऑर्केस्ट्रा आयोजित करण्यात आला आहे. ३ एप्रिल सकाळी ७ वाजता कोरफळे ते गुळपोळी असा भव्य 'रथोत्सव महोत्सव' निघणार आहे. रात्री ९ वाजता छबीना आणि सोंगांचा पारंपारिक कार्यक्रम सादर केला जाईल. ४ एप्रिल दुपारी ३ वाजता मल्लांच्या कौशल्याने रंगणारे 'जंगी कुस्ती मैदान' भरवण्यात येणार आहे. यात नामवंत मल्ल सहभागी होणार आहेत. ५ एप्रिल यात्रेच्या सांगता दिनी सायंकाळी ७ वाजता 'नादखुळा' ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे.

# सोलापुरात शनिवारी स्वरांजली शास्त्रीय संगीताची सुरेल मैफल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

श्रीमती आशा खांडेकर (संगीत अलंकार) यांच्या स्मृती प्रित्यर्थ 'स्वरांजली २०२६' या शास्त्रीय संगीत कार्यक्रम शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित केल्याची माहिती ओंकार कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याचे आयोजन आशा स्टुडिओज, पुणे यांच्या वतीने करण्यात आले असून, व्यवस्थापन वीर इव्हेंट्स, सोलापूर यांनी केले आहे. सोलापूरकर संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय संगीत अनुभव मिळणार आहे.

ही मैफल या कार्यक्रमात मुंबई येथील (मूळ सोलापूर) प्रसिद्ध शास्त्रीय गायिका सोनाली बोरकर आणि ग्वालेर घराण्याचे गायक अतुल खांडेकर (पुणे) यांचे सादरीकरण होणार आहे. सोनाली बोरकर या पद्मश्री पद्मजा फेणाणी यांच्या शिष्या असून, दोन्ही कलाकार आपल्या सुमधुर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमात विविध रागदारी, बंदिशी, भक्तिगीते, नाट्यगीत तसेच उपशास्त्रीय रचनांचा समावेश असणार आहे. कलाकारांना संवादिनीवर वरद सोहनी, तबल्यावर रामकृष्ण करंबेळकर आणि तालवाद्यावर अद्वैत खेडकर साथ देणार आहेत.

कार्यक्रमासाठी प्रवेश मोफत असून, सोलापूरकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्वरसोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या पत्रकार परिषदेस डॉ. रोहित खांडेकर, माधुरी शहा, अपर्णा सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# चुनखडीच्या पाच खड्यांत श्रद्धेचा महासागर; येरमाळ्यातील येडेश्वरी यात्रा ठरते अनोखी

▸ चुनखडी वेचण्याची प्रथा अशी न्यारी... ▸ येरमाळा येडेश्वरी देवी यात्रेचा अनोखा वारसा... ▸ लाखो भाविकांची गर्दी, कोट्यवधींची उलाढाल...









सुधीर लोमटे
येरमाळा प्रतिनिधी

**बा**लाघाटच्या निसर्गरम्य डोंगररांगांमध्ये वसलेले कळंब तालुक्यातील येरमाळा येथील येडेश्वरी देवी मंदिर हे धार्मिक श्रद्धा, परंपरा आणि वैशिष्ट्यपूर्ण रूढी यांचे अनोखे संगमस्थान ठरत आहे.

समुद्रसपाटीपासून सुमारे ३५० ते ४०० फूट उंच डोंगरावर वसलेले हे प्राचीन हेमाडपंती मंदिर, जरी राज्याच्या अधिकृत शक्तिपीठांमध्ये समाविष्ट नसले तरी नवसाला पावणारी देवी आणि तुळजाभवानीची धाकटी बहीण म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

चैत्र पौर्णिमेच्या यात्रेदरम्यान येथे पार पडणारी चुनखडी वेचण्याची प्रथा ही या देवस्थानाची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी देवीची पालखी चुन्याच्या रानात दाखल होताच हजारो भाविक चुनखडीचे पाच खडे वेचून पालखीवर अर्पण करण्यासाठी अक्षरशः झुंबड उडवतात. भाविकांच्या श्रद्धेनुसार, चुनखडीचे खडे पालखीवर पडणे शुभ मानले जाते.

यात्रेनंतर या चुन्याचा उपयोग मंदिर रंगवण्यासाठी केला जातो. गोवऱ्यांच्या भट्ट्यांमध्ये भाजलेल्या चुन्याने देवीचे मंदिर पांढऱ्या शुभ्र रंगात नटते. त्यामुळेच या परंपरेला धार्मिक आणि व्यवहारिक अशा दोन्ही स्तरांवर महत्त्व प्राप्त झाले आहे. परंपरा, श्रद्धा आणि अर्थकारणाचा संगम : येरमाळा येथील येडेश्वरी देवी यात्रा ही केवळ धार्मिक सोहळा नसून, श्रद्धा, परंपरा आणि स्थानिक अर्थकारणाचा संगम आहे. चुनखडी वेचण्याच्या अनोख्या प्रथेमुळे या यात्रेला वेगळी ओळख लाभली असून, दरवर्षी लाखो भाविकांच्या उपस्थितीत ही परंपरा अधिक दृढ होत आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला सुरू होणाऱ्या या यात्रेला १२ लाखांहून अधिक भाविक उपस्थित राहतात. पाच दिवस चालणाऱ्या या यात्रेत दररोज लाखोंच्या संख्येने दर्शनार्थी येतात.

नवरात्रोत्सवातही डोंगराला प्रदक्षिणा (खेटा) घालण्याची परंपरा असून, सुमारे दीड किलोमीटरचा हा मार्ग वन विभागाने सुशोभित केला आहे.

## ५० कोटींची आर्थिक उलाढाल...

यात्रेच्या काळात येथे मोठ्या प्रमाणावर व्यावसायिकांची गर्दी होते. सुमारे ६ ते ७ लाख नारळांची विक्री प्रसाद, मिठाई, किराणा, हॉटेल व्यवसायात मोठी वाढ एकूण ५० कोटींपेक्षा अधिक उलाढाल यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा चालना मिळतो.

## पौराणिक संदर्भ आणि श्रद्धा...

येडेश्वरी देवीविषयी विविध आख्यायिका प्रचलित आहेत. एका कथेनुसार, प्रभू श्रीराम वनवासात असताना माता पार्वती सीतेच्या रूपात प्रकट झाल्या, तेव्हा श्रीरामांनी त्यांना येडी आई असे संबोधले. त्यावरूनच देवीला येडाई असेही नाव प्राप्त झाले. तर दुसऱ्या कथेनुसार, भगवान परशुरामाशी निगडित प्रसंगामुळे देवीची मूर्ती मुखवट्याच्या स्वरूपात स्थापित आहे. मंदिर परिसरात परशुरामाची मूर्ती, एकमुखी दत्त मंदिर आणि तांदळा आढळतो, ज्यामुळे या ठिकाणाचे धार्मिक महत्त्व अधिक वृद्धिंगत होते.


## शासनाकडून विशेष निधीची मागणी...

या देवस्थानाला शासनाने 'अ' दर्जाचे तीर्थस्थळ म्हणून मान्यता दिली असली, तरी यात्रेसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध नाही. यात्रेचा खर्च ग्रामपंचायत व्यावसायिकांकडून घेतलेल्या करातून भागवते. त्यामुळे भाविकांसाठी अधिक सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून विशेष अनुदान मिळावे, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. तीर्थस्थळाचा दर्जा दिला आहे, तर विशेष निधीही मिळायला हवा,

**- विकास बारकुल, माजी सरपंच, येरमाळा**













## अग्रलेख...

# डॉक्टर, तुम्ही पुन्हा पुन्हा...!

‘वैद्यो नारायणो हरिः’ असे म्हणत ज्या डॉक्टरांना आपण देवाचा दर्जा देतो, ज्यांच्याकडे पाहून मरणाच्या दारात उभा असलेला रुग्णही आशेने डोळे उघडतो, त्या पांढऱ्या सदऱ्यातील काही कंटकच समाजाचे आरोग्य नासवत असल्याचे वारंवार पुढे येत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्याचे शेतकरी रोशन कुळे यांची किडनी काढून त्याच्या तोंडाला पाने पुसण्याच्या भयंकर ‘रॅकेट’चा पसारा फार मोठा असल्याचे उघड झाले. त्याचे लोण केवळ देशातच नाही, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले असताना, आता कानपुरातही अशीच किडनी तस्करी सक्रियपणे कार्यरत असल्याचे समोर आले. वारंवार उघडकीस येणारे हे विघातक कारस्थान चिंताजनक तर आहेच, शिवाय ते समाजमन सुन्न करणारेही आहे. ९.५ लाखांचे आमिष दाखवून गरिबाची किडनी काढायची आणि ती तब्बल ९० लाखांत श्रीमंतांना विकायची हा निव्वळ व्यापार नव्हे, तर जिवंत माणसांच्या अवयवाचा जाहीर लिलाव आहे. समाजाचे आरोग्य सुदृढ ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्या डॉक्टरांचा यात सहभाग असणे, हे अधिकच लांच्छनास्पद आहे. कुंपणानेच शेत खाल्ल्यावर दाद तरी कोणाकडे मागायची, हा प्रश्न जेवढा विदारक, तेवढाच तो भयावह आणि क्लेशदायकही आहे. कानपूरच्या प्रकरणात एका डॉक्टर दाम्पत्यासह १० जणांना अटक झाली आहे. तीन खाजगी रुग्णालयांचा यात सहभाग असल्याचे समोर आले आहे. त्यातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे, ज्या रुग्णालयाचा परवाना दोन महिन्यांपूर्वीच रद्द झाला होता, त्याही ठिकाणी शस्त्रक्रिया करून सर्रास किडनी काढली गेली! याचा अर्थ एवढाच की, या व्यवहारात नीतिमत्तेचा लवलेश अजिबात नाही. कायद्याची भीतीही उरलेली नाही. गरिबाची हतबलता हे अशा ‘रॅकेट’चे मोठे भांडवल आहे. कुटुंबाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी एखादा बाप किंवा तरुण मुलगा जेव्हा नाईलाजाने स्वतःचा अवयव विकायला काढतो, तेव्हा त्याच्या असहायतेचा फायदा घेणारे, त्याला ओरबडणारे हे पांढरपेशे कसाई कोणत्याही युद्धखोर गुन्हेगारांपेक्षा, दहशतवाद्यांपेक्षा कमी दोषी नाहीत, हे समजून घेतले पाहिजे.

चंद्रपूर जिल्ह्यातील मथूर गावचा तरुण शेतकरी रोशन कुळे यांच्या किडनी विक्रीचे प्रकरण महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला हादरा देणारे ठरले. त्या प्रकरणाच्या तपासात आंतरराष्ट्रीय जाळ्याचा पर्दाफाश झाला. या प्रकरणाचा मुख्य आरोपी रामकृष्ण सुंचू याने सापळा रचून कुळे यांच्यासह अन्य सोळा जणांच्या किडनी कंबोडियात विकल्याची माहिती पुढे आली. हा आरोपी अभियंता असला तरी त्याने या मानवी अवयवांच्या तस्करीत स्वतःचे नामाभिधानही ‘डॉ. क्रिष्णा’ असे केले होते. त्याच्यासोबतचा दलाल हिमांशी भारद्वाज यालाही अटक झाली. या संपूर्ण ‘रॅकेट’मध्ये तामिळनाडू राज्यातील त्रिचीच्या स्टार किम्स रुग्णालयाचाही सहभाग पुढे आला. रुग्णालयाचे संचालक डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी यांना ‘ट्रान्झिट रिमांड’ दिल्यानंतर तेथील उच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत त्यांना चंद्रपूरच्या न्यायालयात हजर व्हायचे होते. परंतु, ते अद्याप आलेले नाहीत. याच रुग्णालयात शस्त्रक्रिया करणारे आणखी एक आरोपी डॉ. रवींद्रपाल सिंग यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सशर्त अटकपूर्व जामीन दिला आणि या प्रकरणी तपास करणाऱ्या विशेष पोलिस पथकासमोर बयाण नोंदवण्याची ताकीद दिली. त्यांच्या जामिनासाठी तारखांवर तारखा सुरू आहेत. येत्या ४ एप्रिलला पुढची तारीख आहे. मूळचे दिल्लीचे असलेले डॉ. रवींद्रपाल सिंग सध्या कुठे आहेत, हे कळायला मार्ग नाही. कानपूर प्रकरणात अटकेत असलेले दिल्लीचेच डॉ. इंदरपाल सिंग यांच्या आणि चंद्रपूर प्रकरणी आरोपी असलेले डॉ. रवींद्रपाल सिंग यांच्या नावात आणि गावात बरेच साधर्म्य असले तरी हे दोघेही वेगवेगळे आहेत आणि त्यांची टोळीही भिन्न आहे, असे दिसते. त्यांचा आपसात संबंध असलाच तर चौकशीत दिसेल. एकूण काय तर, अवघ्या देशात कायदा व सुव्यवस्थेच्या नाकावर टिच्चून गरिबांची किडनी काढली जात आहे. त्यांच्या हाती पाच-दहा लाख ठेवून तब्बल ८० ते ९० लाखांत त्यांची किडनी श्रीमंतांना विकली जात आहे. प्रचंड लाभाच्या या अवैध व्यापाराला थांबविण्याचा प्रयत्नही तोकडा असल्याची वास्तविक स्थिती समोर आहे. चंद्रपूर पोलिसांच्या विशेष पथकाची चमू तामिळनाडूतील त्रिचीच्या स्टार किम्स रुग्णालयात तपासासाठी गेली असता, त्यांच्याशी धक्काबुक्की झाल्याची आणि दरम्यानच्या काळात आरोपीला रफादफा केल्याची घटना पोलिस अधीक्षकांनी सांगितली आहे. हे असेच घडत नाही तर त्यामागे कुठल्यातरी मोठ्या शक्तीचा आशीर्वाद असतो, हे वेगळ्याने सांगायची गरज नाही.

देशात आणि कानपुरात हे पहिल्यांदाच घडत आहे, असेही नाही. तर यापूर्वीही अशा मानवी तस्करांच्या टोळ्यांनी उच्छाद मांडला होताच. २०२० मध्ये कानपूरचेच अवयव तस्करी प्रकरण गाजले होते. २००८ मधील गुडगावचे अमित कुमार रॅकेट असो की, अलिकडच्या काळातील नेपाळ-भारत सीमेवरील अवयव तस्करांचे जाळे असो, या साऱ्यांची ‘मोडस ऑपरेंडी’ सारखीच आहे. ते कायम गरीब, कर्जबाजारी आणि उपेक्षित वर्गातील गरजूंना हेरतात, त्यांना आपल्या जाळ्यात ओढतात आणि पैशाचे आमिष दाखवून त्यांचे अवयव काढतात. किडनी काढून घेतल्यानंतर त्यांच्या हाती तुटपुंजी रक्कम ठेवतात आणि सहभागी दलाल, रुग्णालयाचे संचालक आणि डॉक्टर्स पीडितांच्या टाळूवरचे लोणी मोठ्या आनंदाने खातात. एकूण हा सारा प्रकार भयंकर आहे आणि तो रोखलाही जात नाही, हे त्याहून शोचनीय. ‘नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो’च्या आकडेवारीनुसार, मानवी तस्करीच्या घटनांमध्ये वाढ होत असली, तरी गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण अत्यल्पच आहे. ‘ग्लोबल फायनान्शिअल इंटिग्रिटी’च्या अहवालानुसार, जगभरातील अवयव तस्करीच्या व्यापारातून दरवर्षी अंदाजे ८४० दशलक्ष ते १.७ अब्ज इतकी मोठी उलाढाल होते. एकूण प्रत्यारोपणापैकी १० टक्के अवयव हे तस्करीतून आलेले असतात. भारतात दरवर्षी हजारो लोक किडनी निकामी झाल्यामुळे मृत्यूशी झुंज देतात. पण त्यांना कायदेशीर दाता मिळणे दुरापास्त होते. मागणी आणि पुरवठ्याचे गणित जुळत नाही. त्यातून हा काळाबाजार फोफावतो. प्रशासन आणि आरोग्य व्यवस्था असे दाते मिळवून देण्याची प्रक्रिया सोपी करण्यात अपयशी ठरते, तेव्हा ‘डॉ. क्रिष्णा’सारख्या दलालांचे आणि ‘सिंग’सारख्या डॉक्टरांचे तसेच ‘स्टार किम्स’ आणि कानपुरातील परवाना रद्द रुग्णालयांचे फावते.

आज वैद्यकीय क्षेत्राचे कमालीचे व्यावसायिकीकरण झाले आहे. रुग्णालय चालवणे हा आता सेवाधर्म न राहता तो ‘इन्व्हेस्टमेंट मॉडेल’ बनला आहे. मोठ्या ‘कॉर्पोरेट हॉस्पिटल’मध्ये रुग्णसंख्येचे, भरलेल्या खोल्यांचे आणि रुग्णांच्या आर्थिक शोषणाचे लक्ष्य (टार्गेट) दिले जाते. कानपूरचे ताजे उदाहरण घ्या, तिथे ९.५ लाखांची खरेदी आणि ९० लाखांची विक्री! यातील नफ्याचा आकडा पाहिला की कोणाचेही डोळे विस्फारतील. रुग्णाचे प्राण वाचवणे ज्यांचे कर्तव्य आहे, तेच जेव्हा मृत्यूचे दलाल बनतात, तेव्हा अशांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी. त्यांच्यावर केवळ गुन्हे दाखल करून चालणार नाही, तर त्यांची वैद्यकीय नोंदणी कायमस्वरूपी रद्द करून या ‘नोबेल प्रोफेशन’मधून कायमचे बहिष्कृत केले पाहिजे. नागभीडच्या रोशन कुळे प्रकरणाने गंभीर इशारा दिला होता, पण तो आपण गांभीर्याने घेतला नाही. आज कानपूरने पुन्हा एकदा आपल्या डोळ्यावरची पट्टी ओढून काढली आहे. तरीही यंत्रणा ढिम्मच राहिली, तर उद्या हे रॅकेट्स गल्लीबोळातील ‘नर्सिंग होम्स’पर्यंत पोहोचतील, हे गांभीर्याने समजून घेतले पाहिजे. अखेर प्रश्न उरतो तो विश्वासार्हतेचा. समाजातील सामान्य माणूस आजही डॉक्टरांना तारणहार मानतो. पण जर वारंवार अशी प्रकरणे पुढे येत असतील, तर त्यांच्या विश्वासाला तडे जाणारच. कधीकाळी एखाद्या डॉक्टरने वाईट कृत्य केले तर ‘डॉक्टर, तुम्ही सुद्धा!’ असे मथळे वर्तमानपत्रांत छापून यायचे. पण आता- ‘डॉक्टर, तुम्ही पुन्हा पुन्हा!’ असे म्हणण्याची वेळ आली आहे...

## प्रासंगिक

# स्वमग्नता : जागृती ते कृतिशील स्वीकृती

चिन्मय पाठक




“आमच्या मुलाला स्वमग्नता आहे हे कळल्यावर सुरुवातीला आम्ही खूप व्यथित झालो, पण तुमच्याशी बोलल्यानंतर आम्हाला आधार वाटला.” राज या ३ वर्षांच्या मुलाच्या वडिलांनी मला हे सांगितलं. राजला अडीच वर्षांचा असतानाच स्वमग्नता या आजाराचे निदान झाले. आपले मूल हे इतर सर्वसामान्य व्यक्तीच्या ‘नॉर्मल’ या चौकटीत बसत नाही. हा आघात पचवायला आई-वडिलांना थोडा वेळ लागला. तिथून सुरू झाला, तो हा आजार का झाला हे कारण शोधण्याचा प्रवास आणि उपचार. राजचे पालक जेव्हा माझ्याकडे आले तेव्हा राजला समोरच्याच्या नजरेला नजर भिडवून बोलणे, एखाद्याच्या चेहऱ्याचे हावभाव समजून त्याला उत्तर देणे, अंगुलिनिर्देश करणे हे जमत नव्हते. राजच्या बाबतीत घडलेला घटनाक्रम समजून घेताना कळले की त्याला हा त्रास कोविड-१९ महामारीनंतर सुरू झाला. सुदैवाने राजचे लहान वय ही त्याच्या संभाव्य प्रगतीच्या दृष्टीने जमेची बाजू होती. त्यामुळे त्याच्या काही क्षमतांचा विकास करता येतो हे मी पालकांना सांगितले. आपल्या मुलाचा काही प्रमाणात विकास होऊ शकतो ही कल्पनाच राजच्या आई-वडिलांना खूप दिलासा देणारी होती.

स्वमग्नता असलेल्या मुलांचे निदान आणि उपचार मूल दीड वर्षांचे असताना सुरू करता येतात असे मानसशास्त्र सांगते. या उपचारात सर्वप्रथम मुलाच्या वर्तनातील वेगळेपणा नक्की काय स्वरूपाचा आहे हे बघितले जाऊन उपचार केले जातात. उदाहरणार्थ जर मुलगा आई-वडील किंवा कोणाहीकडे न बघता स्वत:त मग्न होऊन खेळत असेल, तर इथे उपचारक पालकांच्या उपस्थितीत त्या मुलाला सहज नजरानजर होईल अशा उंचीवर बसवतात. त्यानंतर त्याची आवडती वस्तू त्याच्या डोळ्याजवळ नेली जाते आणि त्याने उपचारकाकडे बघितल्यावरच ती गोष्ट त्याला दिली जाईल हे त्याच्या डोक्यात वर्तनाद्वारे बिंबवले जाते. मुख्य म्हणजे या दरम्यान पालकांना देखील हे उपचार घरच्या घरी कसे करता येतील हे देखील शिकवले जाते. पालकांकडून सामान्यपणे विचारला जाणारा प्रश्न म्हणजे “व्याधी आमच्या पाल्याला आहे, मग तुम्ही उपचारात आम्हाला का सहभागी करून घेताहात?” स्वमग्नतेच्या आधुनिक उपचारद्धतीत केवळ मानसशास्त्रज्ञानेच उपचार करण्याऐवजी पालकांचा पण त्यात सहभाग असणे हा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे उपचारांना खूप चांगला आणि त्वरेने प्रतिसाद मिळतो असे ध्यानात आले आहे.

उपचारांदरम्यान शिकविलेले वर्तन जर त्याच परिस्थितीत आढळत असेल आणि अन्य परिस्थितीत ते वर्तन दिसत नसेल तर मात्र ती एक अडचणीची बाब होते. सर्वच परिस्थितीत एकच वर्तन समान आढळणे याला सामान्यीकरण (जनरलायझेशन) असे म्हणतात. हे साध्य करण्यासाठी, त्या क्षमतेला परिपोषक परिस्थिती हसत खेळत कशी निर्माण करावी हे पालकांना शिकवणे हा देखील आधुनिक उपचारपद्धतीचा एक भाग आहे. उपचार सुरू केल्यावर राजमध्ये खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा दिसली. त्याची नजरेला नजर टाळून बोलण्याची सवय आटोक्यात आली, एवढेच काय तर तो टाटा, बाय बाय करायला निर्देश करणे शिकला, त्याला हव्या असलेल्या गोष्टी मागायला शिकला. राजचे आई-वडील घरी दहावीपर्यंतच्या शिकविण्या घेत. शिकवणी वर्ग सुरू असताना ते त्याला तिथेच बसून एखाद्या कागदावर रेघोट्या काढू देत आणि शिकवणी वर्ग झाला की त्यांच्या विद्यार्थ्यांना बाय बाय करायला लावणेदेखील वडिलांनी शिकवले होते. कालांतराने उपचारातून त्यांनी राजला वस्तू हवी असल्यास ती मागणे अशा गोष्टी देखील सहज शिकवल्या. इथे त्याच्या पालकांनी वापरलेलं एक महत्वाचं सूत्र म्हणजे आजूबाजूच्या वातावरणाला मानसोपचार पोषक बनवणे. यातून त्या मुलाची प्रगती झाली आणि क्षमता विकास पण झाला.

मात्र या सर्व घटनाक्रमाच्या मुळाशी आहे ती म्हणजे विनाशर्त आणि क्रियाशील पातळीवर असलेली स्वीकृती. याच्या जोडीला “आमचे मूल वेगळे आहे पण त्यात कमतरता नाही” ही सकारात्मक आणि खूप मोठा आधार देणारी भावना! जेव्हा ही क्रियाशीलता व्यक्तिगत पातळीवर येते तेव्हा एक डोळस बदल सुरू होतो. हा बदल सहउपचारक आणि पालक हे वैचारिक द्वैत काढून या दोन्ही भूमिकांचा एक सुरेल संगम घडवतो. या संगमातून पालक आपल्या पाल्याला हा आजार झाला म्हणजे आकाश कोसळले असं न वाटून घेता, हा आजार झाला तरी त्याला समर्थ आणि विज्ञाननिष्ठपणे तोंड देऊ ही भूमिका मांडतो. दरवर्षी २ एप्रिल हा “जागतिक स्वमग्नता विषयक जनजागृती दिवस” म्हणून पाळला जातो. या वर्षीचे सूत्र हे याच “जागृतीच्या पलीकडे जाऊन क्रियाशील स्वीकृती कडे” जाणाऱ्या प्रवासावर भर देणारं आहे.

(लेखक पुण्यातील अलोहा क्लिनिक्स, सेवा भवन येथे रजिस्टर्ड क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आहेत.)

९५१८९३१३०८
www.sashaktpsychotherapy.com

## वेध

नीलेश जोशी

# सण-उत्सव, परंपरा आणि विज्ञान

आमची संस्कृती रूढी, परंपरा, सण-उत्सवांची रेलचेल असणारी आहे. उत्सवप्रिय असलेला येथील समाज वर्षभर विविध परंपरा, सण मोठ्या आनंदात, उत्साहात साजरा करीत असतो. बारा महिने साजरे होणारे विविध सण, धार्मिक संस्कार देणारे तर आहेतच, सोबतच त्यामागे अत्यंत सखोल वैज्ञानिक विचार आहे. त्या त्या सण-उत्सवांच्या निमित्ताने विशेष महत्त्व असलेल्या खाद्यपदार्थांचा जरी विचार केला तरी त्यामागे असलेले आरोग्यशास्त्र प्रामुख्याने दिसून येते. नुकताच आपण वर्षप्रतिपदा अर्थात गुढीपाडवा साजरा केला. गुढीपाडव्याला कडुनिंबाची पाने, गूळ आणि इतर पोषक घटकांचे सेवन करण्याची परंपरा आहे. कडुनिंब रक्त शुद्ध करतो, रोग प्रतिकारकशक्ती वाढवितो तसेच कृमिनाशक आणि पित्तशामक देखील असतो. आयुर्वेदानुसार अत्यंत उपयोगी असलेला कडुनिंब सेवन करण्याची ही परंपरा शास्त्रीयच म्हणावी लागेल. पावसाळ्यात नागपंचमी सर्वत्र साजरी होते. नागपंचमीला पचायला हलका आहार घेतला जातो. कारण या काळात पचनसंस्था कमजोर असते. तर गणेशोत्सवात संतुलित व गोड आहार मुख्यतः मोदक ज्यामध्ये नारळ, गूळ आणि तुपाचा समावेश असतो. हे सर्व घटक आरोग्याला उपयुक्त आहेत. नारळ शरीराला थंडावा देतो, गूळ पचन सुधारतो तर तूप ऊर्जा वाढविते. त्यानंतर येणारा नवरात्र सण हा शरीरशुद्धीचा काळ मानला जातो. या कालावधीत उपवास करण्याची परंपरा आहे. ही परंपरा धार्मिकतेसोबतच आरोग्यदायी देखील आहे. उपवासामुळे पचनसंस्थेला विश्रांती मिळते. शरीरातील विषारी द्रव्य बाहेर पडतात आणि नव्याने ऊर्जा निर्माण होते.

कोजागरी पौर्णिमेचेही आपल्या संस्कृतीत विशेष महत्त्व आहे. हा साधारण ऑक्टोबर महिन्याचा काळ. या काळात वातावरणात पुन्हा बदल झाल्याने व उष्णता अधिक वाढल्याने पित्त प्रकोप होण्याची शक्यता असते म्हणूनच कोजागरीच्या रात्री जागरण करून आटीव दूध हे चंद्र किरणांच्या प्रकाशात ठेवावे, अशा दुधात पित्त शमविण्याची ताकद असते. नुसतेच दूध नव्हे तर आपण स्वतःही चंद्र किरणांच्या प्रकाशात बसल्याने लाभा होतो. सणांचा राजा म्हटल्या जाणाऱ्या दिवाळीत अभ्यंग स्नानाला विशेष महत्त्व आहे. पहाटे उठून उटणे आणि तेलाने मालिश करण्याची परंपरा आजही आम्ही जोपासत आहोत. तेलाने मालिश करून स्नान केल्याने त्वचा निरोगी राहते. रक्ताभिसारण सुधारते आणि थकवा नाहीसा होतो.

पुढे सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तो सण मकरसंक्रांतीचा. जानेवारी महिन्याच्या थंडीत साजरा होणाऱ्या मकरसंक्रांतीच्या काळात त्वचा कोरडी होते. शरीराला उष्णतेची गरज असते. तेव्हा तिळ आणि गुळाचे लाडू खाण्याची परंपरा आहे. तिळामध्ये तेलकटपणा असून तो शरीराला उष्णता देतो. तर गूळ पचनक्रिया सुधारतो. सणांसोबत जोडल्या गेलेल्या या विविध खाद्य परंपरा आरोग्यदायी आहेत. खरं म्हणजे भारताची प्राचीन उपचारपद्धती ही आयुर्वेद आहे. आयुर्वेदाचे ‘स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम्’ आणि ‘आतुरस्य विकार प्रशमनम्’ म्हणजेच निरोगी व्यक्तीचे आरोग्य नीट राहावे आणि आजारी व्यक्तीचे रोग दूर करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. आयुर्वेदानुसार वात, पित्त आणि कफ हे तीन दोष असतात. या दोषांचे संतुलन बिघडले की रोग निर्माण होतात. ऋतू बदलल्यावर हे दोष बदलतात. म्हणूनच आयुर्वेदात ऋतुचर्या याला विशेष महत्त्व दिले आहे. या ऋतुचर्येचा विचार करूनच विविध सण- उत्सवात खाद्य परंपरेची रचना करण्यात आली.

खाद्य परंपरेद्वारा ज्या प्रमाणे शारीरिक आरोग्याची काळजी या सण-उत्सवात घेतली जाते त्याचप्रमाणे सण-उत्सव मानसिक आरोग्य जपण्यासाठी देखील उपयोगी ठरतात. सणांमध्ये पूजा-प्रार्थना, उपवास, मंत्रोच्चार यांचा समावेश असतो. इष्ट देवतेची पूजा, आराधना पारंपरिक पद्धतीने करताना ताजी, सुगंधी पाने-फुले, धूप-दीप लावणे अशा क्रियांमुळे वातावरण प्रसन्न होते. ठरावीक मंत्र पठन एका लयीत, सातत्याने केल्याने मनःशांती लाभते हा आपल्यापैकी अनेकांचा अनुभव आहे. पाश्चात्यांना देखील ओंकाराचे महत्त्व आता पटायला लागले आहे. जगभर यावर संशोधन देखील होत आहे. ही बाब आपल्यासाठी निश्चितच अभिमानाची म्हणावी लागेल. पण दुसरीकडे आमच्या सण-उत्सवात मोठ्या प्रमाणात होत असलेले बदल ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. आरोग्यदायी खाद्य परंपरेऐवजी आता काही ठिकाणी जंक फूड, रात्री उशिरापर्यंतचे अनावश्यक जागरण, रासायनिक रंग, प्लॅस्टिक सजावट, फटाके आदी विविध प्रकारचे प्रदूषण याने आरोग्यावर दुष्परिणाम व्हायला लागले आहेत. आपल्या पूर्वजांनी शास्त्रीय पद्धतीने सण-उत्सवात खाद्य परंपरेसह विविध उपयोगी रूढी रुजविल्या आहेत. आज या रूढी-परंपरांचा विज्ञाननिष्ट अर्थ समजून घेत त्याचे पालन करणे गरजेचे आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# महिला आरक्षण आणि घटनादुरुस्ती विधेयक

श्यामकांत जहागीरदार



२०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून ३३ टक्के महिला आरक्षण लागू केले जाणार आहे. २०२३ मध्ये सरकारने लोकसभा तसेच विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे ‘नारीशक्ती वंदन’ विधेयक पारित केले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपासून हे विधेयक लागू करणे शक्य नव्हते. कारण ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यासाठी आधी जनगणना तसेच नंतर मतदारसंघांची फेररचना करणे आवश्यक असते. २०२९ पर्यंतही या दोन्ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे २०३४ पासून ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याची सुरुवातीला सरकारची भूमिका होती. पण २०२३ मध्ये विधेयक पारित झाल्यानंतरही महिला आरक्षण लागू होत नसल्यामुळे याची अंमलबजावणी कधीपासून करणार, अशी विचारणा विविध राजकीय पक्ष सरकारला वारंवार करत होते. काहींनी या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली होती. त्यावर महिला आरक्षण कधीपासून लागू करणार, अशी विचारणाही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला केली होती.

जनगणनेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदारसंघांच्या फेररचनेची प्रक्रिया सुरू होते आणि ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर लोकसभा निवडणुकीत ३३ टक्के महिला आरक्षण लागू करता येते. मात्र २०२१ मध्ये कोरोना आणि अन्य कारणांमुळे जनगणना होऊ शकली नाही. जनगणना न झाल्यामुळे मतदारसंघांची फेररचनाही होऊ शकली नाही. त्यामुळे ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यात अडथळा आला होता. सर्व बाजूंनी दबाव वाढल्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला. मात्र त्यासाठी आता घटनादुरुस्ती करावी लागणार आहे. मध्यंतरी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा संपण्यापूर्वी सरकार दोन्ही सभागृहांत घटनादुरुस्ती विधेयक पारित करेल, अशी चर्चा होती. गृहमंत्री अमित शाह यांनी या मुद्द्यावर सर्वसहमतीसाठी काही राजकीय पक्षांशी चर्चाही केली होती. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचा महिला आरक्षणसंदर्भातील घटनादुरुस्तीला विरोध नाही, मात्र पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीत राजकीय फायदा लाटण्यासाठी सरकार महिला आरक्षणाचा उपयोग करत असल्याची विरोधकांची भावना झाली आहे. त्यामुळे २९ एप्रिलला या सर्व राज्यांतील मतदानाचा शेवटचा टप्पा आटोपल्यानंतर सरकारने या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी सूचनावजा मागणी काँग्रेसने केली.

हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यामुळे ते संसदेच्या दोन्ही सभागृहांत दोनतृतीयांश बहुमताने पारित होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा लागणार आहे. त्यामुळे घाईगर्दीत हे घटनादुरुस्ती विधेयक पारित करण्याचा आग्रह सरकारने सोडून दिला असल्याचे दिसते. आता एप्रिल महिन्यात वा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून त्यात हे घटनादुरुस्ती विधेयक पारित करून घेईल, असा अंदाज आहे. घटनादुरुस्तीमुळे जनगणना तसेच मतदारसंघांची फेररचना न करताही महिला आरक्षण विधेयक लागू करता येणार आहे.

मतदारसंघांच्या परिसीमनाला म्हणजे फेररचनेला दक्षिणेतील राज्यांचा विरोध होता. केंद्र सरकारच्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाची दक्षिणेतील राज्यांनी प्रभावी अंमलबजावणी केली, त्यामुळे गेल्या काही वर्षात उत्तरेतील राज्यांच्या तुलनेत दक्षिणेतील राज्यांतील लोकसंख्या नियंत्रणात राहिली. दक्षिणेतील राज्यांची लोकसंख्या तुलनेत कमी झाल्यामुळे मतदारसंघाच्या परिसीमनात म्हणजे फेररचनेत दक्षिणतील राज्यांत लोकसभेचे मतदारसंघ कमी होण्याची शक्यता निर्माण झाली होती, त्यामुळे लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची फेररचना करण्यास दक्षिणेतील राजकीय पक्षांनी विरोध केला होता.

पण जनगणना आणि परिसीमनाशिवाय ३३ टक्के महिला आरक्षण लागू करायचे असल्यामुळे २०११ च्या जनगणनेच्या आधारावर लोकसभा तसेच विधानसभांच्या जागांत सरसकट ५० टक्के वाढ करत महिला आरक्षण लागू करण्याची केंद्र सरकारची भूमिका आहे. लोकसभेची सदस्यसंख्या सध्या ५४३ आहे, यात ५० टक्के म्हणजे २७३ जागा वाढवल्या जाणार आहे. यामुळे विद्यमान लोकसभेची सदस्यसंख्या ८१६ होणार आहे. यातील ३३ टक्के म्हणजे २७३ जागा महिलांसाठी राखीव राहणार आहेत. ३३ टक्के महिला आरक्षणात अनुसूचित जाती, जमातीचेही वेगळे आरक्षण राहणार आहे.

याच तुलनेत सर्व राज्यांतील विधानसभेतील जागांची संख्याही वाढणार आहे. महाराष्ट्र विधानसभा सध्या २८८ सदस्यांची आहे, नव्या नियमानुसार ती ४३२ सदस्यांची होणार आहे. या नियमाचा सर्वांत मोठा फायदा उत्तरप्रदेशला मिळणार आहे. उत्तरप्रदेशातील लोकसभेच्या जागा ८० वरून १२० होतील तर विधानसभेची सदस्यसंख्या ६०० वर जाऊ शकते. नव्या धोरणानुसार दक्षिणेकडील राज्यातील लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या जागांतही वाढ होणार असल्यामुळे या राज्यांचा विरोध संपुष्टात आला आहे. कुटुंब नियोजनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केल्याचा फटका आपल्याला बसेल, अशी भीती आतापर्यंत दक्षिणेतील राज्यांना भेडसावत होती, ती यामुळे दूर होणार आहे.

नवीन संसद भवनातील लोकसभा तसेच राज्यसभेच्या आसनक्षमतेत जवळपास दीड पटीने वाढ करण्यात आली आहे. नव्या लोकसभेची आसनक्षमता आठशेपेक्षा जास्त आहे, तर राज्यसभेची सदस्यक्षमता चारशेच्या घरात करण्यात आली आहे. सदस्यसंख्येतील सरसकट वाढ फक्त लोकसभा तसेच राज्य विधानसभांनाच लागू होणार आहे. म्हणजे राज्यसभा तसेच विधानपरिषदेतील जागांत यामुळे वाढ होणार नाही, त्या आहे, तेवढ्याच कायम राहणार आहेत.

लोकसभा तसेच विधानसभेत ३३ टक्के महिला आरक्षण लागू होणार असल्यामुळे महिला वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे यामुळे देशातीलच नाही तर अनेक राज्यांतील राजकीय समीकरणेही बदलणार आहेत. काही वर्षांपूर्वी संसदेत महिला आरक्षण विधेयक सादर करायला समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलाने विरोध केला होता, पण आता या पक्षांनीही आपल्या भूमिकेत बदल केला आहे. घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देण्याची तयारी या पक्षांनी केली. महिलांसाठी आरक्षित मतदारसंघ लॉटरी पद्धतीने निश्चित केले जाणार असल्याचे समजते. सामान्यपणे एक मतदारसंघ १५ वर्ष महिलांसाठी राखीव ठेवला जाणार आहे, त्यानंतर तो खुला केला जाईल, असे समजते. सध्या लोकसभेतील महिला खासदारांची संख्या ७४ आहे, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ७८ खासदार विजयी झाल्या होत्या. त्या तुलनेत २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेत २७३ खासदार राहणार आहेत.

महिला आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयकाला विरोध करत देशातील ५० टक्के लोकसंख्या असलेल्या महिलांची नाराजी ओढवून घेण्याची कोणत्याच राजकीय पक्षांची तयारी नाही. त्यामुळे सरकार ज्या दिवशी या संदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक आणेल, ते दोनतृतीयांशपेक्षाही जास्त बहुमताने पारित होऊ शकते. महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याच्या निर्णयाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाला द्यावे लागणार आहे.

देशातील अनेक राजकीय पक्षांचे नेतृत्व आजही महिलांच्या हातात आहे, काँग्रेसच्या सोनिया गांधी, बसपाच्या मायावती आणि तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी अशी नावे सांगता येतील. महिला आरक्षणामुळे राजकारणात महिलांचे प्रस्थ आणि महत्त्व वाढणार आहे. देशातील राजकारणाचा चेहरामोहरा बदलणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राजकीय पक्षांनाही आपल्या एकूणच भूमिकेत आणि रचनेतही मोठा बदल करावा लागणार आहे. पक्षात सर्व स्तरावर ३३ टक्के महिलांना सामावून घ्यावे लागणार आहे.

९८८१७१७८१७

### बसेल जेवढे पोटात, तेवढेच घ्या ताटात!



लग्न समारंभ असो किंवा अन्य कोणताही कार्यक्रम असो, भोजनासाठी जावे लागते. पूर्वी पंगत पद्धत होती. आता स्वयंसेवा पद्धतीने जेवण घ्यावे लागते. त्यासाठी रांगाही लागतात. पुन्हा पुन्हा रांगेत येऊन पदार्थ घेण्यापेक्षा अनेक जण एकदाच भरमसाट वाढून घेतात. शेवटी ताटातले एक तर जबरदस्तीने खावे लागते, नाहीतर वाया घालावे लागते. जबरदस्तीने खाणे घातक ठरते, म्हणून ताटात पदार्थ तसेच सोडले जातात. अशा स्वयंसेवा भोजन पद्धतीमुळे खूप अन्न वाया जाते. अनेक जणांना एक वेळा सुद्धा पोटभर अन्न मिळत नाही आणि दुसरीकडे भरमसाट अन्न वाया जाते, म्हणून विनंती करावीशी वाटते की, बसेल जेवढे पोटात, तेवढेच घ्या ताटात!

**अरुण धुमाळ**/९८९०९०२९२३

### अनुभवलेली माणुसकी...

माणुसकी हा माणसाच्या जीवनातील सर्वांत सुंदर आणि मौल्यवान गुण आहे. आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात माणुसकीचे दर्शन क्वचितच घडते. पण जेव्हा ती अनुभवायला मिळते, तेव्हा मनाला एक वेगळीच ऊब मिळते. अशीच एक माणुसकीची घटना मला अनुभवायला मिळाली. एकदा मी एका वृद्ध व्यक्तीला रस्त्याच्या बाजूला झोपलेले पाहिले. त्यांच्याकडे कोणतीही मदत नव्हती आणि त्यांचे झोपलेले स्थान काहीसे अस्वस्थ करणारे होते. मी त्यांच्याजवळ गेलो आणि त्यांच्या गरजा काय आहेत याबद्दल विचारले. त्यांनी सांगितले की मला काही अन्नाची आवश्यकता आहे. मी त्या व्यक्तीसाठी काही खायला आणलं आणि त्यांच्या चेहऱ्यावर एक स्मित थोडक्यात उमटलं. त्या क्षणी मी अनुभवलं की माणुसकी ही फक्त चांगल्या कर्मांमध्ये नाही, तर एकमेकांसाठीच्या संवेदनशीलतेतही आहे. या अनुभवातून मला शिकायला मिळालं की साधी एक कृती किती मोठ्या प्रमाणात माणुसकी दाखवू शकते. आपल्या जीवनात आपण सर्व जण एकमेकांचे आधार बनायला हवे, कारण प्रत्येकाच्या आयुष्यात काही क्षण असतात जिथे त्यांना मदतीची आवश्यकता असते. माणुसकी म्हणजे एकमेकांच्या दुःखात सहभागी होणे, एकमेकांना समजून घेणे आणि आवश्यकतेनुसार मदत करणे. हेच माणुसकीचे खरे दर्शन आहे. आपणही आपल्या दैनंदिन जीवनात अशा छोट्या-छोट्या कृतींमधून माणुसकी जपली पाहिजे. कारण माणुसकीच माणसाला खऱ्या अर्थाने माणूस बनवते.

माणुसकी म्हणजे प्रेम, करुणा, सहानुभूती आणि एकमेकांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती. आपल्याला अशी एखादी घटना आठवते का ज्यात तुम्ही माणुसकीचा जिवंत अनुभव घेतला आहे. अचानक मदतीला आलेली व्यक्ती रस्त्यात अपघात झाला असताना अनोळखी व्यक्तीने मदतीचा हात पुढे केला. संकटात असताना शेजाऱ्यांनी केलेली मदत. एखाद्या आपत्तीमध्ये लोकांनी एकत्र येऊन दिलेला आधार. माणुसकी म्हणजे एक मूलभूत मूल्य, जे आपल्याला एकमेकांशी प्रेम, सहानुभूती, आणि आदराने वागण्यास शिकवते. माणुसकी ही कोणत्याही जाती, धर्म किंवा भाषेपलीकडे जाऊन सर्वांना जोडणारी एक नितांत सुंदर भावना आहे. आजच्या जगात विज्ञान, तंत्रज्ञान याबरोबर माणुसकी जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### ट्रम्पशाही विरोधात जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हुकूमशाही आणि युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जग वैतागले आहे. आपल्या हेकेखोरपणामुळे संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांच्यावर जगभरातील जनता वैतागली आहे कारण त्यांनी ज्याप्रकारे इराणवर हल्ला करून संपूर्ण जगाला वेठीस धरले ते कोणालाही आवडले नाही. ट्रम्प यांच्या हुकूमशाही वृत्तीला आता त्यांच्या देशातील जनताही वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने दीड वर्षापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्याविरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरांत होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. कोणताही विचार न करता इराणवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेत लाखो लोक रस्त्यांवर उतरले आहेत. आम्हाला राजा नको तर लोकशाही मानणारा राष्ट्राध्यक्ष हवा जो लोकशाहिवृत्तीने देशाचा कारभार करेल अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. ट्रम्प यांची छबी विदुषकी रूपात दाखवून डोनाल्ड ट्रम्प चालते व्हा! अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागतील.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २ एप्रिल २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

आजचा सामना
कोलकाता वि. हैद्राबाद
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : कोलकाता

सोलापूर तरुण भारत प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

**नम्र सूचना!**

छपाई साहित्याच्या दरवाढीमुळे नाईलाजास्तव आजपासून '**तरुण भारत**' अंकाची किंमत ८ रुपये करीत आहोत. तरी आमचे वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी आम्हाला नेहमीप्रमाणे सहकार्य करावे, ही विनंती.

**- व्यवस्थापक**

## महत्त्वाचे

### अटारी-वाघा सीमेवर बदलली रिट्रीटची वेळ

**अमृतसर :** अमृतसर येथील भारत-पाकिस्तान अटारी सीमेवर होणाऱ्या रिट्रीट सेरेमनीच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. अटारी-वाघा सीमेवर दररोज होणारी ही सेरेमनी पाहण्यासाठी मोठ्या संख्येने लोक येतात. नवीन निर्णयानुसार, आता रिट्रीट सेरेमनी संध्याकाळी ५.३० वाजता सुरू होऊन ६ वाजेपर्यंत चालेल. यापूर्वी रिट्रीट सेरेमनी ५ वाजता सुरू होऊन ५.३० वाजता संपत होती. हवामान आणि दिवसाच्या कमी-जास्त होणाऱ्या प्रकाशाचा विचार करून प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. प्रेक्षकांना चांगला अनुभव देण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वेळेत हा बदल आवश्यक होता, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. ही नवीन वेळ १ एप्रिलपासून लागू करण्यात आली आहे. म्हणजेच आता जे पर्यटक किंवा स्थानिक लोक ही सेरेमनी पाहण्याची योजना करत आहेत, त्यांना नवीन वेळेनुसारच पोहोचावे लागेल.

### बगदादमध्ये अमेरिकन पत्रकाराचे अपहरण

**बगदाद :** बगदादमध्ये मंगळवारी एका अमेरिकन महिला पत्रकाराचे अपहरण झाले. इराकी सुरक्षा दल अपहरणकर्त्यांचा शोध घेत आहेत. शेली किटल्सन, असे पत्रकाराचे नाव आहे. एका अमेरिकन अधिकाऱ्याने इराण-समर्थित इराकी मिलिशिया कताइब हिजबुल्लाहला यासाठी जबाबदार धरले आहे. इराकच्या गृह मंत्रालयाने एका परदेशी पत्रकाराचे अपहरण झाल्याची पुष्टी केली. परंतु, अधिक तपशील दिला नाही. या प्रकरणावर सार्वजनिकपणे बोलण्यास अधिकृत नसल्यामुळे नाव न सांगण्याच्या अटीवर अपहरण झालेली पत्रकार एक महिला आणि अमेरिकन नागरिक असल्याचे सांगितले.

### पतीचा मृतदेह पाहताच पत्नीने केली आत्महत्या


**बेंगळुरू :** बेंगळुर येथे एका तरुण दाम्पत्याच्या मृत्यूची घटना समोर आली आहे. शहरातील कोथनूर परिसरात राहणाऱ्या अभियांत्रिकी क्षेत्रात कार्यरत असलेल्या पती-पत्नीने अल्पावधीतच आपले प्राण गमावल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतांची ओळख भानू चंद्र रेड्डी आणि त्यांची पत्नी शाझिया अशी झाली असून दोघेही मूळचे तेलंगणा येथील असल्याची माहिती आहे. ही घटना थानीसंद्र मुख्य रस्त्यावरील एका उंच निवासी इमारतीत घडली.मिळालेल्या माहितीनुसार, पतीने स्वतःला घरात बंद करून घेतले होते.

### खाजगी ठिकाणी नमाज पठनावर बंदी

**प्रयागराज :** अलाहाबाद उच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. वैयक्तिक सुरक्षा व खाजगी मालमत्तेच्या नावाखाली सार्वजनिक सुव्यवस्था आणि शांतता धोक्यात आणता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खाजगी मालमत्तेवर नमाज अदा करण्यासाठी लोकांना एकत्र आणण्यास मनाई केली आहे. शांतता भंग झाल्यास प्रशासन कारवाई करण्यास स्वतंत्र आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. तारिक खान यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती सरल श्रीवास्तव आणि न्यायमूर्ती गरिमा प्रसाद यांच्या न्यायासनाने हा आदेश दिला. याचिकाकर्ते तारिक खान यांनी रमजानच्या काळात खाजगी मालमत्तेवर नमाज अदा करण्यावरील बंदी आणि शांतता भंग केल्याबद्दल जारी केलेल्या दंडाला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. न्यायालयाने या प्रकरणी बरेलीचे जिल्हाधिकारी आणि एसएसपी यांना समन्स बजावले होते. न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाचे पालन करत बरेलीचे जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ पोलिस अधीक्षक स्वतःहा हजर झाले. सुनावणीदरम्यान, सरकारचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त महाधिवक्ता अनूप त्रिवेदी यांनी न्यायालयाला माहिती दिली की, याचिकाकर्ता सुरक्षेच्या नावाखाली नियमांचा गैरवापर करत आहे

# 'समृद्धी'वर अपघात आठ महिलांचा मृत्यू

**सहा जखमी; ट्रकची पिकअप व्हॅनला धडक**



◆ **जालना, १ एप्रिल**

समृद्धी महार्गावर एका भरधाव ट्रकने महिंद्रा पिकअपला उडवल्याने भीषण अपघात झाला. यात आठ महिलांचा जागीच मृत्यू तर पाच ते सहा जण जखमी झालेत. ही घटना बुधवारी सायंकाळी जामनेर-कडवंची शिवारात घडला. माहिती मिळताच महामार्ग पोलिस व स्थानिक पोलिसांनी घटनास्थळ गाठून बचावकार्य सुरू केले. मृतकांच्या कुंटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांच्या मदतीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर गवत काढण्याचे काम सुरू होते. त्यासाठी या महिला मजूर आल्या होत्या. जामवाडी शिवारात महामार्गाच्या सफाईचे काम आटोपून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पिकअपमध्ये बसत होत्या. त्याचवेळी नागपूरमार्गे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकने पिकअपला पाठीमागून जोरदार धडक दिली. यात सात महिलांचा जागीच मृत्यू झाला तर पाच ते सहा जण जखमी झाले. जखमींना तातडीने जालन्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी तीन महिलांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांची संख्या वाढू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

(तभा वृत्तसेवा)

### कामगारांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह

या अपघातात कडूबाई रामदास मदन, ताराबाई गहीनाजी चौधरी, लक्ष्मीबाई संतोष मदन, अल्का दादाराव आदमाने, मीना परमेश्वर आदमाने व कांचन प्रकाश आदमाने या महिला मजुरांचा मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. महिनाभराच्या आत हा दुसरा मोठा अपघात आहे. यापूर्वी करमाडजवळ रस्ता दुरुस्तीचे काम करुन जेवण करत असताना तीन कामगारांना ट्रकने चिरडले होते. समृद्धी महामार्गावर वारंवार घडणाऱ्या अपघातामुळे कामगारांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ओव्हरस्पीड आणि कामगारांच्या सुरक्षेसाठी असलेल्या नियमावलींची अंमलबजावणी होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.

# तीन मुलांना विष पाजून वडिलांची आत्महत्या

## तीनही मुलांची प्रकृती चिंताजनक; सिव्हिल पोलीस चौकीत नोंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

वडिलांनी पोटच्या तीन मुलांना विष पाजून आत्महत्या केल्याची घटना बुधवार, १ एप्रिल रोजी घडली आहे. भीमण्णा वाघमारे, वय ३४, रा. तिर्हेगाव, ता. दक्षिण सोलापूर असे मृत पावलेल्या वडिलाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मयत भीमण्णा वाघमारे आणि पत्नी यांच्यामध्ये घरगुती कारणावरून वाद झाले होते. वाद झाल्याने पत्नी देगाव येथे माहेरी गेली होती. पत्नी आणि माझ्यामध्ये वाद होवून पत्नी माहेरी गेली असल्याची माहिती भीमण्णा यांनी नातेवाईकांना दिली. नातेवाईकांनी देगाव येथे जाऊन भीमण्णा यांच्या पत्नीला समजावले असता पत्नीने सासरी येण्यास नकार दिला. भीमण्णा याने पत्नीस फोन करून सासरी येण्यास आग्रह केला. परंतु पत्नीने येण्यास नकार दिल्याच्या नैराश्यातून



तीन मुले जानवी भीमण्णा वाघमारे, प्रगती भीमण्णा वाघमारे आणि मुलगा बाबू भीमण्णा वाघमारे यांना वळसंग जवळच्या शेतात नेऊन विषारी औषध पाजून स्वतःही ते पिल्याने भीमण्णा वाघमारे यांचा मृत्यू झाला. विषबाधा झालेल्या तिन्ही मुलांवर सध्या सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलांची प्रकृती सध्या चिंताजनक असून त्यांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत.

या घटनेची नोंद सोलापूर सिव्हिल पोलीस चौकीत करण्यात आली आहे. भीमण्णा वाघमारे यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. घरगुती कलह किंवा आर्थिक विवंचना यातून हा प्रकार घडला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

# घुसखोरांच्या संरक्षणासाठी काँग्रेसचा कायदा आणण्याचा प्रयत्न

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आरोप

**गोगामुख, १ एप्रिल**

आसाममध्ये काँग्रेस सत्तेत आल्यास हा पक्ष घुसखोरांना संरक्षण देण्यासाठी कायदा तयार करेल, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केला. मात्र, भाजपा आणि सहकारी असे होऊ देणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

बहुसंख्यांना अल्पसंख्य करणे आणि घुसखोरांची कायम स्वरूपाची मतपेढी निर्माण करण्याचा काँग्रेसचा उद्देश आहे, असे नरेंद्र मोदी यांनी धेमाजी जिल्ह्यातील गोगामुख येथील प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले. आसाममधील घुसखोरांचे संरक्षण करण्यासाठी नवीन कायदा आणला जाईल, असे काँग्रेस नेते उघडपणे सांगत आहेत.

ते घुसखोरांना पाठिंबा देत आहेत. मुस्लिम लीगने फाळणीच्या वेळी केले तशाच प्रकारे काँग्रेस देशाचे विभाजन करण्याच्या प्रयत्नात आहे, असा आरोप त्यांनी केला. डॉ. आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानाच्या पाठीत काँग्रेसने सुरा खुपसला. भाजपा सत्तेत आल्यास आसामची अस्मिता जपण्यासाठी समान नागरी कायदा लागू करेल आणि घटनेतील सहाव्या अनुसूचीअंतर्गत आदिवासींचे संरक्षण करेल, असे नरेंद्र मोदी म्हणाले.



**भाजपा हॅट्ट्रिक साधेल**

दहा वर्षांच्या सत्ताकाळात भाजपाने सुशासनाच्या नव्या पर्वाची सुरुवात केली. आसाममध्ये केवळ भाजपाच्या नेतृत्वातील रालोआच अत्याधुनिक पायाभूत सुविधा उभारू शकते. जनतेच्या आशीर्वादाने आसामच्या निवडणुकांमध्ये भाजपा हॅट्ट्रिक साधेल, तर काँग्रेस निवडणुकीतील पराभवाचे शतक पूर्ण करेल, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# मध्यपूर्वेकडे अमेरिकेचे हजारो सैनिक रवाना

**युद्धाची तीव्रता वाढवण्याची धमकी**

**वॉशिंग्टन :** इराणसोबतच्या चर्चेत प्रगती असल्याचा दावा एकीकडे अमेरिकेने केला असला, तरी कोणताही करार न झाल्यास युद्धाची तीव्रता वाढवली जाईल, अशी धमकीही दिली आहे. याच पृष्ठभूमीवर अमेरिकेचे हजारो अतिरिक्त सैनिक मध्यपूर्वेच्या दिशेने रवाना होत आहेत.

विमानवाहू नौका यूएसएस जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश मंगळवारी मोहिमेवर रवाना झाली असून, तीन विनाशिकांसह ती मध्यपूर्वेकडे जाणार असल्याचे अमेरिकेच्या दोन अधिकाऱ्यांनी सांगितले. या 'कॅरियर स्ट्राईक ग्रुप'मध्ये सहा हजारांपेक्षा जास्त नौसैनिकांचा समावेश आहे. ८० व्या एअरबॉर्न डिव्हिजनचे हजारो सैनिकही मध्यपूर्वेत दाखल होत असताना ही घडामोड घडली, असे दोन अमेरिकी अधिकाऱ्यांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले. या सैनिकांपैकी बहुतांश सैनिक हे युद्धापूर्वीच नियोजित करण्यात आलेल्या सैन्य-फेरबदलाचा भाग असले, तरी काही सैनिक हे अशा जवळपास १५०० पॅराट्रुपर्सपैकी आहेत.

# राकाँचे विलीनीकरण नाहीच

## शरद पवार गटाने भूमिका केली स्पष्ट

◆ **पुणे, १ एप्रिल**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि अजित पवार गट यांच्यातील संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना पुन्हा एकदा पूर्णविराम देण्यात आला आहे. पक्षाच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, दोन्ही गट एकत्र येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच याबाबत पुढे कोणतीही चर्चा करायची नसल्याचे पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी ठरविले आहे.

शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे म्हणाले की,'मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पक्षाच्या विलीनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. याबाबत उगाचच अफवा पसरवल्या जात आहेत. या ठिकाणी कोणतीही राजकीय बैठक झाली नाही किंवा विलीनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर आता विलीनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा करायची नाही, असे पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी ठरविले आहे.'

त्यामुळे पक्षाच्या विलीनीकरणाचा प्रश्न संपुष्टात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतंत्र पक्ष म्हणून काम करत असून पक्षाच्या बळकटीकरणासाठी सर्व कार्यकर्त्यांनी काम करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावरही या वेळी टीका करण्यात आली. तटकरे वारंवार चुकीची माहिती पसरवत असून ते खोटे दावे करत असल्याचा आरोप प्रवक्त्यांनी केला. विलीनीकरणाच्या चर्चांबाबत होणारा संभ्रम अशा वक्तव्यांमुळे वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

(तभा वृत्तसेवा)

# चंदीगडमधील पंजाब भाजपाच्या कार्यालयाबाहेर ग्रेनेड हल्ला

**खलिस्तानी अतिरेक्याने स्वीकारली जबाबदारी**

◆ **चंदीगड, १ एप्रिल**

येथील सेक्टर-३७ मधील पंजाब भाजपाच्या कार्यालयाच्या बाहेर बुधवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास ग्रेनेड हल्ला करण्यात आला. या हल्ल्याची चित्रफीत समोर आली. त्यात एक हल्लेखोर पिन काढून ग्रेनेड भिरकावत असल्याचे आणि त्यानंतर पळ काढत असल्याचे दिसून आले. या हल्ल्याची जबाबदारी खलिस्तानी अतिरेक्याने स्वीकारली आहे.



हा साधारण गावठी ग्रेनेड नाही, असे पोलिस सूत्रांनी चित्रफीत पाहिल्यानंतर सांगितले. यापूर्वीही पंजाबमध्ये निळ्या रंगाचे ग्रेनेड जप्त करण्यात आले होते, अशी माहिती गुप्तचर विभागातील सूत्रांनी दिली. हे ग्रेनेड पाकिस्तानातून ड्रोनच्या मदतीने तस्करी करून आणले जात आहेत. मात्र, या प्रकरणात पोलिसांनी अधिकृतपणे कोणतीही माहिती दिली नाही. ग्रेनेड हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आणि संपूर्ण परिसरात पाळत वाढवण्यात आली. पोलिस प्रत्येक पैलूची तपासणी करीत आहेत. या हल्ल्यात कोण सहभागी आहे आणि त्यामागील हेतू काय, याचा तपास पोलिस करीत आहेत.

सीसीटीव्हीतील दृश्यांच्या आदारे पोलिस तपास करीत आहेत. या हल्ल्याची जबाबदारी खलिस्तानी अतिरेकी सुखजिंदरसिंगने समाज माध्यमावर पोस्ट करीत घेतली. हा हल्ला १ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आला. या माध्यमातून भारतीय यंत्रणेला संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे, असे त्याने पोस्टमध्ये म्हटले.

पंजाबमधील शीख युवकांच्या विरोधातील कारवाईला उत्तर दिले जाईल. गुरदासपूर येथीर रणजितसिंगच्या मारेकऱ्यांना सोडणार नाही, असेही पोस्टमध्ये म्हटले आहे. या पोस्टमध्ये खालसा पंथ आणि खलिस्तानबद्दल घोषणाही लिहिल्या आहेत. या पोस्टबाबत पोलिसांनी अधिकृत दुजोरा दिलेला नाही. मात्र, सुरक्षा यंत्रणा या दिशेने तपास करीत आहेत.

(वृत्तसंस्था)

# प्रदूषित नद्या टाकणार कात

● पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापनेस मंजुरी ● मुख्यमंत्री अध्यक्ष, तर २१०० कोटींच्या निधीची तरतूद

◆ **मुंबई, १ एप्रिल**

राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचा कायापालट करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याच्या प्रस्तावास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या नागपूरच्या नाग नदीच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाला आता मोठी गती मिळणार आहे.



देशातील १० प्रमुख नद्यांपैकी नर्मदा, तापी, गोदावरी आणि कृष्णा या चार नद्या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२५ च्या अहवालानुसार देशात एकूण २९६ प्रदूषित नदी पट्टे असून त्यापैकी ५४ पट्टे महाराष्ट्रात आढळतात. मिठी, मुळा-मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा आदी नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्राधिकरण निर्णायक भूमिका बजावणार आहे. या प्राधिकरणाच्या स्थापनेमुळे नाग आणि चंद्रभागा या नद्यांमधील सांडपाणी प्रक्रिया, नदीकाठचे सौंदर्यीकरण आणि अतिक्रमणे हटवण्याचे निर्णय आता स्थानिक स्तरावर न रेंगाळता थेट राज्य स्तरावरून मार्गी लागतील. नागपूरच्या पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर स्थापन होणाऱ्या या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री उपाध्यक्ष असतील. वित्त, नगरविकास, जलसंपदा, उद्योग तसेच ग्रामविकास व पंचायतराज मंत्री सदस्य म्हणून कार्य करतील. पर्यावरण विभागाचे सचिव सदस्य-सचिव म्हणून जबाबदारी सांभाळतील. प्राधिकरणाच्या कामकाजासाठी सुमारे २ हजार कोटी रुपयांचा निधी प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उभारला जाणार आहे.

**एससी आरक्षण उपवर्गीकरणाबाबत समिती**

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाबाबत उपवर्गीकरण समितीच्या अहवालावर राज्य मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाल्यावर या विषयावर प्राप्त निवेदने, अर्जांचा विचार करण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

### दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीमध्ये भरीव वाढ



राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे शिशुवर्ग ते आठवी, नववी ते दहावी तसेच अकरावी व बारावीत शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत भरीव वाढ होणार आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजना ८ ते ३४ वर्षे जुन्या आहेत. निर्णयानुसार दिव्यांगत्वाच्या सर्व २१ प्रकारातील राज्यातील शिशुवर्ग ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये, नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रूपये (निवासी), ६०० रूपये (अनिवासी), अकरावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना दरमहा १००० रूपये (निवासी), ८०० रूपये (अनिवासी) शिष्यवृत्ती देण्यात येईल. यापूर्वी शिष्यवृत्तीची रक्कम दरमहा १०० ते २०० रूपयांच्या दरम्यान होती. याशिवाय अकरावी व बारावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी दरमहा १५० रूपये वाचक भत्ता आणि दरवर्षी प्रत्यक्ष खर्चाच्या मर्यादेत १५०० रूपये अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

**आता भूकरमापक पदाऐवजी परिरक्षण भूमापक पद**

भूमी अभिलेख विभागातील गट क संवर्गातील भूकरमापक हे पद रद्द करून परिरक्षण भूमापक असे पद निर्माण करण्यास आज बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. ही पदे रद्द करण्यात आलेल्या भूकरमापक संवर्गातून नियमित पदोन्नतीने व विभागीय परीक्षेद्वारे प्रत्येकी ४० टक्के आणि सरळसेवेने २० टक्के या प्रमाणात भरली जातील.

(वृत्तसंस्था)

# ॲमेझॉनच्या डेटा सेंटरवर इराणचा हल्ला



◆ **तेहरान, १ एप्रिल**

तंत्रज्ञान क्षेत्रातील अमेरिकी कंपन्यांवर हल्ला करण्याची धमकी इराणने चोवीस तासांतच प्रत्यक्षात उतरवली. या देशाने बहरीनमधील ॲमेझॉनच्या डेटा सेंटरवर हल्ला केला. हल्ल्यानंतर बहरीनमधील बँकिंग यंत्रणा आणि विमान सेवा ठप्प झाल्याचे वृत्त आहे.

मात्र, या हल्ल्यामध्ये डेटा सेंटरला थेट लक्ष्य करण्यात आले नव्हते. जवळच्या परिसरात झालेल्या ड्रोन हल्ल्यांच्या परिणामामुळे येथील कामकाज विस्कळीत झाले, असे सांगण्यात आले. बहरीनने 'एक्स'वर एक पोस्ट शेअर केली. तथापि, त्यात ॲमेझॉनचा उल्लेख नव्हता.

मेटा, गुगल, ॲपल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या मोठ्या कंपन्यांच्या डेटाबेसवर हल्ले केले जातील, अशी धमकी इराणने दिली आहे. अमेरिकेतील एकूण १८ कंपन्यांना लक्ष्य केले जाईल, असे इराणने सांगितले. समाज माध्यमावर ॲमेझॉनचे नाव घेऊन लोक मोठ्या प्रमाणात पोस्ट करीत आहेत. ॲमेझॉनच्या डेटा सेंटरवर हल्ला झाल्यास, ॲमेझॉन नव्हे, तर जगभरातील वेबसेवा ठप्प होऊ शकतात.

डेटा सेंटर केवळ संबंधित कंपनीचे नसते. येथे जगभरातील कोट्यवधी वापरकर्त्यांचा डेटा असतो. वेगवेगळ्या कंपन्यांचाही डेटा असतो. ॲमेझॉन वेब सर्व्हिस म्हणजेच एडब्ल्यूएसवर हल्ला झाल्याचे सांगितले जात आहे. एडब्ल्यूएस जगातील मोठ्या क्लाऊड कंपन्यांपैकी एक आहे.

(वृत्तसंस्था)



# कोलकाता, हैदराबाद पहिल्या विजयासाठी उत्सुक

◆ **कोलकाता, १ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल२०२६) सहाव्या सामन्यात, गुरुवारी येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) व सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) हे संघ आमने-सामने उभे ठाकणार आहेत. हे दोन्ही संघ आपल्या हंगामातील पहिल्या सामन्यात पराभव पत्करून या सामन्यात उतरत आहेत.

वानखेडे स्टेडियमवर केकेआरला मुंबई इंडियन्सकडून सहा गड्यांनी पराभव पत्करावा लागला, तर एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर एसआरएचला गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून सहा गडी राखून पराभव पत्करावा लागला.

या हंगामात केकेआर व एसआरएच यांच्यात काही विलक्षण साम्ये आहेत. दोन्ही संघांची फलंदाजी मजबूत दिसत असली तरी, गोलंदाजी तितकी संतुलित नाही. दुखापतींची चिंता देखील दोन्ही संघांसाठी एक मोठा धक्का ठरली आहे.

केकेआर आपला प्रमुख वेगवान गोलंदाज मथिशा पाथिराना, याची वाट पाहत आहे, तो टी-२० विश्वचषकादरम्यान झालेल्या दुखापतीतून सावरत आहे. दरम्यान, सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सदेखील तंदुरुस्त होण्यासाठी संघर्ष करीत असून, आयपीएलच्या मध्यावर मैदानात परतण्याची त्याला आशा आहे.



अजिंक्य रहाणे



ईशान किशन

ईडन गार्डन्सवर गत काही हंगामात अनेकदा धावांचा पाऊस पडला आहे. फलंदाजीवर अधिक भर असलेले दोन संघ आमने-सामने येणार असल्याने, गुरुवारी चाहत्यांना भरपूर चौकार व षट्कारांची अपेक्षा करता येईल. मात्र, गोलंदाजच सामन्याचा निकाल बदलू शकतात.

ईडन गार्डन्स हे मैदान, विशेषतः अलीकडच्या वर्षांत, धावांचा पाठलाग करण्यासाठी अत्यंत अनुकूल ठरले आहे. टी-२० क्रिकेटमधील धावांचा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग याच मैदानावर आयपीएल २०२४ मध्ये पंजाब किंग्सने केला होता; २६ एप्रिल रोजी केकेआरविरुद्धच्या दुसऱ्या डावात त्यांनी २६२ धावांचा डोंगर उभारला होता. दव देखील सामन्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता आहे, त्यामुळे नाणेफेक जिंकणारा कर्णधार नक्कीच प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेईल. सुरुवातीच्या काही षटकांमध्ये चेंडू स्विंग होण्याची शक्यता आहे. जर सलामीचे फलंदाज तो कठीण काळ सुखरूप पार करू शकले, तर फलंदाजी करणारा संघ तुफान फटकेबाजी करीत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवू शकतो.

**कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर)** : अजिंक्य रहाणे (कर्णधार), फिन ॲलन, कॅमेरॉन ग्रीन, अंगकृष रघुवंशी (यष्टिरक्षक), रिंकू सिंग, रमणदीप सिंग, अनुकूल रॉय, सुनील नरेन, वरुण चक्रवर्ती, वैभव अरोरा, ब्लेसिंग मुझाराबानी. इम्पॅक्ट प्लेयर : कार्तिक त्यागी.

**सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच)** : ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, ईशान किशन (कर्णधार व यष्टिरक्षक), नितीश कुमार रेड्डी, हेनरिक क्लासेन, सलिल अरोरा, अनिकेत वर्मा, हर्ष दुबे, हर्षल पटेल, जयदेव उनाडकट, ईशान मलिंगा. इम्पॅक्ट प्लेयर : डेव्हिड पेन.

◂*(वृत्तसंस्था)*

## आजचा आयपीएल सामना

**कोलकाता नाईट रायडर्स वि. सनरायझर्स हैदराबाद**

**स्थळ** : ईडन गार्डन्स, कोलकाता

**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# विश्वनाथ, सचिन उपांत्यपूर्व फेरीत

## आशियाई मुष्टियुद्ध

◆ **उलानबातर, १ एप्रिल**

मंगोलियात सुरू असलेल्या आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी भारतीय मुष्टियुद्ध खेळाडूंनी आपली प्रभावी कामगिरी सुरूच ठेवली असून, विश्वचषक पदक विजेता सचिन सिवाच व विश्वनाथ सुरेशने बुधवारी स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.



सचिन सिवाच

६० किलो वजनी गटातील १६ जणांच्या फेरीतील लढतीत सचिनने मंगोलियाच्या बुयांदलाई बायरखूवर ४-१ अशा विभाजित निर्णयाने कडवी झुंज देत विजय मिळविला. अटीतटीच्या लढतीत संयम राखत त्याने अंतिम आठ जणांच्या संघात प्रवेश केला. आता त्याचा सामना चीन तैपेईच्या चेंग-वेई लीशी होईल.

विश्वनाथने किर्गिझस्तानच्या बेकझात एर्गेशोव्हवर ५-० अशा एकमताने निर्णयाने एकतर्फी विजय मिळवित उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्याने संपूर्ण लढतीत उत्कृष्ट तंत्र व रिंगवर उत्तम नियंत्रण दाखवत वर्चस्वपूर्ण प्रदर्शन केले. तो आता कझाकस्तानच्या विद्यमान विश्वविजेत्या संझार ताश्केनबेचा सामना करेल.



विश्वनाथ सुरेश

◂*(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### रेस-वॉकिंगमध्ये बेथलीन माक्रीला कांस्यपदक



**रायपूर** : येथे सुरू असलेल्या पहिल्या खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेत बुधवारी बेथलीन माक्रीने महिलांच्या रेस-वॉकिंग शर्यतीचे अंतर १:०५:१८ या वेळेत पूर्ण करीत कांस्यपदक पटकावले. या शर्यतीत ती झारखंडची नेहा खलखो (१:०४:०२) आणि ओडिशाची अलीश एक्का (१:०४:५९) यांच्या पाठोपाठ तिसऱ्या क्रमांकावर राहिली. शिलाँग येथील क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील बेथलीन ग्रेस माक्रीच्या प्रशिक्षकांना तिच्यामध्ये एक रेस-वॉकर (जलद चालणारी खेळाडू) म्हणून चमक अचानक दिसून आली. बेथलीनला या क्रीडा प्रकाराबद्दलच्या तांत्रिक बाबींसह फारशी माहिती नव्हती. गेल्या वर्षापर्यंत, मेघालयची ही तरुण खेळाडू मध्यम आणि लांब पल्ल्याची धावपटू म्हणून स्पर्धांमध्ये सहभागी होत असे. तथापि, २०२६ च्या सुरुवातीला तिला आपला क्रीडा प्रकार बदलण्याची सूचना देण्यात आली; ही सूचना तिच्या शारीरिक आणि मानसिक कणखरतेची कसोटी पाहणारी ठरली. आज तिच्या त्या सर्व कष्टांचे गोड फळ तिला मिळाले ■

### पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरला दंड

**मुल्लानपूर** : येथे गुजरात टायटन्सविरुद्ध झालेल्या आयपीएल सामन्यादरम्यान संघाने संथ गतीने षटके टाकल्याबद्दल पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. गुजरात टायटन्सचा तीन गडी राखून पराभव करीत पंजाब किंग्सने आपल्या आयपीएल २०२६ मोहिमेची विजयी सुरुवात केली. आयपीएलच्या आचारसंहितेतील कलम २.२२ अंतर्गत नियमांचे उल्लंघन दर्शविते. या हंगामातील त्यांच्या संघाची ही पहिलीच चूक असल्याने, अय्यरला १२ लाख रुपयांचा दंड करण्यात आला, असे एका प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. वेगवान गोलंदाज वैशाख विजयकुमार व लेग-स्पिनर युझवेंद्र चहलने मिळून पाच बळी टिपले. त्यामुळे पंजाब किंग्सने गुजरात टायटन्सला ६ बाद १६२ धावांवर रोखले. फलंदाजीमध्ये काहीशी अडखळती कामगिरी करूनही, पंजाबने १९.१ षटकांत विजयाचे लक्ष्य गाठले. युवा ऑस्ट्रेलियन फलंदाज कूपर कोनोलीने ४४ चेंडूंत नाबाद ७२ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

### रॉबर्ट लेवांडोस्कीने दिले निवृत्तीचे संकेत



**स्टॉकहोम** : फिफा विश्वचषकातील स्थान अगदी थोडक्यात हुकल्यानंतर रॉबर्ट लेवांडोव्स्कीने पोलंडसाठी आपला शेवटचा सामना खेळल्याचे संकेत दिले आहेत. प्ले-ऑफच्या अंतिम फेरीत व्हिक्टर ग्योकेरेसने ८८व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे स्वीडनने पोलंडवर ३-२ असा विजय मिळवला. या सामन्यानंतर, लेवांडोव्स्कीने इन्स्टाग्रामवर आपला कर्णधाराचा आर्मबँड उंचावून धरलेला एक फोटो पोस्ट केला. या फोटोसोबत त्याने निरोप घेण्याची वेळ हे गाणे जोडले होते. बार्सिलोनाचा हा स्ट्रायकर पोलंडसाठी पुन्हा खेळणार नाही, याची त्याने थेट पुष्टी केलेली नाही. यापूर्वीही काही वेळा असे प्रसंग आले होते, जेव्हा तो आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्त होईल असे वाटले होते. जर पोलंडने विश्वचषकासाठी पात्रता मिळवली असती, तर ३७ वर्षे वयाच्या लेवांडोव्स्कीचा समावेश या स्पर्धेतील सर्वात वयस्कर खेळाडूंमध्ये झाला असता. २०२२ च्या विश्वचषकानंतरही, त्यावेळी चाहत्यांचा निरोप घेतल्यासारखे वाटत असूनही, त्याने संघात कायम राहण्याचा निर्णय घेतला होता.

### प्रज्ञानंदचा सिंदारोव्हकडून पराभव

**पाफोस (सायप्रस), १ एप्रिल**

भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदला दमदार सुरुवातीनंतर आपल्या मोहिमेत मोठा धक्का बसला आहे. मंगळवारी येथे झालेल्या फिडे कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत तो उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हकडून पराभूत झाला. पांढऱ्या सोंगट्यांनी खेळताना झालेला हा पराभव प्रज्ञानंदसाठी महागात पडू शकतो. त्याने नेदरलॅण्डचा ग्रॅण्डमास्टर अनिश गिरीला पराभूत करून आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली होती. या पराभवानंतर हा भारतीय खेळाडू १.५ गुणांवर आला असून त्याला तातडीने सावरण्याची गरज आहे. सिंदारोव्हशिवाय स्पर्धेपूर्वीचा प्रबळ दावेदार असलेल्या अमेरिकन ग्रॅण्डमास्टर फॅबियानो कारुआनाने चीनच्या वेई यीला पराभूत केले. हा सामना पहिल्या तीन फेऱ्यांमधील सर्वात विचित्र सामन्यांपैकी एक ठरला.

# शेवटच्या पाच षटकांत फारशा धावा करू शकलो नाही : गिल

**मुल्लानपूर, १ एप्रिल**

फलंदाजी करताना शेवटच्या पाच षटकांचा पुरेपूर फायदा उठवण्यात आपल्या संघाला आलेले अपयशच निर्णायक ठरले, असे गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल याने म्हटले. मंगळवारी येथे झालेल्या आयपीएलच्या सलामीच्या सामन्यात पंजाब किंग्जने गुजरातवर मात केली. ही २१०-२२० धावांची खेळपट्टी असल्याचे वाटत होते. १७५ धावा ही एक चांगली धावसंख्या ठरेल असे आम्हाला वाटले होते; परंतु आम्ही सतत फलंदाज गमावत राहिलो व शेवटच्या पाच षटकांत फारशा धावा करू शकलो नाही, असे गिलने तीन गड्यांनी झालेल्या पराभवानंतर मान्य केले. युवा फलंदाज कोनोलीने फलंदाजी करताना दाखवलेला शांत आणि संयमी दृष्टिकोन पाहून मी खूप प्रभावित झालो, असे पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यर म्हणाला.

## खेळपट्टी सोपी नव्हती : पटेल

फलंदाजीसाठी ही खेळपट्टी सोपी नव्हती, असे गुजरात टायटन्सचे सहाय्यक प्रशिक्षक पार्थिव पटेल यांनी म्हटले आहे. एक संघ म्हणून, तुम्ही तुच्या खेळाडूंनी निकराचा लढा द्यावा अशी अपेक्षा करता. आम्ही हा सामना शेवटच्या षटकापर्यंत नेला, याचे मला समाधान वाटते, असे पटेल यांनी सांगितले. गत तीन-चार दिवसांपासून येथे पाऊस पडत होता व खेळपट्टी तयार करण्याचे काम मैदानातील कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्तम प्रकारे केले होते, असेही ते म्हणाले. पॉवरप्लेनंतर फलंदाजी करणे अजिबात सोपे नव्हते, असे त्यांनी स्पष्ट केले.

# जुलैमध्ये टी-२० मालिकेसाठी भारतीय संघ झिम्बाब्वेचा दौरा करणार

**मुंबई** : या वर्षी विश्वचषक विजेतेपद पटकावल्यानंतरची आपली पहिलीच मोहीम म्हणून, भारतीय संघ जुलैध्ये तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर जाणार आहे. भारतीय पुरुष संघ यजमान संघाविरुद्ध हरारे स्पोर्ट्स क्लब येथे अनुक्रमे २३, २५ व २६ जुलै रोजी तीन सामने खेळेल, अशी माहिती बीसीसीआयने बुधवारी एका निवेदनाद्वारे दिली. भारत व झिम्बाब्वे यांच्यात २०२६-२७ हंगामासाठी नियोजित असलेल्या दोन द्विपक्षीय मालिकांपैकी ही पहिली मालिका असेल. यानंतर, झिम्बाब्वेचा संघ तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारताचा दौरा करणार असून, हे सामने अनुक्रमे ३, ६ आणि ९ जानेवारी रोजी कोलकाता, हैदराबाद आणि मुंबई येथे खेळले जातील.

राज्य कॅडेट ज्यूदो स्पर्धा

# सोलापूरच्या मसोळेला रौप्य; शिंदेला ब्रॉंझ

**धुळे** : पुनीत बालन गृप प्रस्तूत ५२व्या राज्य कॅडेट गट ज्यूदो स्पर्धेमध्ये शासनाच्या क्रीडा प्रबोधिनी संघाने सहा सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य पदकांच्या कमाईसह सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

मुंबई संघाने दोन सुवर्ण दोन रौप्य आणि एक कांस्य पदक मिळवून उपविजेतेपदाच्या चषकावर हक्क सांगितला. गुणानुक्रमे कोल्हापूर जिल्हा दोन सुवर्णांसह तृतीय क्रमांकावर राहिला. या स्पर्धेत ६६ किलो गटात सोलापूरचा शंभुराजे मसोळे रौप्य तर ७३ किलोखालील गटात संकत शिंदे याने कांस्य संपादिले. धुळे येथील जिल्हा क्रीडा स्टेडीयम येथे नुकत्याच झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या हस्ते झाले.

# 'मिशन लक्ष्यवेध'चा खेळाडूंनी लाभ घेण्याचे आवाहन

## १५ एप्रिलपर्यंत जिल्हा क्रीडा कार्यालयात संपर्क साधा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१ एप्रिल-**

राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाकरिता 'मिशन लक्ष्यवेध' हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आलेला असून, या योजनेंतर्गत ॲथलेटिक्स, कुस्ती आणि लॉन टेनिस या तीन खेळांचे अनिवासी जिल्हा प्रतिभा विकास केंद्र सुरु करण्यास मान्यता मिळाली आहे.

या केंद्राअंतर्गत प्रत्येकी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून, पात्र खेळाडूंनी आपले अर्ज दि. १५ एप्रिल २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कुमठा नाका, सोलापूर येथे प्रत्यक्ष सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले.

**प्रवेशासाठी पात्रता व कागदपत्रे**

वयोमर्यादा ३१ डिसेंबर २०२६ रोजी २१ वर्षांखालील मुले/मुली, जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील २ वर्षातील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, ३ पासपोर्ट साईज फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र इ. आवश्यक आहे. तर महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक आहे. यासाठी ॲथलेटिक्स व कुस्ती - राज्यस्तरावरील सहभाग किंवा पदक प्राप्त खेळाडू , लॉन टेनिस -आयटी रँकींगमध्ये प्रथम तीन क्रमांक, राज्यस्तरावरील रँकींग किंवा पदक प्राप्त खेळाडू , वैद्यकीय तपासणी: शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैध फिटनेस प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**निवड झालेल्या खेळाडुंना मिळणार खालील सुविधा**

निवडलेल्या खेळाडूंना अनिवासी क्रीडा प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, क्रीडा साहित्य, स्पर्धांचे आयोजन, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, करिअर मार्गदर्शन, क्षमता विकास कार्यक्रम, पुरक आहार खर्च, देशांतर्गत/विदेशातील स्पर्धा सहभाग खर्च, वैद्यकीय उपचार व विमा सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# सद्दाम गारे, अनुराधा अचलेरे जिल्हा कबड्डी संघाचे कर्णधार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा कबड्डी संघाच्या कर्णधारपदी सद्दाम गारे, अनुराधा अचलेरे यांची निवड झाली.

जिल्हा कबड्डी संघटनेचे सचिव मदन गायकवाड यांनी पुरुष व महिला संघ जाहीर केले. हे संघ २ ते ६ एप्रिल दरम्यान सिन्नर नाशिक येथे होणाऱ्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेतील. सद्दाम हा अंजुमन क्रीडा मंडळाचा तर अनुराधा श्रीराम स्पोर्टस् क्लबची खेळाडू आहे.

त्यांचे अंजुमन क्रीडा मंडळाचे अध्यक्ष युसुफ विजापुरे, पप्पू गारे, मार्गदर्शक रफिक गारे, सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल जाधव, सहसचिव संतोष जाधव यांनी अभिनंदन केले.





**संघ : पुरुष** : सद्दाम उमर गारे, वेदांत सुनील चोरमाले, मुशरफ म.रफिक गारे, अनिकेत युवराज माने, बिरुदेव गणेश माने, आदित्य संतोष नरळे, आकाश गजानंद कोळी, आदर्श राजेश पुठ्ठा, आदित्य सचिन वाकसे, ओम राजशेखर, संदेश संजय राठोड, सोहम संतोष गायकवाड, विनय विलास नानजुंडे, समर्थ दत्तात्रय पवार. व्यवस्थापक : नितीन गुंजे, प्रशिक्षक : भक्तराज जाधव.

**महिला** : अनुराधा चंद्रकांत अचलेरी, पूजा गणेश जाधव, साक्षी भालचंद्र राठोड, प्रज्ञा नागेश माने, संजीवनी विलास गुरव, पवित्र येगप्पा पुजारी, मोनिका संतोष चव्हाण, वैष्णवी राहुल खोसे, ज्ञानेश्वर राहूल खोसे, श्रुती पुंडालिक बांदगार, सुधा सतीश कालमंडे, मेघना अमोल धोडमिसे, आयेशा सिकंदर तांबोली, पूजा अंबादास बेरे. व्यवस्थापक : प्रकाश जाधव, प्रशिक्षक: मदन गायकवाड

# आडकी, घुमे जिल्हा बास्केटबॉल संघाचे कर्णधार

## राज्य ज्युनियर बास्केटबॉल स्पर्धेसाठी सोलापूरचे संघ नाशिकला रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

जिल्हा ज्युनियर बास्केटबॉल स्पर्धेसाठी झुबेर अडकी व अन्वेशा घुमे यांची निवड करण्यात आली.



झुबेर आडकी



अन्वेशा घुमे

नाशिक येथे ३१ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या ७६ व्या 'स्टेट ज्युनियर बास्केटबॉल चॅम्पियनशिप'साठी सोलापूर जिल्ह्याचे मुले व मुलींचे रवाना झाले. या दोन्ही संघांची निवड सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव साकीब शेख यांनी जाहीर केले. मुलांच्या प्रशिक्षक म्हणून नावेद मुंशी तर मुलींसाठी माजिद पठाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघास सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के.डी. पाटील, उपाध्यक्ष मनोज यलगुलवार, खजिनदार दिनेश सारंगी आणि सहसचिव नावेद मुंशी, बीएफआय पंच मुकीम खान, उद्योजक अभिजित टाकळीकर आणि सोलापूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांनी शुभेच्छा दिल्या.

# ऑल इंडिया पोलिस टी-२० स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपद

## संघात सोलापूरच्या श्रीकांत लिंबोळेचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

दिल्ली येथे झालेल्या दुसऱ्या ऑल इंडिया पोलीस टी२० क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र राज्य पोलीस संघाने अंतिम सामन्यात आर पी एफ संघाला ९१ धावांनी हरवून विजेतेपद पटकाविले असून कर्णधार सुनील पाटील च्या नेतृत्वात खेळलेल्या महाराष्ट्र संघात येथील श्रीकांत लिंबोळेचा समावेश होता. यात यष्टिरक्षक श्रीकांत याने ४२ धावांसह ४ उत्तम झेल घेतल.

महाराष्ट्र राज्य पोलीस संघाच्या या कौतुकास्पद कामगिरी बद्दल पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त महासंचालक मधुकर पांडे, पोलीस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश व प्रवीण पडवळ यांनी विशेष अभिनंदन केले. मुख्य प्रशिक्षक रोहन बगाडे, संदेश चव्हाण तसेच निवड समितीचे संतोष कांबळे, दीपक पाटील व नीलेश भोसले यांचे मार्गदर्शन लाभलेल्या महाराष्ट्र संघात असलेल्या पोलिस लिंबोळेचा प्रशस्ती पत्रक देत विशेष सन्मान सोलापूरचे पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी केला. यावेळी पोलीस उपायुक्त खझड हसन गौर व विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, व. पो. नि. बंडगर आदी मान्यवर देखील उपस्थित होते.



# राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी सोलापूरच्या चौघांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी येथील चौघांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. या स्पर्धा दि. २५ एप्रिल ते ४ मे २०२६ दरम्यान होणार आहेत.

या संघामध्ये ५५ वर्ष वयोगटात डॉ. नीलकंठ पोतदार, ५० वर्षे वयोगटामध्ये मनीष रावत, ४५ वर्ष वयोगटामध्ये अनंत कुलकर्णी यांची तर ४० वर्षे वयोगटामध्ये विनोद मगजी यांची निवड झाली आहे. ही निवड सन २०२५ सालामध्ये झालेल्या सहा राज्य मानांकित स्पर्धेतील कामगिरीच्या आधारावर करण्यात आली आहे. या विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे ते सर्वजण या आगामी राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.



अनंत कुलकर्णी



मनिष रावत



नीलकंठ पोतदार



विनोद मगजी

यांच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान. सचिव झेड. एम. पुणेकर यांनी अभिनंदन केले आहे.



## अनाधिकृत ढाचा तातडीने पाडा, हिंदू समाजाचे प्रशासनाला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. १ एप्रिल-**

वेळापूर, (ता. माळशिरस) येथील सुमित्रानगर याठिकाणी अनाधिकृत सुरू असणारा मस्जिदची इमारत तातडीने जमीनदोस्त करून संबंधित व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत यासाठी वेळापूर येथील ग्रामपंचायत प्रशासन व पोलिस प्रशासनाला सकल हिंदू समाजाच्या वतीने जाहीर निवेदन देण्यात आले आहे.

प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनानुसार, सन २०२१ मध्ये सुमित्रा नगर वेळापूर या ठिकाणी मस्जिदचे बांधकाम सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ग्रामपंचायतला हिंदू नागरिकांनी तक्रार केली होती. या तक्रारीनंतर ग्रामपंचायतने संबंधितांना नोटीस काढली होती या नोटिसीला उत्तर देताना संबंधितांनी या ठिकाणी आम्ही कोणतेही धार्मिक स्थळ बांधत नसून राहण्यासाठी घर बांधत असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाला लिहून आश्वासन दिले होते. सदर वाद हा न्यायालयात ही गेला होता. मागील काही दिवसांपासून या परिसरामध्ये दररोज विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असल्याचे पुरावे हिंदू नागरिकांना मिळाल्यानंतर नागरिकांनी वेळापूर पोलीस ठाणे व ग्रामपंचायत कार्यालयात हा अनाधिकृत असणारा ढाचा तातडीने पाडावा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल अशा आशयाचे निवेदन दिले आहे.

### परदेशातील नागरिकांचे येणे-जाणे असल्याची स्थानिकांना शंका

सदर ठिकाणी आठ ते नऊ फूट उंच कंपाउंड घेण्यात आल्या असून या ठिकाणी परदेशातील नागरिकांचे येणे जाणे असल्याबाबत स्थानिकांना शंका आहे. या परिसरात आढळणारे व्यक्ती यापूर्वी कधीही तालुक्यात व जिल्ह्यात स्थानिकांनी पाहिले नसल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले आहे.



# शिक्षण विभागातील थकीत बिलांवरून आ. आसगावकर आक्रमक

## शालार्थ ते पीएफ प्रश्नांवर तत्काळ निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल**

राज्यातील शिक्षकांची थकीत बिले आणि प्रलंबित प्रशासकीय कामांवरून शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाला धक्का दिला. पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालयात दिवसभर ठाण मांडत त्यांनी थकीत बिलांचा आढावा घेतला आणि संचालक स्तरावरील सर्व बिले आजच्या आज मार्गी लावा, असे स्पष्ट निर्देश शिक्षण संचालक महेश पालकर यांना दिले. या धडक कारवाईमुळे शिक्षण खात्यात मोठी खळबळ उडाली आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिक्षण मंत्र्यांनी ३१ मार्चपूर्वी सर्व थकीत बिले देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक प्रकरणांमध्ये प्रशासनाकडून अपेक्षित गतीने काम होत नसल्याची बाब आमदार आसगावकर यांनी अधोरेखित केली. अधिकारी ऐनवेळी बिलांमध्ये किरकोळ त्रुटी दाखवून ती प्रलंबित ठेवतात, ही अत्यंत गंभीर बाब आहे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी हेतुपुरस्सर बिले अडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही ठामपणे मांडली. शिक्षकांच्या हक्काच्या देयकांमध्ये विलंब होणे अस्वीकार्य असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली.

केवळ थकीत बिलांपुरते मर्यादित न राहता, आमदार आसगावकर यांनी शिक्षकांच्या इतर जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरही लक्ष केंद्रित केले. शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे यांना प्रलंबित 'शालार्थ आयडी' तातडीने देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या आयडीअभावी अनेक शिक्षकांना वेतन व इतर शासकीय सुविधा मिळण्यात अडथळे येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच, कोल्हापूर जिल्ह्यातील शिक्षकांना भेडसावणाऱ्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) बिलांच्या समस्येवरही त्यांनी थेट हस्तक्षेप केला. आमदार आसगावकर यांच्या सूचनेनंतर शिक्षण संचालक महेश पालकर यांनी कोल्हापूर वेतन पथक अधीक्षकांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत पीएफ बिले तातडीने मंजूर करण्याचे निर्देश दिले.या सर्व घडामोडींमुळे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत प्रशासनावर दबाव निर्माण झाला असून, आगामी काळात या प्रश्नांच्या निवारणाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिक्षकांच्या हक्काच्या देयकांसाठी आमदार आसगावकर यांनी घेतलेला आक्रमक पवित्रा हा शिक्षण विभागासाठी इशारा मानला जात आहे.

आमदार जयंत आसगावकर यांच्या या 'ॲक्शन मोड'मुळे अनेक महिन्यांपासून रखडलेल्या फायलींना गती मिळाली असून, ३१ मार्चच्या अखेरीस शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या बैठकीत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे शिक्षक संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे.

शिक्षकांचे प्रश्न 'ऑन द स्पॉट' निकाली या बैठकीवेळी पुणे आणि कोल्हापूर विभागातून मोठ्या संख्येने शिक्षक बांधव उपस्थित होते. शिक्षकांनी आपले वैयक्तिक आणि सामूहिक प्रश्न आमदार जयंत आसगावकर यांच्यासमोर मांडले. यावेळी त्यांनी संचालक, उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी यांच्याशी थेट संवाद साधून अनेक तांत्रिक प्रश्न जागेवरच निकाली लावले.

## सोलापुरात दिवसा उकाडा अन् सायंकाळी अवकाळीचा राडा!

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूरमध्ये सध्या उन्हाचा तडाखा वाढला असून, रात्री आभाळी वातावरण निर्माण होवून काही भागात अवकाळीच्या पाऊसधारा येतात, विजांचा कडकडाट आणि वारेही वाहते. एकंदरीत, सोलापुरात दिवसा कडक ऊन आणि रात्री वादळी वारे-पाऊस असा निसर्गाचा खेळ गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. दरम्यान, सुगी निघायच्या वेळेला अवकाळी पाऊस येवू लागल्याने शेतकऱ्यांत धास्तीचे वातावरण तयार झाले आहे. गेल्या आठवड्यापासून तापमान वाढत आहे. २७ मार्च रोजी तर ४० अंशाच्या पुढे तापमान होते. गत महिन्यात ३ वेळा ४० अंशाच्या पुढे तापमान होते. या महिन्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १ एप्रिल २०२६ रोजीही ३९.२ अंश इतके तापमान होते. यामुळे दुपारच्या वेळी प्रखर सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटांमुळे नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत होते. सायंकाळी ४ वाजेनंतर आभाळी वातावरण निर्माण होवून हवेत गारवा निर्माण झाला आणि जिल्ह्याच्या काही भागात रात्री उशिराने अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. हे आभाळी वातावरण अजून आठवडाभर असेच राहण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त होत आहे.

## तामलवाडीच्या श्री विष्णू-महादेव चरणी हजारो भावीक लीन!

### कावड मिरवणूक, शेरणी, कुस्त्या व विविध सांस्कृतिक कार्यक्रम पडले पार





### आज होणार यात्रेची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**


तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा महोत्सव सोमवारपासून सुरू झाला होता. जवळपास ४ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावून श्रींचे दर्शन घेतले. दरम्यान, या यात्रेनिमित्त कावड मिरवणूक, शेरणी, जंगी कुस्त्या पार पडल्या आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना मिळाली. चार दिवस चालणाऱ्या या यात्रेची सांगता गुरूवारी हनुमान जयंतीच्या संकीर्तनानंतर होणार आहे.

या यात्रेनिमित्त पालखी नगर प्रदक्षिणा व श्री विष्णू महादेव मंदिरात संकिर्तन सेवा व हरिजागर कार्यक्रम पार पडला. रात्री १२ नंतर हजारो भाविकांनी दंडवत घातला. ३० मार्च रोजी श्री विष्णू महादेव मंदिरात महाअभिषेक आणि महाआरती व संध्याकाळी ७ ते १० वाजेपर्यंत भव्य-दिव्य 'कावड मिरवणूक' सोहळा पार पडला. यानंतर सायंकाळी १० ते १२ वाजेपर्यंत भारूडांच्या कार्यक्रम रंगला. मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी श्री विष्णू महादेव मंदिरात शेरण्या, भाविकांची नवस परिपूर्ती करणे आदी विविध कार्यक्रम पार पडले. तर सायंकाळी ५ वाजता जंगी कुस्ती फड रंगला. यावेळी तामलवाडीसह पंचक्रोशीतील अनेक पैलवानांनी हजेरी लावली.

मुख्य यात्रेच्या दिवशी दिवसभर श्रीविठ्ठल-रूक्मिणी मंदिरात महाप्रसादाचे आयोजन केले आहे. १ एप्रिल रोजी रात्री १० वाजता श्रींची पालखी नगर प्रदक्षिणा झाली. दि. २ एप्रिल रोजी हनुमान जयंती निमित्त गुलालाचे श्री मारूती मंदिरात संकिर्तन होऊन पांडुरंग विश्वनाथ विभुते यांच्या घरी महाप्रसाद होवून या यात्रेची सांगता होणार आहे.

## निधन वृत्त...

### बाळासाहेब बरीदे



**बार्शी, दि. १ एप्रिल-**

बार्शीतील सोन्या मारुती चौक येथील सेवानिवृत्त लिपीक बाळासाहेब हिरालाल बरीदे (वय ७७) यांचे बुधवार, दि. १ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. बार्शीतील लिंगायत गवळी समाजाचे ते प्रमुख मार्गदर्शक होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### बापूराव तटाळे



**सांगोला, दि. १ एप्रिल-**

लक्ष्मीदहिवडी (ता. मंगळवेढा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बापूराव तटाळे यांचे मंगळवार दि. ३१ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते सांगोला विद्यामंदिर व ज्यु.कॉलेजचे प्रा.शिवशंकर तटाळे यांचे वडील होते.

### श्रीनिवास गरदास



**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

विडी घरकुल हैदराबाद रोड भागातील रहिवासी व म्हाडा ऑफिसचे माजी अधिकारी श्रीनिवास आगय्या गरदास वय (६०) यांचे दि. १ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, जावई असा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर शांती चौकातील पद्मशाली स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## आयएएस घोलप यांच्या जीवनप्रवासावरील पुस्तकांतून युवकांना प्रेरणा मिळेल : मंजुळे



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ एप्रिल-**

आयएएस रमेश घोलप यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून यश मिळवले. प्रशासकीय सेवाकाळात दुर्गम भागात पोहचून वंचितांना त्यांचे न्याय हक्क मिळवून दिले. त्यामुळेच यांच्यासारखी समाजाची चिंता, काळजी वाहणारी माणसं समाजाला भारी वाटतात. त्यांच्या जीवनप्रवासावरील पुस्तकांतून युवकांना संघर्षातून ही ध्येय गाठण्याची व समाजासाठी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी केले.

आयएएस रमेश घोलप लिखीत 'इथे थांबणे नाही' या जीवन प्रवासाच्या सुधारित आवृत्तीचा तसेच घोलप यांचा संघर्ष, सेवा आणि जाणिवांचा प्रवास यांचे प्रतिबिंब असणाऱ्या उमेद प्रतिष्ठान निर्मित 'वाट रेखाटणारी पावलं (ग्राऊंडेड ग्लोरी) या मराठी व इंग्रजी अशा द्विभाषिक कॉफी टेबल बुकच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बी.वाय.यादव उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर सभापती विजय गरड, प्रा. तानाजी ठोंबरे, राजा माने, विमल घोलप, रुपाली घोलप, नंदकुमार जगदाळे, पी टी पाटील, प्राचार्य डॉ दीपक गुंड, बीडीओ अमोल ताकभाते, शिवदास नलावडे आदी उपस्थित होते. प्रकाशक मनोज अंबिके यांनी दर्जेदार पुस्तक निर्मीतीसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

आमदार दिलीप सोपल, बीव्हीजीचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उमेश घोलप यांनी उमेद प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन रामचंद्र इकारे यांनी केले. उमेद प्रतिष्ठानचे दिनेश घोलप, निलेश झालटे, मयूर गलांडे, खंडू डोईफोडे, बाळासाहेब ढेंबरे आदींनी परिश्रम घेतले.

## सैनिक कुटुंबियांसाठी ७ एप्रिल रोजी मेळावा



**सोलापूर दि. १ एप्रिल-**

सैनिक कुटुंबियांना कायदेशीर मदत तसेच कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी सोलापूर येथे ७ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे कायदेशीर मदत व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समितीमार्फत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे दर मंगळवारी सैनिक कुटुंबियांना विनामूल्य कायदेशीर मदत उपलब्ध करून दिली जात आहे. स्थापनेपासून आजपर्यंत ७९ प्रकरणांमध्ये तज्ञ वकिलांच्या माध्यमातून सैनिक कुटुंबियांना कायदेशीर सल्ला देण्यात आला असून, यामध्ये फौजदारी, दिवाणी, महसूल तसेच इतर प्रकरणांचा समावेश आहे. काही प्रकरणे तालुका विधी सेवा कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहेत. याशिवाय ७० लाभार्थ्यांना थेट कायदेशीर मार्गदर्शनाचा लाभ मिळाला आहे. कार्यक्रमास जास्तीत जास्त सैनिक कुटुंबियांनी उपस्थित राहून विनामूल्य कायदेशीर मदतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि.) यांनी केले आहे. कार्यक्रमास पॅनल वकील लक्ष्मण पाटील उपस्थित राहणार आहेत.

Classifieds

**पाहिजेत**
पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन, ऑफलाईन काम करून अधिक इन्कम मिळवा. संधी सार्वांसाठी.
प्रियांका मॅडम
मो. 9226340650

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

Omhra {bbmd

Ir Zqgh XdnM H$mXbJmd, Vm. ~meu ¶m XdñWmZÀ¶m 'mO H$mXbJmd,Vm. ~meu ¶Wrb eVO{'Zr-

| A.Z. | JQ Z~a | jì h.Ama. | AmH$ma é.n. |
|---|---|---|---|
| 01) | 118 | 0-76 | 1.94 |
| 02) | 120 | 0-56 | 0.87 |
| 03) | 175 | 1-80 | 4.94 |
| 04) | 46 | 0-34 | 0.97 |
| ०५) | 48 | 3-61 | 11.06 |

वरीलप्रमाणे देवस्थानच्या मालकीच्या कांदलगांव शिवारातील शेतजमिनी सन २०२६-२७ च्या सालासाठी कसण्यासाठी (खंडाने) देणे आहेत. त्याचा जाहीर लिलाव **रविवार दि. ५ एप्रिल २०२६** रोजी सकाळी ८-३० वाजता **कांदलगांव येथील नृसिंह मंदिरात** होणार आहे. सदर लिलावात ज्याला भाग घ्यावयाचा आहे त्यांनी मंदिरात उपस्थित राहावे. लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तीपैकी जो जास्त रक्कम देईल त्याला जमीन कसण्यासाठी देण्यात येईल. लिलावात भाग घेण्यासाठी ५०००/- (पाच हजार) रुपये अनामत रक्कम भरणे बंधनकारक आहे. लिलाव मंजूर झाल्यानंतर त्या दिवशी १० टक्के व उर्वरित रक्कम ८ (आठ) दिवसांत देणे बंधनकारक आहे.आठ दिवसात रक्कम न दिल्यास १० टक्के पैसे जप्त केले जातील व पुन्हा नव्याने लिलाव काढला जाईल.

**टीप** १) :- सदरचा लिलाव आयत्या वेळेची परिस्थिती पाहून तीन वर्षांसाठी देण्याबाबत पंच कमिटी निर्णय घेईल. २ )जमीन ही कसण्यासाठी देण्यात येणार आहे. जमीन पडीक ठेऊन चालणार नाही. ३) लिलाव रद्द करणे बाबतचे सर्वाधिकार हे चेअरमन यांना असतील.

**स्थळ : कांदलगांव**
**दिनांक : ०२/०४/२०२६**

सही/-
**हरिदास बजरंग फुरडे,**
चेअरमन, श्री नृसिंह देवपंच, कांदलगांव
ता. बार्शी, जि. सोलापूर

Online ति. वि. BookMyShow वर सुरू. तिकिटांसाठी संपर्क : गुरु वठारे 9011474400
म.टा. सन्मान विजेते
पुनरुज्जीवित सर्वोत्कृष्ट नाटक
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री मयुरी देशमुख
उद्या संध्या. ७
हुतात्मा स्मृती मंदिर सभागृह, सोलापूर
तिकीट विक्री नाट्यगृहावर सुरू
त्रिकूट प्रस्तुत ALL TIME CLASSIC मॅनमेकर्स मीडिया निर्मित
सविता दामोदर परांजपे
फक्त ५० प्रयोग



लेखक : शेखर ताम्हाणे, दिग्दर्शक : राजन ताम्हाणे
निर्माते : निरंजन ताम्हाणे, मैत्रेय रिसबूड, आलाप मोहिले
मयुरी देशमुख, आस्ताद काळे, संग्राम समेळ, राजन ताम्हाणे
सूत्रधार श्रीकांत तटकरे: 9082468969, 9920571876

**ई-निविदा सूचना क्र. (०१) सन २०२६-२७**
**स्वच्छता विभाग**

मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडून घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी दि. ०१/०४/२०२६ ते दि. ०८/०४/२०२६ या कालावधित ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे. अटी व शर्तीसह सविस्तर निविदा सूचना निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०८/०४/२०२६ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalot@gmail.com
जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यू/कावि/५५/२०२६ दि. ३०/०३/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. लक्ष्मण महादेव माशाळे** - अर्जदार
रा. बागेहळ्ळी, ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म-मृत्यू नोंदणी, कार्यालय** - सामनेवाला
**ग्रामपंचायत, बागेहळ्ळी, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील लक्ष्मण महादेव माशाळे, रा. बागेहळ्ळी, ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगी पूनम लक्ष्मण माशाळे यांचा जन्म दि. १५/०५/२००८ रोजी मौजे बागेहळ्ळी, ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतु माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद पूनम लक्ष्मण माशाळे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २१/०५/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. न

हे आज दि. ३०/०३/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
सही/-
**(विनायक सुधीर मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी शहर हद्दीतील व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, बार्शी पैकी शहर येथील म्यु.पल हद्दीतील बिनशेती प्लॉट याचा बिनशेती गट नं. ९४३/९ यापैकी लेआऊट मधील माझ्या मालकीचा प्लॉट नं. ८ याचे क्षेत्रफळ चौ.मी. १३३.७५ याचा बिनशेती आकार ८८.00 आहे.

वर नमुद केलेल्या मिळकत हि महादेव लक्ष्मण शिंदे यांचे खरेदी मालकीची व व प्रत्यक्ष कब्जे वहिटीच्या असुन सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी महादेव लक्ष्मण शिंदे यांचे नावाची नोंद आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्री करणेचे ठरविलेले आहे, त्याची माहिती आमचे अशिलास दिली त्याप्रमाणे सदरहु मिळकतीबाबत खरेदी विक्री संदर्भात बोलणी झालेली असुन सदर मिळकत आमचे अशिलास मालकी हक्काने कायम खुषखरेदी देण्याचे ठरलेले आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलाकडुन त्यांनी इसारा दाखल रक्कम ही स्विकारलेली आहे.

तरीही वर नमुद मिळकतीबाबत आज रोजी बजाज फायनान्स शाखा बार्शी या फायनान्सचे हफ्ते बंदीचे कर्ज आहे. सदरचे कर्ज सोडुन कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकत ही निजोखमी व बिन बोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजुन अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहुन कोणतीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे.ता. ३०/०३/२०२६

सही/-
**ॲड. सुदर्शन उत्रेश्वर सोनवणे**
**एम.बी.ए., एलएल.बी**
**मो. ९८३४५८७८२६**
**ऑफिस - जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिके मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, 2002' च्या कलम 13 (2) अन्वये सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडकडून (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे आणि त्यांचे व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज अनुत्पादक मालमत्ता (NPA) म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्याकडून देय असलेली रक्कम, खालील तक्त्यात अधिक तपशीलवार वर्णन केल्यानुसार, जारी केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केली आहे आणि उक्त रकमेवर पुढे व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 168133845 | गृहकर्ज | 1. सागर मारुती शिरतोडे<br>2. मारुती पांडूरंग शिरतोडे | 18/03/2026 | INR 10,62,478.59/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक 981/1 चा संपूर्ण भूखंड व हिस्सा; क्षेत्रफळ: 1175 चौरस फूट; गाव: मांडवे, ग्रामपंचायत: मांडवे, तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र-413111; आणि ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे :- पूर्व - रस्ता, पश्चिम - जफर जंगू मुलाणी, उत्तर - हनुमान साधू बोडरे, दक्षिण - जिल्हा परिषद शाळा मांडवे.

तुम्हाला याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, तुम्ही **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार, त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार ठरलेल्या व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत रक्कम अदा करावी. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या खऊऋ फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, सरफेसी कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अन्वये, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास अधोस्वाक्षरीकर्ता बांधील राहील. शिवाय, उक्त कायद्याच्या कलम 13 (13) अन्वये, तुम्हाला उक्त तारण ठेवलेल्या मालमत्ता विक्री/भाडेपट्ट्याने किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : 02/04/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

सही/-
**अधिकृत अधिकारी, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

# श्री येडेश्वरी देवी चैत्र पौर्णिमा यात्रा; श्रद्धा, इतिहास आणि लोकजीवनाचा महासंगम...





## श्रद्धेचा अखंड प्रवाह...

येरमाळा येथील श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा ही इतिहास, पुराण, श्रद्धा आणि लोकजीवनाचा अद्वितीय संगम आहे. ही यात्रा केवळ धार्मिक कार्यक्रम नाही, तर ती समाजजीवन, अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांना एकत्र जोडणारा उत्सव आहे. काळ बदलला, तंत्रज्ञान आले, पण भक्तांची श्रद्धा आणि या यात्रेचे महत्त्व आजही अढळ आहे. यात्रा म्हणजे केवळ देवदर्शन नव्हे, तर परंपरेचा अनुभव, संस्कृतीचा उत्सव आणि श्रद्धेचा उत्स्फूर्त आविष्कार आहे.




विपीन वीर
उपसंपादक, धाराशिव


मराठवाडा हा संतपरंपरा, धार्मिक श्रद्धा आणि लोकसंस्कृतीचा समृद्ध प्रदेश म्हणून ओळखला जातो. या भूमीत प्रत्येक गावात एखादी देवता, परंपरा आणि यात्रा जिवंत स्वरूपात अनुभवायला मिळते. अशाच या परंपरेचा एक भव्य आणि ऐतिहासिक वारसा म्हणजे येरमाळा येथील श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा. ही यात्रा केवळ धार्मिक सोहळा नाही, तर ती इतिहास, पुराणकथा, सामाजिक जीवन, अर्थव्यवस्था आणि लोकसंस्कृती यांचा संगम आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत साजरी होणारी ही यात्रा संशोधकांसाठीही अभ्यासाचा समृद्ध विषय ठरते.

येरमाळा हे गाव धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यात बालाघाट डोंगररांगेच्या कुशीत वसलेले आहे. डोंगराळ रचना, हिरवाई आणि शांत वातावरण यामुळे हा परिसर प्राचीन काळापासून साधना आणि तपश्चर्येसाठी अनुकूल मानला गेला आहे.

इतिहासाच्या दृष्टीने पाहता, मराठवाडा प्रदेशावर सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या राजवंशांचा प्रभाव राहिला आहे. या काळात मंदिरनिर्मिती आणि धार्मिक संस्कृतीचा मोठा विकास झाला. श्री येडेश्वरी देवीचे मंदिरही या प्राचीन परंपरेचे प्रतीक मानले जाते. श्री येडेश्वरी देवीच्या उत्पत्तीबाबत अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी रामायणाशी संबंधित कथा सर्वाधिक प्रसिद्ध आहे. वनवास काळात भगवान श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण जंगलात भ्रमण करत असताना देवी पार्वती यांनी सीतेचे रूप धारण करून श्रीरामांची परीक्षा घेतली. श्रीरामांनी हा भेद ओळखून त्यांना वेडी असे संबोधले. त्यानंतर देवी येथे स्थायिक झाल्या आणि येडाई किंवा येडेश्वरी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या, अशी लोकश्रद्धा आहे. तसेच, येडेश्वरी देवीला तुळजाभवानीची धाकटी बहीण मानले जाते. त्यामुळे येरमाळा आणि तुळजापूर यांच्यात धार्मिक व सांस्कृतिक नाते दिसून येते. श्री येडेश्वरी देवीचे मंदिर हेमाडपंथी स्थापत्यशैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. दगडी बांधकाम व मजबूत रचना, सुबक कोरीवकाम, नैसर्गिक वातावरणाशी सुसंगत बांधणी, मजबूत तटबंदी, मंदिर सुमारे ३५०-४०० फूट उंचीवर आहे. येथे पोहोचण्यासाठी २००-२५० पायऱ्या चढाव्या लागतात. या प्रवासात भक्तांना आध्यात्मिक अनुभवासोबत निसर्गसौंदर्याचाही आनंद मिळतो.


चैत्र पौर्णिमा हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी देवीची विशेष पूजा केली जाते. येरमाळा येथील ही यात्रा शेकडो वर्षांपासून सुरू आहे. पूर्वी ती स्थानिक स्तरावर मर्यादित होती; मात्र आज ती राज्यस्तरीय मोठा उत्सव बनली आहे. दरवर्षी लाखो भाविक या यात्रेत सहभागी होतात. यात्रेचा मुख्य आकर्षण म्हणजे देवीची पालखी. ढोल-ताशे, टाळ-मृदुंग यांच्या गजरात पालखी काढली जाते. भाविकांचा जयघोष वातावरण भक्तिमय करतो. चुना वेचण्याची अनोखी परंपरा आहे. पालखी आबराईत आल्यावर जमिनीतून चुनखडी प्रकट होते, अशी श्रद्धा आहे. भक्त ती वेचून देवीला अर्पण करतात. ही परंपरा यात्रेची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. घुगरी हा यात्रेचा प्रमुख प्रसाद आहे. हजारो भाविक एकत्र येऊन प्रसाद ग्रहण करतात, ज्यातून सामूहिकतेचा संदेश दिला जातो. भक्त आपले नवस पूर्ण करण्यासाठी येथे येतात. काही भाविक पायी दिंडी काढून देवीचे दर्शन घेतात. यात्रा म्हणजे ग्रामीण जीवनाचा उत्सवच असतो. कुस्तीचे फड, भजन, कीर्तन आणि लोकनृत्य, पारंपरिक बाजारपेठ, ग्रामीण हस्तकला यामुळे यात्रा सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक जतनाचे माध्यम ठरते. स्थानिक विकासाचा आधार यात्रेमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते.

व्यापाऱ्यांना मोठी संधी, लघुउद्योगांना प्रोत्साहन, पर्यटन वाढ स्थानिक रोजगार निर्मिती ही यात्रा अनेक कुटुंबांसाठी उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन ठरते.

पोलीस बंदोबस्त, स्वच्छता व पाणी व्यवस्था, वाहतूक नियंत्रण, आरोग्य सेवा या उपाययोजनांमुळे यात्रा सुरळीत पार पडते.

काळानुसार यात्रेत आधुनिकतेची जोड मिळाली आहे. डिजिटल माहिती व्यवस्था, सीसीटीव्ही व सुरक्षा तंत्रज्ञान, स्वच्छता मोहिमा आणि श्रद्धा आजही तितक्याच दृढ आहेत. श्री येडेश्वरी देवी ही जागृत देवता मानली जाते.

भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारी देवी म्हणून तिची ख्याती आहे. ही यात्रा मराठवाड्याच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग असून, श्रद्धा आणि परंपरेचे जिवंत प्रतीक आहे.






















## थोडक्यात...

### डॉ. बोधले महाराज यांची प्रवचनमाला शनिवारपासून

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सद्गुरु बोधराज सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने येत्या शनिवार ४ ते ६ एप्रिल या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत संत माणकोजी महाराज बोधले यांचे विद्यमान वंशज ह.भ.प. डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांची भक्तियोग या विषयावर प्रवचनमाला आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती हभप किसन कापसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सिद्धेश्वर मंदिराजवळील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. या प्रवचनमालेचा लाभ शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहनही केले आहे. या पत्रकार परिषदेस संजय पवार, अनिल देठे, सोमनाथ निकम, अजय आसबे, निवृत्ती माने आदी उपस्थित होते.



### सोलापूर आकाशवाणीच्या वर्धापनदिनी रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

आकाशवाणी सोलापूर केंद्राचा ४० वा वर्धापनदिन येत्या ४ एप्रिल रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.यानिमित्त आकाशवाणी केंद्रात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दूपारी ३ या वेळेत आयोजित या शबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन आकाशवाणी सोलापूर केंद्राचे प्रसारण अधिकारी डॉ. सोमेश्वर पाटील यांनी केले आहे.




### जिजाऊ ब्रिगेडचे शुक्रवारी मुंबईत राज्य महाअधिवेशन

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने शुक्रवारी (ता.३) मुंबईतील दादर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरामध्ये राज्य महाअधिवेशन होणार आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून जवळपास एक हजार महिला पदाधिकारी सहभागी होणार आहेत. चार सत्रामध्ये हे अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनाच्या उद्घाटक म्हणून मुंबईच्या महापौर रितू तावडे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमा बोके असणार आहेत. अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, विजय घोगरे, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.




### वाहनाच्या धडकेत अनोळखी इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

पुणे-सोलापूर हायवेवर बाळे पुलाखाली असलेल्या बोगद्यामधील रोडवर एक अनोळखी पुरुष इसमास (वय ५० ते ६०) अज्ञात वाहन चालकाने भरधाव वेगाने चालवून त्या इसमास तोंडास पाठीस व सर्वांगास गंभीर जखमी केले. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. ३० मार्च रोजी ही घटना घडली आहे. अपघाताची खबर न देता त्या व्यक्तीस उपचारास दाखल न करता आरोपी निघून गेला. याबाबत अज्ञात वाहन चालकाविरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पाटील करत आहेत.

### राग मनात धरून जीवे मारण्याची धमकी

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

गल्लीत येऊन विनाकारण ये-जा करीत असल्याने विचारल्याचा राग मनात धरून घरात बेकायदेशीर घुसून घरातील सामानाची तोडफोड करून शिवीगाळ करून घरावर दगड मारून जीवे मारण्याचा धमकी दिली असल्याची घटना घडली आहे. ३० मार्च रोजी ही घटना घडली. आरोपी यश बीरप्पा व्हनचंजे (रा. वामन नगर, आसरा), संजय जाधव (रा. विनू गोपाल, मजरेवाडी) यांनी घराच्या पाठीमागे शाळेत गेल्यावर त्यांना विचारल्याचा राग मनात धरून अरुण वन्नप्पा एडके (वय ४७, रा. ७१ स्वामी समर्थ पाटील नगर सोलापूर) व त्यांच्या आई, भावाला घरात घुसून शिवीगाळ व अंगावर मारण्यास आल्यावर शेजारी राहणारे करीम शेख हे सोडविण्यास आले. तेव्हा त्यांना शिवीगाळ करीत हाताने मारहाण करून करीम यांच्या घरासमोरील गेट तोडून नुकसान केले. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शिंदे करत आहेत.






# गॅस मिळविण्यासाठी ग्राहकांच्या उन्हात रांगा

## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

शहरात काही भागातील गॅस वितरण व्यवस्था सध्यातरी पूर्णतः विस्कळीत झाल्याचेच दिसून येत आहे. शहरात सिलेंडरसाठी नागरिकांनी भर उन्हात रांगा लावल्या असून, गॅस सिलेंडरच्या रांगेत उभा असलेल्या एका तरुणाला तर चक्क आज भोवळ आली होती.अजूनही ऑनलाईन बुकिंग करूनही लोकांना महिना-महिना गॅस मिळत नसल्याचा अनुभव ग्राहकांचा आहे.

जिल्हा प्रशासन मात्र सारं काही सुरळीत असल्याचं सांगत आहे. तरीही शहर-जिल्हा पुरवठा विभागाकडून जिल्ह्यात गॅसचा तुटवडा नसल्याचाच दावा अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. सोलापुरातील अनेक गॅस वितरण एजन्सीपुढे गॅसच्या रिकाम्या टाक्या घेवून ग्राहक दिवसभर थांबलेले दिसून येतात. गॅस घरपोच करण्याची जबाबदारी एजन्सी पार पाडत नसल्याचंही यावरून दिसून येत आहे. लोक स्वतःच गोडावूनपर्यंत जावून गॅस टाकी घेवून येत आहेत. यासाठी लोकांना दिवसभर कडक उन्हात बसावे लागत आहे. याबाबत शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांना दूरध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनीही फोन घेतला नाही. यामुळे शहर-जिल्हा पुरवठा विभागाकडून योग्य नियोजन लागत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी लक्ष घालण्याची गरज आहे.

### कुमठा नाका परिसरात युवकास आली भोवळ



कुमठा नाका परिसरातील एका गॅस एजन्सीपुढे उन्हात थांबलेल्या रांगेतच उभ्या असलेल्या असमद रफीक शेख या तरूणाला भोवळ आल्याने आणि तो खाली कोसळला. इतर ग्राहकांनी त्याला मदत केली. त्यानंतर ग्राहकही एजन्सीज व्यवस्थापनावर चांगलेच भडकले होते. अखेर पोलीसांना येवून ग्राहकांना शांत करावे लागले.

**हॉटेल व्यावसायिक पुन्हा पडले बेकारीत**

आखाती युद्धामुळे निर्माण झालेल्या तणावाचा परिणाम आजही सोलापूर शहरातील हॉटेल उद्योगावर दिसू लागला आहे. व्यावसायिक गॅस काही प्रमाणात हॉटेलधारकांना मिळत आहे. मात्र अनेकांना हा गॅस मिळत नसल्याची खंत काही हॉटेलधारकांनीच दैनिक तरुण भारतशी बोताना व्यक्त केली. यामुळे काही हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेल बंद करण्याची पाळी आली आहे. एकंदरीत, सध्यातरी हॉटेल व्यवसाय अडचणीतच असून, सरसकट व्यावसायिकांना गॅसचा पुरवठा होत नसल्याने शहरातील अनेक हॉटेलधारक पुन्हा बेकारीत पडले आहेत.

**लाडक्या बहिणींना शेवटची संधी**

# ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांच्या ई-केवायसी प्रक्रियेमधील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.




ही शेवटची संधी असून प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आता ३० एप्रिल २०२६ पर्यंत अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ई-केवायसी प्रक्रियेत अपूर्णता राहिलेल्या तसेच कागद पत्रांमध्ये तांत्रिक त्रुटी असलेल्या लाभार्थींना दिलासा मिळणार आहे. या योजनेअंतर्गत प्राथमिक पडताळणीदरम्यान अनेक अर्जांमध्ये आधार क्रमांक, बँक खाते तपशील, मोबाईल क्रमांक तसेच इतर वैयक्तिक माहिती संदर्भात विसंगती आढळून आली आहे. परिणामी, काही लाभार्थींना योजनेचा लाभ वितरीत करण्यात अडथळे निर्माण झाले होते. ही बाब लक्षात सदर मुदतवाढ जाहीर करण्यात आली आहे. ई-केवायसी प्रक्रिये दरम्यान आधार प्रमाणीकरण, बँक खाते संलग्नीकरण, मोबाईल क्रमांक पडताळणी आदी बाबींची अचूकता सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, संबंधित विभागांचे प्रमुख तसेच स्थानिक प्रशासन यांना याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लाभार्थी महिलांना ई-केवायसी दुरुस्ती प्रक्रियेबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत. तसेच, महा-ई-सेवा केंद्रे, आपले सरकार सेवा केंद्रे तसेच ग्रामस्तरावरील सुविधा केंद्रांच्या माध्यमातून लाभार्थींना आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मुदतवाढीचा लाभ घेऊन लाभार्थींनी आपली कागदपत्रे वेळेत अद्ययावत करावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# लगान चित्रपटाचे पटकथाकार कुमार दवे यांचे शुक्रवारी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

देशाच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील कथा असलेल्या आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर गाजलेल्या लगान या चित्रपटाचे पटकथाकार तसेच असोसिएट डायरेक्टर कुमार दवे यांचे शुक्रवार ३ एप्रिलला सायंकाळी ६.२५ वाजता लोकमान्य टिळक सभागृह चार हुतात्मा पुतळा चौक (ॲम्फी थिएटर) येथे व्याख्यान आयोजित केल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर अध्यक्षा रेणुका महागांवकर व कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.




या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. आजच्या तरूण पिढीला कुमार दवे यांचे व्याख्यान प्रेरणादायी ठरणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरीकांनी उपस्थिती राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, अभय जोशी, अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी कार्यरत आहेत.


कुमार दवे


सचिन खरात

# १७ एप्रिलपासून फ्लाय-९१ ची सोलापूर-हैदराबाद विमानसेवा

**शेतकरी आणि व्यापारी बांधवांना होणार फायदा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

येत्या १७ एप्रिल पासून सोलापूर-हैदराबाद-सोलापूर ही विमानसेवा सुरू होत आहे. याबाबतची माहिती फ्लाय-९१ या विमान वाहतूक कंपनीनं ऑनलाईन प्रसिध्द केली आहे. आठवड्यातून ५ दिवस ही सेवा सुरू राहणार असून, याचा फायदा सोलापूरच्या व्यापारी, शेतकरी बांधवांना होणार आहे.

सोलापूर विमानतळा वरून सध्या सोलापूर-मुंबई, सोलापूर-गोवा अशी येण्याजाण्यासाठीची विमानसेवा सुरू आहे. तसेच इंदौरला जाण्यासाठीही विमानसेवा सुरू आहे. या पाठोपाठ आता सोलापूर-हैदराबाद ही विमानसेवा फ्लाय ९१ वन कडून सुरू होणार आहे.

याबाबतची अधिकृत घोषणा लवकरच होईल. मात्र विमान तिकिट विक्री सुविधा फ्लाय-९१ च्या साईटवर आजपासून उपलब्ध




झाली आहे. याला सोलापूरचे विश्वराज एव्हीएशनचे विश्वराज चाकोते यांनी दुजोरा दिला आहे. याबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी विमानतळ प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांना फोन केला मात्र त्यांनी मोबाईल घेतला नाही.

**चेंबर ऑफ कॉमर्सच्या मागणीला यश**

येथील चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने सोलापूर-हैदराबाद या विमानसेवेसाठी काही वेळा पाठपुरावा केला होता. ही सेवा देण्यासाठी प्लाय ९१ पुढे सरसावली आहे. या सेवेमुळे सोलापूरच्या व्यापारी, शेतकरी बांधवांना फायदा होणार आहे. इतकेच नाही तर सोलापूरहून श्रीशैल, तिरूपती बालाजीस जाणाऱ्या भाविकांनाही ही विमानसेवा फायदेशीरच ठरणार आहे. कांदा आणि इतर शेतीमाल उत्पन्न करणाऱ्या व टेक्सटाईल्स उत्पादन करणाऱ्या उद्योजकांनाही याचा पुरेपूर फायदा होणार असल्याची माहिती चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांनी दिली.

# भरधाव दुचाकीच्या धडकेत झाले हाड फ्रॅक्चर

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

भरधाव वेगाने दुचाकी चालवून, डाव्या बाजूस धडक दिल्याने एका युवकाच्या हाताच्या मनगटास मार लागल्याने त्याचे हाड फ्रॅक्चर झाले. ही घटना पुणे जुना तुळजापूर नाका येथे घडली आहे.

याबाबत हकीकत अशी की, दि. २८ मार्च रोजी तुळजापूर नाका येथे दीपक प्रतीक दीपक दोशी (वय २७, रा. भवानी पेठ, सोलापूर) हे दुचाकी क्रमांक एमएच सी ३९१५ वरून घरी जाण्याकरिता चिंचोली एमआयडीसी पाकणी येथून पुणे जुना तुळजापूर नाका रोडने आले असता रिहान अमीर शेख (रा. हनुमान नगर, बुधवार पेठ) हा दुचाकी क्रमांक एमएच १३ इक्यु ६१६७ यावर मागे त्याचा मित्र दिनेश पवार याला बसवून रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवून प्रतीक जोशी याच्या मोटरसायकलीस डाव्या बाजूस धडक दिल्याने त्यांच्या पायाच्या गुडघ्याला, डाव्या हाताच्या मनगटास मार लागून हात फॅक्चर झाला आहे. तसेच रेहान शेख याच्या डोक्यास व दोन्ही पायास मार लागून त्याच्या मित्राच्या पायास जखम झाली असून दुखापत होण्यास कारणीभूत ठरला आहे. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात रिहान शेख यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाडीकर करत आहेत.

# प्रसिध्द चित्रकार शेरशाह डोंगरी यांच्या 'कलाप्रवास' चित्रांचे आजपासून प्रदर्शन

सोलापूर : येथील प्रसिद्ध चित्रकार शेरशाह डोंगरी यांच्या 'कलाप्रवास' या विशेष चित्र प्रदर्शनाचे आयोजन २ ते ५ एप्रिल या कालावधीत पु. ना. गाडगीळ अँड सन्सच्या झपूर्झा गॅलरीत करण्यात आले आहे. या प्रदर्शनात कलाकाराच्या ४० कलाकृती रसिकांसाठी प्रदर्शित होणार आहे. याचे उद्घाटन २ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता झपूर्झा आर्ट गॅलरी, पु. ना. गाडगीळ डफरीन चौक येथे प्रा. दीपक देशपांडे, चित्रकार तथा हास्यसम्राट यांच्या हस्ते करण्यात येणार असून सुरवसे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. शेरशाह डोंगरी यांनी प्रवासादरम्यान प्रत्यक्ष साकारलेली निसर्गचित्रे या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहेत. त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कला महाविद्यालयामधून कलेचे शिक्षण घेतले असून त्यांनी सुरवसे हायस्कूल येथे कलाशिक्षक म्हणून २५ वर्षे सेवा केली. या प्रदर्शनाला कला रसिकांनी उपस्थित राहून कलाकृतींचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन पु. ना. गाडगीळ अँड सन्सचे जितेंद्र जोशी यांनी केले आहे. यावेळी चित्रकार पुष्कराज गोरंटला, धनंजय टाकळीकर दया पटणे उपस्थित होते.

# मनोजवं मारुततुल्यवेगं : हनुमान जयंतीनिमित्त शहरातील विविध मंदिरांत जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

सोलापूर नगरीत श्री पवनपुत्र हनुमान जयंतीनिमित्त सर्वत्र भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. रामभक्त, संकटमोचन, बलदायी आणि अष्टसिद्धी-नव निधीचे दाता अशा श्रीहनुमंताच्या जन्मोत्सवासाठी शहरातील विविध हनुमान मंदिरांमध्ये भाविकांच्या स्वागताची आणि धार्मिक विधींची व्यापक तयारी पूर्णत्वास पोहोचली आहे.

तुळजापूर रोडवरील ५२ फुटी उंच भव्य हनुमान मूर्ती परिसर विशेष आकर्षण ठरत असून, या ठिकाणी वडार समाजाच्या वतीने परिसराची स्वच्छता करून पवित्रतेची जपणूक करण्यात आली आहे. संपूर्ण परिसर फुलांच्या सजावटीने आणि विद्युत रोषणाईने उजळून निघाला असून, भक्तांच्या मनात दैवी ऊर्जा आणि समाधानाची अनुभूती निर्माण होत आहे.

बजरंग बली की जय या जयघोषाने वातावरण भारावून गेले आहे. अशोक चौक येथील श्री पंचमुखी हनुमान मंदिरातही जन्मोत्सवाच्या निमित्ताने आकर्षक मंडप उभारण्यात आला आहे. येथे रुद्राभिषेक, आरती, नामस्मरण, भजन-कीर्तन आणि महाप्रसाद



वितरण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेता येणार आहे.

शहरातील मधला मारुती, उत्तरमुखी तसेच दक्षिणमुखी पंचमुखी मारुती मंदिरांमध्येही विशेष पूजाविधी, हनुमान चालीसा पठण, सुंदरकांड पारायण यांसारख्या कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. या सर्व उपक्रमांमुळे सोलापूर शहर अक्षरशः रामभक्तीच्या आणि हनुमंताच्या नामस्मरणाच्या गजरात न्हाऊन निघणार आहे. हनुमान जयंती हा केवळ उत्सव नसून, श्रद्धा, सेवा आणि सामूहिक एकात्मतेचे प्रतीक आहे.

या पावन दिनी भाविक श्री हनुमंताच्या चरणी नतमस्तक होऊन बल, बुद्धी, विद्या आणि संकटांपासून मुक्तीची प्रार्थना करतात. मनोजवं मारुततुल्यवेगं या स्तोत्राचा गजर करत भक्तगण आपल्या जीवनात सकारात्मक ऊर्जा आणि धैर्याची प्रेरणा घेतात.



## मड्डी वस्तीतील ५१ फुटी बजरंगबलीच्या मुर्तीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

**सोलापूर :** मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मड्डी वस्ती परिसरात मी वडार महाराष्ट्राचा संघटना व तमाम वडार समाजाच्या वतीने समाजाचे श्रद्धास्थान बजरंगबलीची ५१ फुटी मूर्ती साकारण्यात आली असून, या मुर्तीचे लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण होणार असून यावेळी २ उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, शहरातील सर्व आमदार यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी आणि इतर काही मंत्र्यांच्या उपस्थित असणार असल्याची माहिती राज्य उपाध्यक्ष शंकर चौगुले यांनी दिली.

प्रत्येक समाजाचे एक श्रद्धास्थान असते. त्याचप्रमाणे वडार समाजाचे आराध्य दैवत बजरंगबली असल्याने राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सोलापूरच्या ठिकाणी तब्बल ५१ फूट उंचीची बजरंगबलीची मूर्ती साकारण्यात आली असून, यासाठी तब्बल १० वर्षांचा कालावधी लागला आहे. ही मूर्ती मूर्तिकार शेखर शहाणे यांनी साकारली आहे. या मुर्तीच्या अनावरण सोहळ्यासाठी खाण संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण विटकर, समाजाचे पाटील बाबुराव निंबाळकर, विष्णू मुधोळकर, अरुण चौगुले, राजू चौगुले, शंकर बा.चौगुले, बालाजी निंबाळकर, राजू चौगुले, राजू निंबाळकर, अबू चौगुले, दिलीप भांडेकर, नागनाथ निंबाळकर, लक्ष्मण विटकर, लंहू बंदपट्टे, रवी शिंदे,अनिल चौगुले यांच्यासह पदाधिकारी प्रयत्न करीत आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४००

**कां जे मार्गा मार्ग देखावे । साच लटिकें वोळखावें ।**
**हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥**

प्रयाणाकरिता उत्तम असणारा मार्ग म्हणजे आर्चिरादी मार्ग किंवा देवयान मार्ग असल्याचे श्रीकृष्णांनी सांगीतले आहे. त्यानंतर अर्जुनाला अयोग्य मार्ग कोणता हे जाणून घेण्याची इच्छा असल्याने भगवंत अयोग्य मार्ग कोणता याचेही स्पष्टीकरण करीत आहेत. मरणाच्या वेळी विषयवात, कफ हे गच्च भरलेले असतात, अंत:करणात अज्ञानांधकार कोंदाटून राहिलेला असतो. सर्व इंद्रिये जड होतात. रोगांमुळे ज्ञान शक्ती, क्रीया शक्तींना अडथळा येतो. स्मृतीभ्रम होतो, मन वेडे होते. प्राण देहात कोंडला जातो. जठराग्नीचा अग्नीपणा राहत नाही. चंद्राच्या आड दाट आकाश आले तर तेथे पुर्ण अंधकारही नसतो आणि पुर्ण प्रकाशही नसतो तर मंदप्रकाश आणि थोडा अंधकार अशी संमिश्र अवस्था असते. त्याप्रमाणे व्यक्ती सत्वर मरतही नाही अथवा शुध्दीवरही राहत नाही. अंतकाळी माणसाची खूप वाईट स्थिती होते. शरीरात अशी वाईट स्थिती व बाहेर चंद्रकलेचा क्षय,



कृष्णपक्ष आणि दक्षिणायन अशी परिस्थिती असते यालाच अप्रशस्त काळ म्हणतात. प्रयाणाकरिता दोन वाटापैकी एक सरळ तर दुसरी अडवळणी असल्याचे सांगून भगवंतानी अर्जुनाला या दोन्हीपैकी योग्यतो मार्ग आपणच शोधावा असे सांगतांना म्हटले, **कां जे मार्गा मार्ग देखावे । साच लटिकें वोळखावें । हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥** अर्थात, आपल्या हित अहिता करीताच योग्य अयोग्य मार्ग आपण पहावे तसेच सत्य असत्य जाणावे आणि आपले स्वहित कशात आहे, हे समजून घ्यावे. ज्याला हे दोन्ही मार्ग समजले, तो वाईट किंवा अप्रशस्त मार्ग निवडेलच कशाला. ? कोणाला चांगला मार्ग आवडणार नाही? अर्थात, सर्वांना चांगलाच मार्ग आवडत असतो.

खरे म्हणजे मरणकाळी कोणता मार्ग प्राप्त होईल, हे माणसाच्या स्वाधीन नसते. देह असो अथवा जावो, आम्ही केवळ ब्रम्हरुपच आहोत असा ज्याचा जिवंतपणीच निश्चय झाला आहे, त्याला मार्ग शोधण्यासाठी कोठेही जाण्याची किंवा वेगळे असे काही करण्याची गरज नाही. लाटेच्या प्रगट होण्याने पाणी जन्मत नाही अथवा लाट नाहिशी झाल्याने पाणी मरत नाही. त्याप्रमाणे ज्ञानी देहात असुनही देहानेच ब्रम्हरुप झालेले असतात. त्यामुळे त्यांना मरणाच्या काळ वेळेशी कांही देणे-घेणे नसते. अर्थात, अशा ज्ञानी लोकांसाठी सर्व काळ हा अर्चिरादी काळच असतो. आपलेही मरण आपल्या हातात नाही किंवा आपणाला मृत्यू केव्हा येणार हे आपणाला माहिती नाही. हे जरी सत्य असले तरी, मृत्यू हा निश्चित आहे. हे ही विसरता येणार नाही. आपण चांगले वागावे, सत्कर्म करावे एवढे मात्र आपल्या हातात असल्याने ते न चुकता आपण करावे. अर्जुनाला भगवंत जो उपदेश करीत आहेत तो उपदेश, ते मार्गदर्शन जसेच्या तसे संजय धृतराष्ट्राला राजवाडयात बसून कथन करीत आहे. श्रीकृष्णाचे अर्जुनाला संस्कृत भाषेतून होत असलेले हे अमृतमयी मार्गदर्शन आपल्या मातृभाषेतून माऊली आपणाला ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून करीत आहेत. आपण या सदराच्या वाचनात सातत्य बाळगून या मार्गदर्शनाचा लाभ या ओव्यांच्या माध्यमातून घेऊ या. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. २ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - फाल्गुन पौर्णिमा
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- हस्त (१७.३८)
योग - ध्रुव (१४.१९)
करण - बालव (२०.०८)
राहू काल : गुरूवार
दु. १.३० ते ३.००

दिनविशेष :
१८९४: छत्रपती राजार्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला.
१९२६: कवी व गीतकार सूर्यकांत रामचंद्र खांडेकर यांचा जन्म.
१९६९: हिंदी चित्रपट अभिनेता अजय देवगण यांचा जन्म.
१९८४: सोयुझ टी-११ या अंतराळयानातून राकेश शर्मा या पहिल्या भारतीय अंतराळवीराने उड्डाण केले.

## नाट्यरसिकांसाठी सुवर्णसंधी : संमेलनाच्या सांगता सोहळ्यात सहभागासाठी नोंदणी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

नाट्य परिषदेचे सभासद तसेच सोलापूर शहर व जिल्ह्यातील नाट्यप्रेमींसाठी संमेलनाच्या सांगता सोहळ्यात सहभागी होण्याची आकर्षक संधी उपलब्ध झाली आहे. इच्छुकांनी प्रतिनिधी म्हणून सहभाग नोंदविण्यासाठी शुल्क भरून नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रतिनिधी शुल्क दोन पर्यायांमध्ये निश्चित करण्यात आले आहे. रु. १५००/- शुल्कामध्ये दि. २४ एप्रिल रोजी दुपारी १२.०० वा. पासून ते दि. २७ एप्रिल रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत निवासाची व्यवस्था तसेच दि. २४ एप्रिल ते २६ एप्रिल २०२६ रात्री पर्यंतचा चहा-नाश्ता व भोजनाची सोय करण्यात येणार आहे. तर रु.१०००/- शुल्कामध्ये फक्त चहा-नाश्ता व भोजनाची सुविधा उपलब्ध राहील. इच्छुकांनी प्रतिनिधी शुल्क खालील बँक खात्यामध्ये जमा करणे बंधनकारक असून, शुल्क जमा झाल्याशिवाय नोंदणी ग्राह्य धरली जाणार नाही. बँक तपशील : खाते नाव : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बँक : बँक ऑफ इंडिया, शिवाजी पार्क शाखा, सेव्हिंग खाते क्रमांक : ०१५३१०११०००३६९३, IFSC कोड : BKID000१५३, प्रतिनिधी शुल्क भरण्याची अंतिम तारीख : ११ एप्रिल २०२६. संमेलनाची कार्यक्रम पत्रिका लवकरच पाठविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

## विवाहितेला जीवे मारण्याची दिली धमकी

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

संसार उपयोगी सामान दिले नाही, सोने पैसे दिले नाहीत. योग्य तो मानपान केला नाही. मे २०१३ ते दिनांक १० सप्टेंबर २०२५ च्या दरम्यान ओमकार (पती), रवी, कृपेश (दीर), कोमल (नणंद) सर्व रा. एकता नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांनी सासरी ऐश्वर्या ओमकार साळुंखे, वय २५, रा. प्लॉट नंबर ९/१२६, रविवार पेठ, सोलापूर हिला घरातील किरकोळ कारणावरून घालून पाडून बोलून अपमानित करून आर्वाच शिवीगाळ केली. हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत दि. ३१ मार्च रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उडगी करत आहेत.

### मालमत्ता कर विभागाकडून महापालिकेच्या तिजोरीत

# मार्च अखेर २८० कोटींचा कर भरणा

### उद्दिष्टाची ८५ टक्के वसुली; विभागाचे प्रशासनाकडून झाले कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूर महापालिका मालमत्ता कर विभागाकडून चालू आर्थिक वर्षात मार्च अखेर सर्व प्रकारच्या वसुलीतून तब्बल २७९ कोटी ३९ लाख २५ हजार ३०० रुपयांचा कर महापालिकेच्या तिजोरीत जमा करण्यात आल्याची माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.



विभागाच्या या वसुलीचे महापालिका प्रशासनाकडून कौतुक करण्यात आले. सोलापूर शहर आणि हद्दवाढ भागातील २ लाख ७५ हजार मालमत्तांची महापालिका मालमत्ता कर विभागाकडे नोंद आहे. या विभागाला ३१८ कोटी ४७ लाख रुपयांचे वसुलीचे उद्दिष्ट विभागाला देण्यात आले होते. मालमत्ता कराच्या थकबाकी पोटी विभागाकडून दहा हजार मिळकतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.


दि. १४ मार्च २०२६ रोजी झालेल्या लोक अदालती नंतर मार्च अखेरपर्यंत थकबाकी मिळकतदारांना त्यांच्या शास्ती आणि दंड यामध्ये ५० टक्के सूट देणारी योजना सुरू करण्यात आली होती. यानंतर गेल्या १७ दिवसात तब्बल ९ हजार ४५३ थकबाकी मिळकतदारांनी १७ कोटी २४ लाख ९९ हजार २४५ रुपयांचा कर महापालिकेच्या कर विभागाकडे जमा केला. यामध्ये आज शेवटच्या ३१ मार्च दिवशी १४०८ मकतदारांनी २ कोटी ८८ लाख ६२ हजार ९८० रुपये कर जमा केल्याचा समावेश आहे. यानुसार आत्तापर्यंत आर्थिक वर्षात गेल्या वर्षभरात १ लाख ३६ हजार ५९२ मिळकतदारांनी १८४ कोटी १२ लाख रुपयांचा कर जमा केला आहे. मालमत्ता कराशिवाय या मीटर, पाणीपट्टी, कर आणि मालमत्ता हस्तांतर फी तसेच इतर या बाबींमधून महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने तब्बल २७९ कोटी ३९ लाख २५ हजार ३०० रुपयांचा एकूण कर जमा केला आहे.

### उद्दिष्टानुसार केली ८७.७४ टक्के वसूली

महापालिकेने अंदाजपत्रकात दिलेल्या एकूण ३१८ कोटी ४७ लाख रुपयांच्या उद्दिष्टानुसार ८७.७४ टक्के वसूली तर नंतर सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे दिलेल्या ३४० कोटी रुपयांच्या उद्दिष्टानुसार ८२ टक्के वसुली करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाचे अधिक्षक युवराज गाडेकर यांनी दिली.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### चारित्र्य शुद्धी हीच मोक्षप्राप्तीची पहिली पायरी



मोक्ष मार्गावर केवळ चालणे पुरेसे नसून, त्यासाठी नियमांचे पालन आणि तपश्चर्या करणे अनिवार्य आहे. ज्याप्रमाणे बी पेरल्याबरोबर लगेच वृक्ष तयार होत नाही, त्याला अंकुरण, खत-पाणी आणि काळ जावा लागतो, त्याचप्रमाणे आत्म विकासासाठी संयमाची आवश्यकता असते, असे प्रतिपादन निर्यापक मुनीश्री वीरसागर महाराज यांनी केले.

माणिक चौक येथील महावीर सांस्कृतिक भवन येथे बुधवारी झालेल्या मंगल प्रवचनप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी जैन दर्शनातील रत्नत्रयी आणि आत्मतत्त्वावर सखोल मार्गदर्शन केले. मुनीश्री म्हणाले, मोक्षासाठी सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चारित्र्य ही त्रिसूत्री मार्गावर चालणे गरजेचे आहे. विशेषतः सम्यक चारित्र्य पाळणारे लोक आज दुर्मिळ होत चालले आहेत. जो माणूस व्रत आणि नियमांचे पालन करतो, त्याचेच चारित्र्य उजळून निघते आणि तोच मोक्षाचा खरा अधिकारी ठरतो. आत्म्याचे अमरत्व स्पष्ट करताना ते म्हणाले, आत्मा कधीही जन्म घेत नाही आणि मरत नाही. तो शरीरापेक्षा भिन्न आहे. आत्मा ज्या शरीरात प्रवेश करतो, तसा आकार धारण करतो.

माणसाच्या पाच इंद्रियांना नियंत्रित करणारे ज्ञान आणि शरीराची अनुभूती देणारा खरा स्वामी आत्मा आहे. शरीराचे परावर्तन दिसते, मात्र आत्मतत्त्व हे सूक्ष्म आहे. जीव आणि अजीव यांतील फरक समजून घेणे हेच यथार्थ ज्ञान आहे. मोक्ष मार्ग हा एका दिवसात साध्य होणारा विषय नाही. प्रतिकूल परिस्थितीमध्ये डगमगून न जाता, अशुभ कर्माच्या उदयापासून स्वतःला सावरले पाहिजे. एखादी गोष्ट मिळाली नाही किंवा निसटली, तरी त्याबद्दल विनाकारण चिंता न करता आपल्या ध्येयावर ठाम राहणे म्हणजे सम्यक दर्शन होय.

## शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आज शिवचरित्र पारायण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता रंगभवन येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज उद्यान येथे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे श्री शिवचरित्राच्या सामूहिक पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे गुरुवारी अभिवादन करण्यात येणार आहे. यानंतर शिवचरित्राचे सामूहिक पारायण होणार आहे. संस्थापक गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात गावागावांमध्ये श्री शिवचरित्राचे पारायण करण्यात येत आहे.

# कोटयवधींची बिले प्रलंबित; 'जलजीवन'ला निधी शून्य

### मार्च अखेरचा ताण शिगेला; अधिकारी-कर्मचारी रात्रभर कार्यरत, अनेक योजनांना फटका

### ठेकेदार संतप्त मध्यरात्रीपर्यंत झेडपीत 'धावपळ'

**तभा, वृत्तसेवा**
**सोलापूर,दि. १ एप्रिल-**

मार्च अखेरच्या पार्श्वभूमीवर निधी खर्च करण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेत मंगळवारी अक्षरशः मध्यरात्रीपर्यंत कामकाज सुरू होते. आर्थिक वर्ष संपण्याच्या अखेरच्या दिवशी विविध विभागांतील प्रलंबित बिले मार्गी लावण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांची मोठी लगबग पाहायला मिळाली. मात्र, कोट्यवधी रुपयांची बिले प्रलंबित असलेल्या 'जलजीवन' योजनेला एकही रुपया निधी न मिळाल्याने ठेकेदारांमध्ये तीव्र नाराजी पसरल्याचे चित्र दिसून आले.

मंगळवार, ३१ मार्च रोजी सकाळपासूनच जिल्हा परिषद परिसरात वेगळेच चित्र पाहायला मिळाले. नेहमीप्रमाणे कामकाज न राहता सर्वच विभागांमध्ये धावपळ सुरू होती. बांधकाम विभागासह आरोग्य, महिला व बालकल्याण, कृषी, ग्रामपंचायत,



ग्रामीण पाणीपुरवठा आणि समाजकल्याण या महत्त्वाच्या विभागांमध्ये निधी खर्चासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची चढाओढ सुरू होती. प्रत्येक विभागाने आपापल्या खात्यातील निधी खर्च करण्यासाठी आणि प्रलंबित बिले मंजूर करून घेण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न सुरू ठेवले.

विशेषतः 'जलजीवन' योजनेअंतर्गत काम करणाऱ्या ठेकेदारांची अपेक्षा मोठी होती. या योजनेतील कोट्यवधी रुपयांची बिले दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने मार्च अखेर तरी निधी मिळेल, अशी त्यांची आशा होती. त्यामुळे अनेक ठेकेदार सकाळपासूनच जिल्हा परिषदेत ठाण मांडून बसले होते. काहींनी तर संपूर्ण दिवस अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून आपल्या बिलांची पूर्तता करून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दिवस संपत आला तरी निधीबाबत कोणतीही ठोस हालचाल न झाल्याने त्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले.

रात्री उशिरापर्यंत कामकाज सुरू राहिले. घड्याळाचे काटे मध्यरात्रीकडे झुकले तरीही ठेकेदार आणि कर्मचारी कार्यालयातच थांबून होते. अखेर रात्री बारा वाजूनही 'जलजीवन' योजनेसाठी एकही रुपया निधी उपलब्ध न झाल्याचे स्पष्ट झाल्यावर ठेकेदारांना मोठ्या निराशेने परतावे लागले. या घटनेमुळे प्रशासनाविषयी नाराजीची भावना अधिक तीव्र झाली.

दरम्यान, अखर्चित निधी वळवून काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी अपेक्षा काही अधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती. त्यामुळे अनेक अधिकारीही रात्री उशिरापर्यंत कार्यालयातच ठाण मांडून होते. मात्र, अपेक्षेप्रमाणे निधी उपलब्ध न झाल्याने अनेक योजनांना मार्च अखेरचा फटका बसल्याचे दिसून आले. काही विभागांतील उपलब्ध तरतुदींवर आधारित बिले मंजूर करण्यात आली असली तरी मोठ्या प्रमाणातील प्रलंबित कामे पुढे ढकलली गेली.

या संपूर्ण घडामोडीत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी आणि नरेंद्र खराडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मध्यरात्रीपर्यंत कार्यालयात कार्यरत होते. सर्वांनी मिळून निधी खर्चाचा वेग वाढवण्याचा प्रयत्न केला, मात्र निधीअभावी काही महत्त्वाच्या योजनांवर मर्यादा आल्या.

एकंदर, आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशी सोलापूर जिल्हा परिषदेत प्रशासनाची धावपळ आणि ताण स्पष्टपणे जाणवत होता. मात्र, 'जलजीवन' योजनेला निधी न मिळाल्याने या धावपळीवर नाराजीची छाया पडली असून, पुढील काळात या प्रलंबित बिलांचा प्रश्न कसा सोडवला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## सोलापुरात रिक्षा कृती समितीची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूर शहरात ऑटो LPG इंधनाच्या दरवाढीचा तसेच अनियमित पुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, या विरोधात सर्व रिक्षा संघटना एकत्र आल्या आहेत.कम्युनिस्ट रिक्षा संघटनेच्या कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. बैठकीत सोलापूर रिक्षा कृती समितीची अधिकृत स्थापना करण्यात आली.

या कृती समितीमध्ये वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, लालबावटा रिक्षा संघटना, राष्ट्रवादी काँग्रेस रिक्षा संघटना (अजितदादा गट), सोलापूर शहर जिल्हा रिक्षा चालक संघटना (ST स्टॅण्ड), रेल्वे स्टेशन रिक्षा संघटना, सोलापूर रिक्षा युनियन संघटना, राष्ट्रवादी कॉंग्रेस रिक्षा सेना (शरद पवार गट), रिपब्लिक, बसव, उबाठा, मनसे रिक्षा संघटना या प्रमुख संघटनांचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून सर्व संघटना एकत्रितपणे LPG दर कमी करण्यासाठी व पुरवठा नियमित करण्यासाठी लढा उभारणार आहेत. या समितीचे नेतृत्व माजी आमदार आडम मास्टर यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. या रिक्षा कृती समिती साठी रियाज सय्यद यांनी पुढाकार घेतला. रिक्षा चालकांच्या हक्कासाठी आता लढा दिला जाणार असून, पुढील आंदोलनाची दिशा जाहीर करण्यात येणार आहे.

## डॉ. आंबेडकर विश्वस्त समिती पूर्व विभागाची १८ एप्रिल रोजी मिरवणूक

### रक्तदान शिबिरासह विविध उपक्रमांचे केले आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

पूर्व भागातील मंडळाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वस्त समिती पूर्व विभाग सोलापूरची स्थापना करण्यात आली आहे. या परिसरातील हद्दवाढ भागात सुमारे ४२ मंडळे असून महामंडळांकडून मिरवणूक काढण्यात येते. ही मिरवणूक शनिवार दि.१८ एप्रिल रोजी काढण्यात येणार आहे, अशी माहिती विश्वस्त गंगाधर बनसोडे आणि महेश डोलारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील घरकुल, सरवदे नगर, मंत्रीचंडक या परिसरातील सुमारे ४२ मंडळे या पूर्व भागात भीम जयंती मोठ्या उत्साही वातावरणात गेल्या अनेक वर्षांपासून साजरी करतात. त्यापैकी १० मंडळांकडून याच भागांमध्ये दर वर्षी १४ एप्रिलच्या नंतर पहिल्या शनिवारी मिरवणूक काढण्यात येते. यंदाच्या वर्षी या परिसरातील ही मिरवणूक शनिवार दि. १८ एप्रिल रोजी काढण्यात येणार आहे. त्या त्या परिसरातच ही मिरवणूक काढली जाते. युवा भीम सेना मंडळातर्फे भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान, या पूर्व भागातील भीम जयंती मंडळांना विविध अडचणीचा सामना करावा लागतो. त्या अडचणी सोडविण्यासाठी पोलीस, महापालिका व इतर शासकीय विभागांशी संवाद साधून या मंडळांना आवश्यक ते सहकार्य मिळवून देण्याचा समितीचा प्रयत्न राहणार असल्याचेही महेश डोलारे यांनी सांगितले. काही अडचणी असल्यास पूर्व भागातील भीम जयंती मंडळांनी या समितीशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या पत्रकार परिषदेस शिवा गायकवाड, गौतम चौधरी, प्रकाश रणपिसे, भागवत लोखंडे आदी उपस्थित होते.

## प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत 'वाचून उरणारी पुस्तकं'चे शनिवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**



प्रिसिजन वाचन अभियानाच्या वतीने दि. ४ एप्रिल रोजी सायंकाळी ६:२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात लेखक नीतिन वैद्य यांच्या निवडक लेखांचे अभिवाचन, मुलाखत तसेच 'वाचून उरणारी पुस्तकं' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

स्थापत्य अभियंता असलेले नीतिन वैद्य हे वाचनसंस्कृतीचे सातत्याने संवर्धन करणारे साहित्यिक म्हणून ओळखले जातात. 'आशय'सारख्या वाङ्मयीन उपक्रमांपासून ते २०० हून अधिक लेखनापर्यंत त्यांनी वाचनाला एक विचारचळवळ बनवण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार रजनीश जोशी मुलाखत व अभिवाचन सादर करणार आहेत. तीन दशकांहून अधिक काळ पत्रकारिता, लेखन आणि नाट्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या जोशी यांनी विविध विषयांवर प्रभावी लेखन केले आहे.

## नरबळीचा 'तो' व्हिडिओ बनावट

### पोलिसांच्या तपासात अघोरी पूजेचा दावा फोल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

मंगळवेढा शहरामध्ये आघोरी पूजा व नरबळी बाबत व्हिडिओ मोठ्या प्रमाणात प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल होत होता. त्यामध्ये मंगळवेढा शहरात किल्ला भाग या ठिकाणी एका घरामध्ये नरबळी सारखी अघोरी पूजा चालू आहे अशी माहिती व्हायरल होत होती. याबाबत चौकशी केली असता असा कोणताही प्रकार होत नसल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले.

याची माहिती पोलिसांना मिळताच पोनी बोरीगिड्डे, मंगळवेढा पोलीस ठाणे यांनी स्वतः सोबत बीट अंमलदार भेट दिली आहे. अजित सिंग राजपूत यांच्या राहते घरात, पाठीमागील दरवाज्याच्या समोर अंगणामध्ये असलेल्या औदुंबरच्या (उंबर) झाडाच्या बुंध्याजवळ एक सुमारे ४ बाय ४ लांबी रुंदीचा व सुमारे ६ फूट खोलीचा खड्डा काढला होता आणि त्या खड्ड्याच्या बाजूला,



घराच्या भिंतीलागत पूजा केलेली दिसत होती. सदर ठिकाणी घरमालक सुरज सिंग राजपूत वय ५२ वर्षे, त्यांचा मुलगा हर्षवर्धन रजपूत वय २१ वर्षे, त्याचा मित्र किशोर वेदपाठक वय २१ वर्ष, रा. मंगळवेढा आणि रेवणसिद्ध बीराप्पा हिरे कोरबू व ४० वर्ष राहणार हुंनचाळ, तालुका शिंदगी, जिल्हा विजापूर, कर्नाटक (पूजा विधी करणारा) हे हजर होते. त्यांच्याकडे सदर विधी बाबत विचारपूस केली असता, सुरज सिंग राजपूत यांनी सांगितले की, त्यांच्या अंगणामध्ये असलेले औदुंबरचे झाडाचे बुंध्यामध्ये ठेवलेल्या श्री. दत्तात्रयांची मूर्ती दाखवून सदर ठिकाणी ते नित्तनियमाने पूजा करीत असल्याची माहिती सांगितली. सदरचे औदुंबरचे झाड एका बाजूने वाळत असल्याने, ज्योतिषांनी त्यांना सदरचे झाड काढून टाकण्याचा सल्ला दिला होता तसेच ते काढण्यापूर्वी सदरचे झाडाची मुळी काढून त्याची पूजा करून नंतर, झाड काढून घेण्याबाबत सल्ला दिला होता. त्याप्रमाणे त्यांनी झाडाच्या बुंध्यात खड्डा काढून त्याच्या मुळ्या काढून त्याची पूजा केली आहे.

तसेच सदरचा खड्डा हर्षवर्धन रजपूत आणि त्याचा मित्र किशोर वेदपाठक या दोघांनी काढला आहे अशी माहिती दिली. त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडे पुन्हा पुन्हा चौकशी केली असता त्यांनी ही माहिती दिली. एकंदरीत चौकशीमध्ये सदर ठिकाणी कोणताही आघोरी प्रकार, नरबळी आढळून आला नाही. त्याबाबत त्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग घेण्यात आले आहे.



## भारतीय जैन संघटनेच्यावतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

जगाला अहिंसेचा मार्ग दाखवणारे जगा आणि जगू द्या असा संदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव संपन्न झाला. यावेळी भगवान महावीर चौक येथील चौकातील फलकाला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तर आचार्य शांतीसागर चौकातील कीर्ती स्तंभाला उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. यावेळी श्याम पाटील, अभिनंदन विभुते, महावीर नळे, प्रशांत वर्धमाने, देवेंद्र षटगार, कोमल पाचोरे, मंजुनाथ खोबरे, मनोज चवरकर, सोहन पाटील, यश पाटील, ओम पाटील, सुरज वसाळे, वालचंद पाटील आदींची उपस्थिती होती.

यावेळी जैन सोशल ग्रुपचे संतोष शहा, संजय शहा, गौतम संचेती, अशोक छाजेड, वैशाली पर्वत, शर्वरी कोठारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्याम पाटील तर आभार अभिनंदन विभुते यांनी मानले.

# आई वडीलानंतर समाजामध्ये शिक्षकांना मान

## आ. अभिजित पाटील; पंढरपुरात आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ एप्रिल-**

आई वडीलांनंतर समाज कोणाला जास्त मान देतो तर तो शिक्षकांना देतो. समाजामध्ये अजून शिक्षकांविषयी आदर आहे. आपल्या जिल्हा परिषदेच्या शाळा टिकवायच्या असतील तर विद्यार्थी हा गुणवत्तापूर्ण आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बनला पाहिजे. त्यासाठी तुम्ही त्यांचे आदर्श मार्गदर्शक बना, मुलींना आत्मनिर्भर बनवा सांगत सर्वांनी जिल्हा परिषदेच्या शाळांचा पट वाढला पाहिजे, भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही निश्चितच सर्वजण मिळून काम करु सांगितले. असे प्रतिपादन आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले.

२०२५-२६ वर्षांचा तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक ३३ आदर्श केंद्रप्रमुख १ आदर्श विस्ताराधिकारी १ विषय तज्ञ १ असा



पुरस्कार वितरण सोहळा स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज येथील सभागृहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिक्षकांच्या हृदयीस्थानी असलेले वसंतनाना देशमुख, जि.प. सदस्य आदिनाथ देशमुख, शण्मुखी कोरके, गितांजली साळुंखे, दुर्गाताई अंकुशराव, नंदकुमार वाघमारे, सभापती डॉ. शुभम आगावणे, उपसभापती प्रमोद देशमुख, सदस्य शहाजी मुळे, महादेव जाधव, सावली गायकवाड, ज्योती पांढरे, रंजना शिंदे, अक्काताई लोखंडे, प्रियांका जाधव, गटविकास अधिकारी अमोल जाधव, गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता, बी.पी.रोंगे, मुकुंद पवार आदींच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करून सुरुवात झाली. प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता यांनी केले. आमदार अभिजित आबा पाटील,

सुरुवातीला पंढरी गीतमंच ज्ञानेश्वर दुधाणे यांचे संयोजनाने ईशस्तवन आणि स्वागतगीत सादर करत कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी गावडे आणि सरस्वती भालके यांनीही मनोगतात मुलांसाठी करत असलेल्या कष्टाचा हा सन्मान असून यामुळे आणखी जोमाने काम करण्याची उर्जा या पुरस्काराने मिळाली असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन शहाजी देशमुख आणि सविता दुधभाते यांनी करत आभार आण्णासाहेब पवार यांनी मानले. करकंब बीट विस्ताराधिकारी दशरथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.

## महत्वाचे...



### अंत्रोळी जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

अंत्रोळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त क्रीडा अधिकारी राष्ट्रीय खो-खो मार्गदर्शक सत्येनं जाधव, प्रमुख पाहुणे महाराष्ट्र पोलीस गुप्तहेर खात्याचे सिराज मुलानी उपस्थित होते. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत कोकरे, उपाध्यक्ष नाम देव सुपेकर, सदस्य सिद्धनाथ माने, विक्रम जाधव, लक्ष्मण परीक्षाळे, सरपंच ब्रह्मदेव सलगरे, उपसरपंच सोनाली खरात, सदस्य पूजा थोरात, ज्येष्ठ नागरिक मजनुद्दीन पठाण, शिक्षण विस्तार अधिकारी आयुब कलबुर्गी, सैपन आळगी, केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे, केंद्रप्रमुख नागनाथ स्वामी, आदर्श शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संजीव करंडे, सुहास जाधव, मुख्याध्यापक श्रीरंग बनसोडे उपस्थित होते. स्वागत गीत, देशभक्तीपर गीत, गोंधळ गीत, लावणी, लेझीम, सिने गीत, बंजारा नृत्य, बालगीते बडबड गीते, विनोदी नाटिका, कव्वाली, दैवत छत्रपती, भीम गीत, अशा विविध नृत्याविष्कारांनी सर्व प्रेक्षकांची मने जिंकली. प्रास्ताविक मुख्याध्यापक श्रीरंग बनसोडे यांनी केले, तर आभार नागनाथ म्हमाने यांनी मानले, याप्रसंगी शाळेतील प्रत्येक वर्गातील आदर्श विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित सर्व प्रेक्षक वर्ग मधून पुरुष व महिला गटातून लकी ड्रॉ च्या माध्यमातून साडी व घड्याळ भेट देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे यांनी परिश्रम घेतले.



### टॅलेंट सर्च परीक्षेत बबनराव शिंदे महाविद्यालयाचे यश

**टेंभूर्णी, दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्र टॅलेंट सर्च या राज्यस्तरीय परीक्षेत अकोले (खुर्द) (ता. माढा) येथील बबनरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विशेष म्हणजे अमरसिंह चंद्रकांत तळेकर याने राज्यात अकरावा क्रमांक मिळवत सोलापूर केंद्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. वेदिका देशमुख हिने राज्यात सतरावा क्रमांक मिळवत सोलापूर केंद्रात तृतीय स्थान पटकावले. तसेच संग्राम कदम याने राज्यात सोळावा व सोलापूर केंद्रात चौथा क्रमांक मिळवला. याशिवाय, यशवंत प्राथमिक विद्यामंदिरच्या प्राथमिक विभागातील शिवांश अतुल डोके याने इयत्ता चौथीत राज्यात तेरावा व सोलापूर केंद्रात द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. दि. २५ जानेवारी २०२६ रोजी जळगाव येथून घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक धनुसिंग रजपूत यांचे कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजयमामा शिंदे, सचिव तथा प्राचार्य राजेंद्र ठोंबरे, प्राचार्या मधुरा सुरवसे, नेवसे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### सांगोला विद्यामंदिरच्या उपमुख्याध्यापकपदी चारूदत्त जगताप

**सांगोला, दि. १ एप्रिल-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजच्या रिक्त झालेल्या उपमुख्याध्यापक पदावर कोळा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचे पर्यवेक्षक चारूदत्त दिगंबर जगताप यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली. या पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे उपस्थित होते. याप्रसंगी गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास चारूदत्त जगताप यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या नियुक्तीबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके यांनी चारूदत्त जगताप यांचे अभिनंदन केले.

### आढीव येथे श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त आज विविध कार्यक्रम

**आढीव, दि. १ एप्रिल-**

पंढरपूर तालुक्यातील श्री भैरवनाथ यात्रेस चैत्र पौर्णिमेच्या दिवसापासून यात्रेस प्रारंभ होत आहे. गुरुवार २ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता श्री काळभैरवनाथ व जोगेश्वरी मातेचा विवाह सोहळा, सकाळी ६ वाजता मारुती जन्मोत्सव, ९ वाजता श्री चे घट उठवणे, दुपारी १२ वाजता आरती, ४ वाजता शिरनी कार्यक्रम तर सायंकाळी ६ वाजता श्रींचा छबिना तसेच शुभेच्छा तोफा व दारूची आतिषबाजी व रात्री वैभव ऑकेस्ट्रा हा मनोरंजनपर कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, ३ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता बेदी गाणी, दुपारी ४ वाजता मल्लांच्या जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. तर संध्याकाळी ७ वा महाप्रसाद व स्त्रीचा छबिना व रात्री नमिता पाटील यांचा लावण्यखणी हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे, तरी आढीव पंचक्रोशीतील सर्व श्री १० भैरवनाथ भक्तांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभघ्यावा, असे आवाहन भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व भैरवनाथ यात्रा कमिटी यांनी केले आहे.

# वडवळच्या यात्रेची आजपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्रासह परराज्यातीलही भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र वडवळ (ता.मोहोळ)येथील ग्रामदैवत श्री नागनाथ महाराज यांच्या यात्रेस चैत्र शुद्ध पौर्णिमा उद्या गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ पासून श्रीं च्या तैलाभिषेकाने मोठ्या उत्साहात सुरूवात होणार असून यात्रेचा मुख्य कार्यक्रम गणासह श्रींच्या पालखीची मिरवणूक गुरुवार दि.९ एप्रिल रोजी निघणार आहे.

श्री क्षेत्र वडवळ (ता.मोहोळ ) येथील ग्रामदैवत श्री नागनाथ महाराज यात्रेला गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ पासून श्रींच्या तैलाभिषेकाने सुरुवात होणार आहे. रविवार दि.५ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र मोहोळहून श्री क्षेत्र वडवळ येथे श्रींच्या पालखीचे आगमन व सोमवारी पहाटे खर्ग, भाकणूक तसेच नयनरम्य शोभेचे दारुकाम होणार आहे. गुरुवार




दि.९ एप्रिल रोजी श्रींच्या पालखीची गणासह सवाद्य मिरवणूक व भाकणूक, तसेच खर्गतीर्थ येथे गुरु-शिष्य भेटीचा नयनरम्य सोहळा होणार आहे. शुक्रवार दि.१० रोजी श्रीक्षेत्र वडवाळहून श्रीक्षेत्र मोहोळकडे श्रींच्या पालखीचे प्रयाण व त्यानंतर जंगी कुस्त्यांचे मैदान अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.११ एप्रिल रोजी तेल उतरविणे कार्यक्रमाने यात्रेची सांगता होणार आहे.यात्रा शांततेत व नियोजनबद्ध पार पाडण्यासाठी श्री नागनाथ देवस्थान यात्रा कमिटी, विविध मंडळाचे कार्यकर्ते, ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

> श्रीक्षेत्र वडवळ येथील यात्रेदरम्यानच्या कालावधीमध्ये शनिवार दि.४ रोजी सायं.६ वा. स्थानिक बाल कलाकारांचा धमाल नृत्य आविष्कार, रविवार दि.५ रोजी सायं.७ वा. समाज प्रबोधनपर संदीप मोहिते व अतुल हातेकर यांचे जुगलबंदी भारुड, सोमवार दि.६ रोजी सायं.७ वा. सई लकडे प्रस्तुत होम मिनिस्टर कार्यक्रम, तसेच मंगळवार दि.७ रोजी भव्य खुल्या सोलो व ग्रुप डान्स स्पर्धा व बुधवार दि.८ रोजी ह.भ. प. श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी श्री नागनाथ यात्रा कमिटी, श्री नागनाथ देवस्थान पंचकमिटी व ग्रामस्थ मंडळी यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.



# बार्शीत बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. रणजीत गुंड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ एप्रिल-**

बार्शी बार असोसिएशनच्या (वकील संघ) सन २०२६-२७ या वर्षाकरिता झालेल्या अध्यक्षपदी ॲड. रणजीत गुंड, उपाध्यक्षपदी ॲड. अक्षय पाटील, सचिवपदी ॲड. प्रकाश साखरे, ॲड. अक्षय पाटील तर लायब्ररी चेअरमनपदी ॲड. अमोल आलाट विजयी झाले. खजिनदारपदी ॲड. सुरज राऊत तसेच मॅनेजमेंट कमिटीच्या पाच सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे. बार्शी बार असोसिएशनच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व बार लायब्ररी चेअरमन पदासाठी सोमवारी (दि.३० मार्च) सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत बार्शी दिवाणी न्यायालय येथील बार रुममध्ये मतदान प्रक्रिया पार पडली.


३८२ मतदारापैकी ३५२ मतदारांनी मतदान केले. मतदान झाल्यानंतर सायंकाळी मतमोजणी करण्यात आली व निकाल जाहीर करण्यात आला. अध्यक्षपदासाठी ॲड. रणजीत गुंड विरुद्ध ॲड. शीतल काकासाहेब गुंड यांच्यात दुरंगी लढत झाली. यामध्ये ॲड. रणजीत गुंड यांना २८० तर ॲड. शितल गुंड यांना ७० मते पडली. रणजीत गुंड हे तब्बल २१० मतांनी विजयी झाले. उपाध्यक्षपदासाठी चुरशीने मतदान झाले. ॲड. उषा पवार यांना ७१, ॲड. शबाना मुकेरी यांना ५६ तर ॲड. अक्षय पाटील यांना २१८ मते पडून ॲड. पाटील विजयी झाले. सचिव पदासाठी दुरंगी लढत झाली यात ॲड.. केदार पाटील यांना १६६ तर ॲड. प्रकाश साखरे यांना १७३ मध्ये पडली ॲड. साखरे हे ७ मतांनी विजयी झाले. बार लायब्ररी चेअरमन पदासाठी ॲड. अमोल आलाट व ॲड. अविनाश गायकवाड यांच्यात चुरशीने दुरंगी सामना झाला यात आलाट यांना १९१ तर गायकवाड यांना १५० मते मिळाली.

# पाण्याला जपा अन्यथा भविष्य कोरडे होईल : जवंजाळ

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १ एप्रिल-**

पाण्यची बचत ही केवळ गरज नाही तर आपली जबाबदारी आहे. पाण्याच्या बचतीसाठी आज आपण जागे झालो नाही तर भविष्यातला दुष्काळ आपल्याला टाळता येणार नाही. लहान-सहान सवयीतून पाण्याची बचत आपण करू शकतो, पाणी हे रोजच्या दैनंदिन वापरातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून पाण्याला जपा अन्यथा भविष्य कोरडे होईल असे प्रतिपादन प्रसिद्ध हास्य कवी व वक्ते सुनील जवंजाळ यांनी केले.

कै. नानासाहेब नागणे प्रशाला नगरपालिका मुलांची शाळा क्रमांक चार मध्ये आयोजित केलेल्या पर्यावरण जागृती- निसर्ग आपला सोबती या कार्यक्रमांतर्गत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक गंगाधर कोळी, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रद्धा देशमुख, प्रशालेतील शिक्षक भारत शिंदे, मारुती वाकडे, वर्षा दत्तू, शुभांगी पलंगे, मीनाक्षी मांडवे, अर्जुन आवताडे, श्रीमंत सोलनकर उपस्थित होते. यावेळी कवी जवंजाळ विनोदी बोधकथांम धून पर्यावरण संवर्धनाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले तसेच विविध कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रशालेतील शुभांगी पलंगे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन भारत शिंदे यांनी केले तर आभार मारुती वाकडे यांनी मांडले.

# श्रीक्षेत्र बासलेगांव येथे जागरणाने यात्रेस प्रारंभ; मुंबई, कर्नाटकसह शेकडो भक्त दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

तालुक्यातील श्रीक्षेत्र बासलेगांव येथील श्री जगदंबा जागृत देवस्थान यात्रा महोत्सव २०२६ हे मंळवारी रात्रीच्या डोंगरावरील रात्रभराच्या जागरण गोंधळाने मोठ्या उत्साहात पारंपारिक पद्धतीने शेकडो भक्तांच्या उपस्थितीत सुरुवात झाली.



मुंबई, कर्नाटक राज्यातील देवीभक्त दाखल झाले असून, सदर ही यात्रा गुरुवार दि. २ एप्रिलपर्यंत आहे. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थान समितीने कळविले आहे.

या विविध धार्मिक कार्यक्रमात बुधवार दि. १ एप्रिल रोजी रात्रौ. ९ वा. डोंगरावर लोटांगण व मशाल मिरवणूक, रात्रौ. १० वा. ३० मी. कन्नड नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि.२ एप्रिल रोजी सकाळी ८. वा.३० मी श्री देवीची आरती, सायंकाळी ५ वा. ३० मी. जंगी कुस्त्या, रात्रौ. १० वा. ३० मी कन्नड नाटकाचे आयोजन करण्यात आलेली असून, या विविध धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थान समितीने केले आहेत.

सर्व जाती-धर्माचे बासलेगांव ग्रामस्थ एकत्र- बासलेगांवात सर्व जाती-धर्माचे नागरिक गुण्या गोविंदाने राहतात. यात्रेनिमित्य सर्वजन एकत्र येत असतात. एक राष्ट्रीय एकतेचे प्रतिक असलेली यात्रा म्हणून बासलेगांवची ही यात्रा सुपरिचित आहे.

> माथाडी कामगारांची उपस्थिती–
> श्री क्षेत्र बासलेगांव येथील बहुतांश रहिवाशी हे मुंबई कृषी उत्तन्न बाजार समिती, वाशी मार्केट या ठिकाणी माथाडी कामगार व दुकानदार आहेत. श्री जगदंबा यात्रे करिता प्रत्येक माथाडी कामगार हा भक्त असून, आपली सेवा बजाविण्याकरिता बासलेगांव गाठतोच, ही परंपरा आजही कायम आहे.

# ‘आधार’च्या निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १ एप्रिल-**

आधार प्रतिष्ठान सामाजिक संस्थेने घेतलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता नाशिक विभागाचे शिक्षण उपसंचालक संजयकुमार राठोड यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी माजी सहायक गटविकास अधिकारी मल्हारी बनसोडे असणार आहेत तर दक्षिण सोलापूरचे शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळा सनके व महावितरण मंडळ कार्यालय सोलापूरचे उपकार्यकारी अभियंता संजीवकुमार म्हेत्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी सर्व विजेते स्पर्धक, शिक्षक, पालक व प्रतिष्ठानच्या हितचिंतकांनी शिवस्मारक सभागृह गोल्डफिंच पेठ सोलापूर येथे वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर नळे यांनी केले आहे.

# सर्वांना सोबत घेऊन काम करणार : महापौर कोंड्याल

**ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने सोलापूर विकासाच्या शिलेदारांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने भाजपा नगरसेवक किसन जाधव यांच्या सात रस्ता परिसरातील सोनामाता प्रशाला समोरील संपर्क कार्यालयात नूतन स्वीकृत नगरसेवक तसेच स्थायी समिती सदस्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

शाल, भगवा फेटा, वृक्ष आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तक भेट देऊन मान्यवरांचा गौरव करण्यात आला या कार्यक्रमास महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी



देवकर, अश्विनी चव्हाण, संगीता जाधव, स्वीकृत नगरसेविका वृषाली चालुक्य, देवकर मावशी, बिजू प्रधाने, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, शिवाजी वाघमोडे, सतीश शिरसिल्ला, भरतसिंग बडूरवाले, अक्षय अंजिखाने, श्रीनिवास दायमा, ज्ञानेश्वर म्याकल, अँड. ऋषिकेश मेट्रे, रुद्रेश बोरामणी, विठ्ठल मेट्रे आदी उपस्थित होते.

यावेळी किसन जाधव, नगरसेवक दत्तात्रय नडगिरी, माजी परिवहन समिती सदस्य संतोष कदम, युवा नेते चेतन नागेश गायकवाड, महेश देवकर, वृक्षमित्र मनोज देवकर, निलेश कांबळे, अरविंद शेरखाने, संतोष गायकवाड, अमोल जगताप, रामभाऊ मिस्त्री, किरण शिंदे, हुलगप्पा शासम, उत्कर्ष गायकवाड, यल्लाप्पा शिवापुरी, प्रथमेश पवार, ऋषी येवले, बिराजदार मावशी, शोभा गायकवाड, मारता असादे, प्रमिला स्वामी, शहाजान शेख, फिरोज पठाण आदींची उपस्थिती होती. सत्कारास उत्तर देताना महापौर विनायक कोंड्याल यांनी सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन पारदर्शक व विकासाभिमुख काम करू, अशी ग्वाही दिली. शहरातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पायाभूत विकास आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित केले जाईल, असे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी सांगितले. यावेळी उपस्थित नूतन सदस्यांना जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

# कंत्राटदाराच्या अपहरणाचा ६ तासांत उलगडा; पण जनावरांच्या चोऱ्यांकडे दुर्लक्ष का?

**मंद्रूप पोलिसांची दुहेरी चर्चा: विशेष पथकाची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १ एप्रिल-**

मंद्रूप येथील एका कॉन्ट्रॅक्टरच्या अपहरण प्रकरणाचा मंद्रूप पोलिसांनी अवघ्या सहा तासांत उलगडा करून आरोपींना कलबुर्गी येथे जेरबंद केले. पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि अत्यंत जलद कारवाई करीत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. या धडाकेबाज कारवाईमुळे मंद्रूप पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र, दुसरीकडे मंद्रूप परिसरात शेतकऱ्यांच्या जनावरांच्या चोरीच्या घटना सातत्याने घडत असताना त्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याची खंत सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. शेळ्या, मेंढ्या, म्हशी तसेच शेती साहित्य चोरीला जाण्याच्या अनेक घटना घडल्या असून अद्याप त्यांचा उलगडा झाले नाही. त्यामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आधीच शेतीमालाला भाव नसल्याने आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी आता चोरीच्या घटनांमुळे अधिकच हतबल झाला आहे. अनेक शेतकरी रात्रभर जागून जनावरांचे रक्षण करत आहेत. चोरटे हाती लागल्यास संतप्त शेतकऱ्यांकडून अघटित घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंद्रूप पोलिसांनी आपल्या हद्दीत आत्तापर्यंत छम छम बंद केले, जुगाऱ्यांना हिसका दाखवला मोठ्या गुन्ह्यांत पोलिसांची झपाटलेली कारवाई दिसते; मग शेतकऱ्यांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित चोरीकडे दुर्लक्ष का? असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. पोलिसांनी आता केवळ दिखाऊ कारवाई न करता सातत्याने मोहीम राबवून या टोळ्यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा शेतकरी स्वतःच कायदा हातात घेण्याची वेळ येऊ शकते, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अपहरण प्रकरणाप्रमाणेच जनावर चोरीच्या घटना व घरफोडीकडेही तातडीने लक्ष देत चोरांच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे. तसेच पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी जनावर चोरी रोखण्यासाठी विशेष पथक नेमून ठोस कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिंगडगावच्या यात्रेस आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १ एप्रिल-**

शिंगडगाव येथील ग्रामदैवत श्री धुळीम हांकाळेश्वर यात्रा यंदाही हनुमान जयंतीनिमित्त मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरी होणार आहे. गुरुवार, २ एप्रिलपासून या यात्रेला प्रारंभ होणार असल्याची माहिती यात्रा महोत्सव पंचकमिटीच्यावतीने देण्यात आली.

यात्रेच्या पहिल्या दिवशी पहाटे पाच वाजता श्री धुळीमहांकाळेश्वर व श्री हनुमान यांचा तैलाभिषेक व काकड पूजा होणार आहे.



दिवसभर महात्मा बसवेश्वर स्मारक कट्ट्यासमोर लक्ष्मण खणदाळ व विद्याश्री मशिबनाळ यांच्यात कन्नड लोकगीत व सवाल-जवाब ढपावरील गाण्यांची जुगलबंदी रंगणार आहे.

सायंकाळी सात वाजता हनुमान मंदिर ते धुळीमहांकाळेश्वर मंदिर असा रथ व नंदीध्वज मिरवणूक सोहळा पार पडणार असून यात विविध कलागुणांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यानंतर मंदिर परिसरात दारूगोळ्यांचा आकर्षक सोहळा होणार आहे. सायंकाळी पाचनंतर कुस्तीचा फड रंगणार असून रात्री दहानंतर अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ येथील प्रसिद्ध कन्नड नाटक 'साकद मगा सरदारा अर्थात भूमी गे बंदे भगवान' सादर करण्यात येणार आहे.

## महत्त्वाचे



### दुचाकी चालकांनी हेल्मेटचा वापर करावा : उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गावडे

**माळशिरस, दि. १ एप्रिल-**

दुचाकीवरून पडून डोक्याला मार लागून मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक असून दुचाकी चालकांनी वाहन चालकांनी हेल्मेटचा वापरावे तसेच वाहतुकीच्या नियमाचे पालन केल्यास केल्यास अपघाताचे व मृत्यूचे प्रमाण कमी होते. कमल फाउंडेशनने हेल्मेट वाटप करून स्तुत्य उपक्रम राबविला असल्याचे प्रतिपादन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संभाजी गावडे यांनी गोरडवाडी येथील कमल फाउंडेशन व समस्त ग्रामस्थ गोरडवाडी यांच्यावतीने हेल्मेट वाटप कार्यक्रम प्रसंगी सांगितले. कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. शिवेंद्र सिंह व अभयसिंह कर्णवर पाटील या मुलांच्या वाढदिवसानिमित्त व बिरोबा यात्रेनिमित्त कर्णवर परिवारातर्फे हेल्मेट वाटप व बाईक रॅली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांना व पुरुषांना मान्यवरांच्या हस्ते हेल्मेट वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरस पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास दिंडूरे, नूतन डीवायएसपी प्रदीप गोरड, मोटार वाहन निरीक्षक अमोल घुले सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक सुषमा गुणवरे, पंचायत समितीचे नूतन सभापती दत्ता मगर, सेवानिवृत्त अभियंता धनंजय पाटील, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अंगरक्षक ॲड. राहुल वाघमोडे, अभिमन्यू टकले, बापूसाहेब शिंदे, ज्ञानेश्वर डुमणे यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. यावेळी श्रीश्री सद्गुरु साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील, ठाणे शहर क्राईम ब्रँच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ पाटील, अमोल पाटील, शामराव पाटील, अजित पाटील, धुळदेव पाटील, कांतीलाल पाटील, सचिन पाटील, शिवाजी पाटील उपस्थित होते.

### जामगाव (आ) येथील टान्सफॉर्मरची तोडफोड व ऑईलची चोरी

**बार्शी, दि. १ एप्रिल-**

तालुक्यातील जामगाव (आ) शिवारात के. आर. ग्रो प्रायव्हेट कंपनीच्या परिसरातील २०० केव्हीए क्षमतेच्या महावितरण कंपनीच्या ट्रान्सफॉर्मरची अज्ञात चोरट्यांनी तोडफोड करुन मोठी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. ट्रान्सफॉर्मरमधील सुमारे ४०० लिटर ट्रान्सफॉर्मर ऑईल आणि ५०० किलो ल्युमिनियम वायडिंग वायर चोरुन नेल्याने महावितरण कंपनीला १ लाख ४५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. ही घटना २७ मार्च दुपार ते ३० मार्च सायंकाळी दरम्यान घडली. चोरट्यांनी ट्रान्सफॉर्मरचे तेल आणि वायर काढून नेले. यातील ऑईलची किंमत अंदाजे २० हजार रुपये तर ल्युमिनियम वायरची किंमत १ लाख २५ हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणी महावितरण कंपनीच्या बार्शी ग्रामीण २ विभागातील वरिष्ठ तंत्रज्ञ श्रीकृष्ण भगवान चाटे (वय ४०) यांनी बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरुन भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरु केला असून, चोरट्यांचा शोध घेतला जात आहे. उन्हाळ्याच्या हंगामात ही घटना घडल्याने परिसरातील वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महावितरण कंपनीने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले असल्याचे सांगण्यात आले.




# घरकुल बिलांसाठी टक्केवारीचा खेळ

### दक्षिण सोलापुरात संगनमताने लाखोंची लूट; लाभार्थी आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरप्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. गृहनिर्माण अभियंता, ग्रामपंचायत सहाय्यक, पंचायत समितीतील लिपिक व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने घरकुल बांधकामाच्या बिलांवर लाखोंची लूट सुरू असल्याची धक्कादायक माहिती लाभार्थ्यांकडून मिळत आहे. या सर्व प्रकाराकडे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांचे दुर्लक्ष होत असल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले असून लाभार्थ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.

तालुक्यात अनेक गावांमध्ये ग्रामसेवकांनी टार्गेट पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्षात घरकुल बांधकाम न करता बोगस बिल काढल्याचे प्रकार उघडकीस येत आहेत. याबाबत तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



घरकुलासाठी मंजूर झालेल्या अनुदानाच्या तुलनेत बांधकाम साहित्याच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्याने लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनुदान हे प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत पन्नास टक्क्यांपेक्षा कमी असल्याने बांधकाम संथगतीने सुरू ठेवले आहे. अशा परिस्थितीत तीन टप्प्यांमध्ये बिल काढताना लाभार्थ्यांना अधिकच आर्थिक फटका बसत आहे.

पहिल्या टप्प्यातील १५ हजार रुपये खात्यावर जमा झाल्यानंतर उर्वरित बिल काढण्यासाठी मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून 'दर' ठरवला जात असल्याचे समोर आले आहे. गृहनिर्माण अभियंते जिओ टॅगिंग करताना दोन ते पाच हजार रुपये घेत असल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला आहे. पैसे दिल्याशिवाय पुढील बिल मंजूर केले जाणार नाही, अशी सर्रास भाषा वापरली जात असल्याने गरीब लाभार्थी हतबल झाले आहेत.

दरम्यान, पंचायत समिती कार्यालयात अनेक गैरप्रकार सुरू असतानाही गटविकास अधिकारी मनोज राऊत हे मौन बाळगत असल्याने त्यांच्या भूमिकेबाबतही शंका व्यक्त होत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना बीडीओंचे वरदहस्त असल्याची चर्चा रंगली आहे. कार्यालयात गैरहजर राहणे व तक्रारींकडे दुर्लक्ष करणे

शासनाकडून १५ हजार रूपये खात्यावर जमा झाल्यानंतर घरकुल बांधकाम केला.पहिल्या टप्प्यातील ७० हजाराचे बिल काढण्यासाठी वारंवार पाठपुरावा केल्यानंतर दोन हजार रूपये घेतले. तिसऱ्या टप्प्यातील बिल पंचायत समितीकडे सादर करून १५ दिवस उलटले तरी अद्याप जियो टॅगिंग करण्यात आले नसल्याचे मंद्रूपमधील एका लाभार्थ्याने सांगितले.

गृहनिर्माण अभियंत्यांनी जियो टॅगिंग करण्यासाठी पैशाची मागणी करू नये. त्यामुळे जियो टॅगिंग करताना त्यांच्यासोबत विस्तार अधिकारी यांना सोबत पाठविणार आहे. तसेच घरकुल न बांधता बिल काढले असतील तर लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल करून बिल काढलेल्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात येईल.

**- मनोज राऊत,**
**गटविकास अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर**

यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये शासनाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर केले होते. मात्र, वरिष्ठांचा दबाव पूर्ण करण्यासाठी काही ग्रामसेवकांनी नियमबाह्य पद्धतीने नातेवाईक व मित्रांच्या नावावर बिल काढल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे शासनाची आर्थिक फसवणूक होत असून खऱ्या गरजू लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित राहावे लागत आहे. या संपूर्ण प्रकरणी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने लक्ष घालून दोषी ग्रामसेवक व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संतप्त नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## प्रत्येक तालुक्यात महिलांसाठी शासकीय योजनांचे शिबिर

### महिलांना मिळणार हक्काच्या योजना

### जिल्हा परिषदेचा कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

महिला व बालकल्याण विभागाच्या सर्वेक्षणातून जिल्ह्यातील अनेक महिलांना मूलभूत कागदपत्रांच्या अभावामुळे शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेत सोलापूर जिल्हा परिषदेने आता महिलांसाठी तालुकानिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गावात जाऊन करण्यात आलेल्या प्रत्यक्ष सर्वेक्षणादरम्यान अनेक महिलांकडे रेशन कार्ड, आधार कार्ड, बँक खाते, राहण्याचा पुरावा यांसारखी आवश्यक



कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. परिणामी, शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. काही प्रकरणांमध्ये महिलांना वारंवार शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असल्याचेही निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने महिलांना दिलासा देण्यासाठी एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याची संकल्पना पुढे आणली आहे. तालुकानिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या या विशेष शिबिरांमध्ये महिलांना विविध प्रकारची कागदपत्रे तयार करून देण्यासाठी मदत केली जाणार आहे.

या शिबिरांचे वैशिष्ट्य म्हणजे तब्बल २३ प्रकारच्या कागदपत्रांसाठी एकाच ठिकाणी सहाय्य मिळणार आहे. यात आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती, रेशन कार्ड प्रक्रिया, बँक खाते उघडणे, राहण्याचा पुरावा, उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र आदी महत्त्वाच्या कागदपत्रांचा समावेश असणार आहे.यासाठी संबंधित सर्व विभागांचे अधिकारी या शिबिरांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, महिलांना विविध कार्यालयांमध्ये स्वतंत्रपणे जावे लागणार नाही. यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होणार असून, प्रक्रियाही अधिक सुलभ होणार आहे. जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवणे सोपे होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः कागदपत्रांच्या अभावामुळे आतापर्यंत वंचित राहिलेल्या महिलांसाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने जिल्हा परिषदेचा हा निर्णय महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात असून, या शिबिरांना महिलांचा मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

## सार्वजनिक शांततेचा केला भंग; ३३ जणांविरुद्ध गुन्हा

### सांगोला पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ एप्रिल-**

हातामध्ये लोखंडी तलवार घेऊन दोन गटात मारामारी करुन सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी सांगोला पोलिसांनी कारवाई करत ३३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

याबाबत अधिक माहिती अशी, मंगळवार दि.३१ मार्च रोजी रात्री सव्वा आठच्या सुमारास शेतकरी महिला सुत गिरणी, सांगोला समोरील हायवे रोडच्या पलीकडील मोकळ्या जागेमध्ये सचिन हजारे (वय-३६), अतुल येडगे (वय-३२) दोघे रा.खर्डी, ता.पंढरपूर, दत्तात्रय झेडगे (वय-४०), रा.बोबेंवाडी, ता.आटपाडी, जि.सांगली, गणेश नवले (वय-३६) रा.एखतपुर, ता.सांगोला, सागर मोरे (वय-३०), बंडू मासाळ (वय-३८), बिरा मासाळ (वय-३६) सर्व रा.धायटी, ता.सांगोला, विक्रम मेटकरी (वय-२६), दिपक मासाळ (वय-२५), शरद मासाळ (वय-२४), विलास खांडेकर (वय-२४) सर्व रा.गोणेवाडी, ता.मंगळवेढा, सुरज मेटकरी (वय-२४) रा.खडकी, ता.मंगळवेढा, आदिनाथ वारे (वय-२१) रा.नाझरे, ता.सांगोला, नागेश मोरे (वय-३६) रा.शिरभावी, ता.सांगोला, काशिलिंग गाडेकर (वय-३१), दिपक वगरे (वय-२१) रा.धनगर गल्ली, अतिक मुजावर (वय-२५) रा.मुजावर वस्ती, अरमान शेख (वय-२५) रा.आनंदनगर, पैगंबर मुलाणी (वय-२४) रा.संजय नगर झोपडपट्टी, सोमनाथ मंडले (वय-२६) रा.महुद रोड, सुभाष मेटकरी, बाळू मेटकरी (वय-५२), शिवाजी मेटकरी (वय-७०), तानाजी मेटकरी (वय-३६) कुमार मेटकरी (वय- ३२) उल्हास मेटकरी (वय-३३), प्रभाकर सरगर (वय-३४), रावसाहेब मेटकरी (वय-३०), बाबू मेटकरी (वय-५३), युवराज मेटकरी (वय-२१) सर्व रा.चांडोलवाडी, अंकुश शेंबडे (वय-२६), वैभव शेंबडे (वय-२६), सिद्धेश्वर शेंबडे (वय-३०) सर्व रा.शेंबडे वस्ती, सांगोला, ता.सांगोला यांना सांगोला पोलिसांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्था निर्माण करु नका असे सांगितले असताना त्यांच्या आदेशाला जुगारुन वरील इसमानी एकमेकांशी तसेच बंडु मासाळ याने हातामध्ये लोखंडी तलवार घेवुन दोन गटात मारामारी करुन सार्वजनिक शांततेचा भंग केला. याप्रकरणी सरकार तर्फे बाबासाहेब पाटील यांनी सांगोला पोलीस ठाणे कायदेशीर तक्रार दिली आहे. पुढील तपास पोहेकॉ.बनसोडे करीत आहेत.

## स्व. महादेवराव आवताडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज कीर्तन

**मंगळवेढा, दि. १ एप्रिल-**

आ. समाधान आवताडे यांचे वडील स्व. महादेवराव बाबुराव आवताडे यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित बुधवार, १ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता आ. समाधान आवताडे यांच्या खंडोबा गल्लीतील जनसंपर्क कार्यालयाच्या प्रांगणामध्ये कीर्तनकार हभप सुधाकर इंगळे महाराज यांचे किर्तन होणार आहे.

सकाळी ९ ते १२ कीर्तन सेवेनंतर दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी, भजन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी नियोजित कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री हनुमान जयंतीनिमित्त आज कबड्डी स्पर्धा

**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

तालुक्यातील दहिटणेवाडी येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बुधवार, दि. १ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर होणार वे आहे. स्पर्धेत विजेत्या संघांना रोख पारितोषिके ये जाहीर करण्यात आली असून प्रथम पारितोषिक जि. प. सदस्य ॲड. विकास बुळ्ळा यांच्या तर्फे १५ हजार १ रुपये, द्वितीय न पारितोषिक सरपंच रोहित जाधव तर्फे ११ हजार १ रुपये तर तृतीय पारितोषिक जय भवानी कबड्डी संघ तर्फे ७ हजार १ रुपये असे आहे. याशिवाय उत्कृष्ट खेळाडूंना उत्तम रेडर, डिफेंडर व मॅन ऑफ द मॅच यांसाठी प्रत्येकी २ हजार १ रुपयांची अक्षिसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे आयोजन उपसरपंच नाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

## आळंद येथे आज ग्रामदैवत श्री हनुमान जयंती रथोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**आळंद, दि. १ एप्रिल-**

आळंदचे ग्रामदैवत श्री हनुमान मंदिर परिसरात श्री हनुमान जयंती निमित्त २६ मार्च ते २ एप्रिल २०२६ पर्यंत अखंड नामसप्ताहाचे आयोजन व रात्री लहान पडद्यावर रामायण दर्शन चित्रपट दाखविण्यात येत असून गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी पहाटे ५-३० वाजता चैत्र पौर्णिमेदिवशी श्री हनुमान जन्मोत्सव व पाळणा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १-३० वाजता आळंदच्या प्रमुख रस्त्यांवरुन सजवलेले नंदीकोल, कुंभ व पालखीची विविध वाद्यवृंद व पुरवंताच्या पारंपरिक नृत्य प्रदर्शनासह मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी भाविकांकडून रथावर खारिक व तागाची उधळण केली जाते. रथोत्सव पार पडल्यानंतर दि. २ ते ४ एप्रिल दरम्यान रात्री सामाजिक नाटकांचे प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. दरवर्षाप्रमाणेच हरदेशी नागेशी यांचे सवाल जबाब तसेच गी गी पदे सादर करण्यात येतील. दि. ३ एप्रिल रोजी ४ वाजता जंगी कुस्त्यांचे मैदान होणार असून नंतर रात्री ८ वाजता शोभेचे दारूकाम पहायला मिळणार आहे.



## हरिभाई देवकरण प्रशालेचा वर्धापन दिन उत्साहात



### ४१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

हरिभाई देवकरण प्रशालेचा १०८ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळा समितीचे अध्यक्ष सुरेश मंकणी, मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक व सर्व पर्यवेक्षक यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रास्ताविकातून मल्लिकार्जुन घवाळे यांनी १०७ वर्षाचा प्रशालेच्या गौरवशाली कारकिर्दीचा आढावा व्यक्त केला. शाळा गीत संगीत शिक्षिका सावनी कुलकर्णी व प्रशालेचे विद्यार्थी विद्यार्थिनींनी सादर केले. शिक्षण प्रसारक मंडळी च्या सोलापूर शाखेचे सर्व मुख्याध्यापक प्रतिनिधी म्हणून याप्रसंगी उपस्थित होते. मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी आपल्या मनोगतातून विविध उपक्रम नवनवीन कल्पना या माध्यमातून शाळेची प्रगती होत असल्याचे सांगितले व सर्वांना प्रशालेच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष शाळा समिती सुरेश बाबू मंकणी यांनी प्रशालेची कीर्ती असे उत्तरोत्तर वाढत जावो व असंख्य गुणवान विद्यार्थी या प्रशालेतून तयार व्हावेत. माझ्याकडून व संस्थेकडून प्रशालेच्या उत्कर्षासाठी जी मदत हवी आहे ती मी निश्चितपणे देण्याचा प्रयत्न करेन तसेच त्यांनी प्रशालेच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. वर्धापन दिनानिमित्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी व स्नेही अशा ४१ जणांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन मल्लिकार्जुन घवाळे तर आभार पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी मानले.

## बार्शीत १६ वर्षीय विद्यार्थीनी बेपत्ता

### अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ एप्रिल-**

शहरातील एक १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी (वय १६ वर्षे १० महिने) ही कॉलेजमध्ये इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत आहे. दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजता ती नेहमीप्रमाणे कॉलेजला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडली होती.




दररोज प्रमाणे दुपारी २ वाजेपर्यंत घरी परत येणारी मुलगी त्या दिवशी घरी परतली नाही. दुपारी ३ वाजेपर्यंत वाट पाहूनही ती न आल्याने कुटुंबीयांनी तिच्या मैत्रिणींशी संपर्क साधून चौकशी केली; मात्र ती कॉलेजमध्ये किंवा मैत्रिणीकडेही गेली नसल्याचे समजले. त्यानंतर परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता तिचा काहीही ठावठिकाणा लागला नाही. यावरुन अज्ञात व्यक्तीने तिच्या अल्पवयीन असल्याचा फायदा घेत फूस लावून तिला पळवून नेल्याचा संशय वडिलांनी व्यक्त केला आहे. पोलिस ठाण्यात नोंद केल्याप्रमाणे बेपत्ता मुलीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे. वय १६ वर्षे १० महिने, उंची अंदाजे ५ फूट २ इंच, बांधा : सडपातळ, रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ, अंगात काळ्या रंगाचा बुरखा याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत. नागरिकांना संबंधित मुलीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.